दै.सकाळ

दि.१ जानेवारी,२०२६

सकाळ

# राज्यपाल देवव्रत दोनदिवसीय दौऱ्यावर

■ सकाळ वृत्तसेवा



नाशिक, ता. ३१ : नववर्षाच्या प्रारंभी गुरुवारी (ता.१) राज्यपाल आचार्य देवव्रत हे दोनदिवसीय नाशिक दौऱ्यावर येत असून, या दौऱ्यात विविध कृषी व शासकीय कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत. राज्यपाल देवव्रत यांचा हा जिल्ह्याचा पहिलाच दौरा असल्याने जिल्हा प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

राज्यपालांच्या दौऱ्याची सुरवात दुपारी २ वाजता मोहाडी (ता. दिंडोरी) येथील सह्याद्री फार्ममध्ये आयोजित कार्यक्रमाने होणार आहे. येथे शेतकरी उत्पादक संघटना, कृषी सहकारी संस्था तसेच कृषी सेवा केंद्रचालकांशी ते संवाद साधणार आहेत. सायंकाळी ५ वाजता पिंपरखेड (ता. दिंडोरी) येथे शेताच्या बांधावर जाऊन ते शेतकऱ्यांशी थेट चर्चा करतील.

यानंतर पिंपरखेड येथील आश्रमशाळेची पाहणी करून राज्यपाल तेथे मुक्कामी राहणार आहेत. शुक्रवारी (ता. २) सकाळी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांशी राज्यपाल संवाद साधतील. त्यानंतर खोरीपाडा (ता. दिंडोरी) येथे शेतकऱ्यांशी संवाद व अन्य शासकीय कार्यक्रमांना उपस्थिती देतील. यानंतर राज्यपाल ओझरकडे प्रयाण करणार असून, सकाळी साडेअकरा वाजता ओझर येथील हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) कंपनीला भेट देऊन पाहणी करणार आहेत. दुपारी २ वाजता ते विमानाने अहमदाबादकडे रवाना होणार आहेत. दरम्यान, राज्यपालांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन व पोलिस यंत्रणेकडून सुरक्षा व व्यवस्थेच्या दृष्टीने व्यापक तयारी करण्यात येत आहे.

सकाळ

# आपत्ती व्यवस्थापनासाठी सराव आवश्यक

## आयुक्त सिंह : सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने कार्यशाळा

नाशिक, ता. ३१ : आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात नैसर्गिक व मानवनिर्मित किंवा निष्काळजीपणामुळे आपत्ती उद्‌भवू शकते. या संभाव्य आपत्तीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक विभागाने सूक्ष्म नियोजन करताना आपत्ती व्यवस्थापनासाठी नियमित सराव करणे आवश्यक आहे, अशा सूचना सिंहस्थ-कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी केल्या.

नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणामार्फत सिंहस्थाच्या अनुषंगाने तात्याश्री लॉन्समध्ये आयोजित आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेप्रसंगी आयुक्त सिंह बोलत होते. या वेळी महापालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हा परिषदेचे डॉ. अर्जुन गुंडे, उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर व स्मिता झगडे, पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्रीकृष्ण देशपांडे, कार्यशाळा मार्गदर्शक कर्नल व्ही. एन. सुपणेकर आदी उपस्थित होते.



नाशिक : सिंहस्थ कुंभमेळा आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेस उपस्थित विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, की स्वच्छ, हरित, सुंदर व सुरक्षित कुंभमेळ्याच्या दृष्टीने आपत्ती व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने मानसिक तयारी व नियोजन करणे आवश्यक आहे, अशा सूचना त्यांनी केल्या. सिंहस्थ तयारीसाठी आवश्यक मनुष्यबळासाठी इतर जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांचे आतापासून सेवावर्ग केल्या जाणार असल्याचे सिंह यांनी सांगितले. या वेळी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### स्वतंत्रपणे नियोजन : सिंह

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील आपत्ती व्यवस्थापन व्यवस्था स्वतंत्रपणे असणार आहे. ही बाब लक्षात घेत वाहनतळ, फलक, व्यासपीठ क्षेत्र, भाविक/अमृत स्नान मार्ग, नदीघाट, साधुग्राम, रेल्वे व बसस्थानक आदी बाबींवर प्राथमिक नियोजन करावे. त्यानुसार पुढील कार्यशाळेत अंतिम नियोजन करणे शक्य होईल, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

> संभाव्य आपत्तीची परिस्थिती व तिच्या परिणामांना सामोरे जाण्यासाठी प्रत्येक विभागाने सज्ज असावे. तसेच, प्रत्येक विभागाने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विभागीय तांत्रिक प्रशिक्षण, कुंभमेळा संबंधित क्षेत्रीय प्रशिक्षणाबाबतचा सराव, रंगीत तालीमचे नियोजन करावे.
>
> **- व्ही. एन. सुपणेकर,**
> कार्यशाळा मार्गदर्शक

Nashik, Main
01/01/2026 Page No. 2

सकाळ

# मांजाची बंदी फक्त कागदावर

## वडाळानाका उड्डाणपुलावर दुचाकीस्वाराचा गळा चिरला

■ सकाळ वृत्तसेवा



नाशिक : नायलॉन मांजाने दुचाकीस्वाराचा चिरलेला गळा.

जुने नाशिक, ता. ३१ : वडाळा नाका परिसरातील उड्डाणपुलावर अडकलेल्या नायलॉन मांजामुळे दुचाकीस्वाराचा गळा चिरल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (ता. ३१) सायंकाळी घडली. या अपघातात प्रकाश भीमाजी सोमाशे (वय ४८) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर मुंबई नाका येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे नायलॉन मांजाचा जीवघेणा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

प्रकाश सोमाशे हे पत्नीसह दुचाकीवरून मुंबई नाका ते द्वारका उड्डाणपुलाच्या दिशेने जात असताना वडाळा नाका परिसरात उड्डाणपुलावर लटकलेला नायलॉन मांजा त्यांच्या लक्षात आला नाही. अचानक दुचाकीच्या वेगात मांजाने त्यांच्या गळ्याभोवती वेढा घातला आणि धारदार मांजामुळे गळा चिरला गेला. त्यानंतर रक्तस्राव होऊन ते रस्त्यावर कोसळले.




या वेळी मागून प्रवास करणारे सामाजिक कार्यकर्ते गणेश शहाणे यांच्या ही घटना लक्षात आली. त्यांनी प्रसंगावधान राखत तातडीने मदत करीत सोमाशे यांना स्वतःच्या वाहनातून मुंबई नाका येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजावर बंदी असून, पोलिस कारवाई सुरू असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात शहरात अजूनही सर्रासपणे नायलॉन मांजाची विक्री होत असल्याचे वास्तव आहे. हाच मांजा रस्ते, उड्डाणपूल व सार्वजनिक ठिकाणी अडकून नागरिकांसाठी जीवघेणा सापळा ठरत आहे.

पोलिस कारवाई सुरू असली, तरी महापालिकेचे या गंभीर प्रश्नाकडे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. रस्त्यावर पडलेला तसेच खांबांवर व उड्डाणपुलांवर अडकलेला नायलॉन मांजा वेळेवर काढला जात नसल्याने अपघातांची भीती वाढली आहे.

अडकलेला मांजा काढण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? आणखी किती निरपराध नागरिकांचे जीव धोक्यात घालणार? असा संतप्त सवाल नाशिककरांनी उपस्थित केला आहे. पोलिसांनी नायलॉन मांजावरील कारवाई अधिक कठोर करावी, तर महापालिकेने स्वतंत्र विशेष पथके तयार करून शहरभर शोधमोहीम राबवत अडकलेल्या नायलॉन मांजाची तातडीने विल्हेवाट लावावी, अशी ठाम मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

Nashik, Main
01/01/2026 Page No. 2

सकाळ

# 'ग्रीनफिल्ड कॉरिडॉर'

> पान १ वरून

सहा पदरी ग्रीनफिल्ड कॉरिडॉर विकसित करण्यासह 'राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-३२६' चे ओडिशामध्ये १ हजार ५२६ कोटी रुपये खर्चून २०६ किलोमीटरपर्यंत रुंदीकरण आणि विस्तारीकरण करण्यास मंजुरी दिली. माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकारांशी बोलताना या मंत्रिमंडळ निर्णयांची माहिती दिली.

**प्रकल्पाचे ८० टक्के भूसंपादन पूर्ण**

मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, ''या प्रकल्पाची 'बांधा वापरा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावर उभारणी होणार आहे त्यासाठी ३ हजार १२२ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनाची आवश्यकता असून त्यावर ३ हजार ८५३ कोटी रुपये खर्च होतील. या प्रकल्पासाठी ८० टक्के भूसंपादन झाले आहे. सोळा टक्के जमिनीच्या अधिग्रहणासाठी अधिसूचना जारी करण्यात आल्या आहेत. उर्वरित चार टक्के जमिनीचे संपादन शिल्लक आहे.''

**प्रवासाचा वेळ कमी होणार**

हा महामार्ग ताशी ६० ते १०० किलोमीटर वेग मर्यादेसाठी अनुकूल असेल. यामुळे प्रवासाचा एकूण वेळ अंदाजे सतरा तासांनी कमी होईल. प्रवासी आणि मालवाहू दोन्ही वाहनांसाठी अधिक सुरक्षित, वेगवान आणि विनाव्यत्यय दळणवळणाची सुविधा त्यामुळे उपलब्ध होईल. हा प्रकल्प या क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याबरोबरच नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर या जिल्ह्यांच्या सर्वांगीण आर्थिक विकासात मोलाचे योगदान देईल.

> केंद्रीय मंत्रिमंडळाने महाराष्ट्रातील नाशिक ते सोलापूर या सहा पदरी ग्रीनफिल्ड कॉरिडॉरला मंजुरी दिली आहे. पीएम गतिशक्तीशी सुसंगत असलेला हा परिवर्तनकारी प्रकल्प प्रवासाचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करेल. पश्चिम–पूर्व संपर्क यामुळे अधिक मजबूत होईल. लॉजिस्टिकला चालना मिळून रोजगारनिर्मितीही होऊ शकेल. आर्थिक विकासाला त्यामुळे चालना मिळेल.
>
> - **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

सकाळ

# लाचखोरीत महसूल आघाडीवर

## राज्यात ६८0 सापळे; नाशिक विभागात सर्वाधिक १३८ कारवाया

■ सकाळ वृत्तसेवा

**नामपूर, ता. ३१ : सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित असलेली महसूल व पोलिस खाती म्हणजे लाचखोरीचे अड्डेच बनल्याचे मावळत्या २०२५ वर्षातील आकडेवारीतून उघड झाले आहे. दरवर्षी लाचखोरीत अव्वल राहणाऱ्या पोलिस खात्यालाही मागे टाकत महसूल खात्याने यंदा थेट पहिला क्रमांक पटकावला असून, या विभागाची प्रतिमा चिखलात रुतली आहे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत राज्यभरात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत ६८० प्रकरणांमध्ये सापळे रचून एक हजार सात अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले. या काळात नागरिकांकडून तीन कोटी ५४ लाख ४९ हजार ६९५ रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले आहे.

राज्यातील आठ विभागांपैकी नाशिक विभागात सर्वाधिक १३८ लाचखोरीची प्रकरणे उघडकीस आली असून, हा विभाग भ्रष्टाचाराचा केंद्रबिंदू बनल्याचे चित्र आहे. महसूल खात्यात लाच मागणीच्या १६७ तक्रारी नोंदविण्यात आल्या असून, त्यात ६१ लाख ८९ हजार ९० रुपयांची मागणी झाली. महसूल खात्यातील २४७ अधिकारी व कर्मचारी लाच घेताना पकडले गेले.

त्याउलट पोलिस खात्यात १२० प्रकरणांत ९१ लाख २८ हजार रुपयांची लाच मागितल्याचे समोर आले असून, १७२ पोलिस अधिकारी व कर्मचारी सापळ्यात अडकले. लोकांचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेलेच हात लाचेसाठी पसरले जात असल्याचे हे विदारक वास्तव आहे.

महापालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही लाचखोरीची मुळे खोलवर रुजल्याचे स्पष्ट झाले. महापालिकांमधील ३३ प्रकरणांत ४५ लाख, जिल्हा परिषद व पंचायत समितीतील १४४ प्रकरणांत १९ लाख ७५ हजार, तर महावितरण कंपनीतील ४६ प्रकरणांत ११ लाख रुपयांची लाच मागितल्याचे उघड झाले आहे.

दररोज सरकारी व निमसरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजविणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांची पिळवणूक सर्रास सुरू आहे. लाचखोर अधिकारी पकडले जात असले, तरी शिक्षा टळत असल्याने भ्रष्टाचाराचा सुळसुळाट थांबण्याचे नाव घेत नाही. 'कारवाई होते; पण धडा कुणालाच मिळत नाही' हीच आजची कटू वस्तुस्थिती आहे.

### विभागनिहाय लाचखोरीची प्रकरणे

| | | | |
|---|---|---|---|
| नाशिक | १३८ | नांदेड | ५९ |
| पुणे | १२३ | नागपूर | ५४ |
| छत्रपती संभाजीनगर | १०८ | मुंबई | ४२ |
| ठाणे | ८३ | एकूण प्रकरणे | ६८० |
| अमरावती | ७३ | एकूण आरोपी | १,००७ |

### नाशिक विभाग भ्रष्टाचाराचा गड

राज्यात सर्वाधिक १३८ सापळे नाशिक विभागात यशस्वी झाले; तर नागपूर विभागात केवळ ५४ प्रकरणे उघडकीस आली. लाचखोर गजाआड जात असले, तरी कठोर शिक्षा न झाल्याने लाचखोरीचा आलेख दिवसेंदिवस उंचावत आहे.

### लाच मागितली तर गप्प बसू नका

शासकीय कामासाठी लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या टोलमुक्त क्रमांक १०६४ वर तक्रार करावी. नागरिकांच्या सक्रिय सहभागाशिवाय भ्रष्टाचारमुक्त समाज शक्य नाही, असे विभागाने म्हटले आहे.

सकाळ

# नाशिक- सोलापूरदरम्यान 'ग्रीनफिल्ड कॉरिडॉर'

## केंद्र सरकारकडून १९ हजार कोटींचा निधी; उत्तर अन् दक्षिण महाराष्ट्र जोडला जाणार

### केंद्रीय मंत्रिमंडळ बैठक

■ सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. ३१ : केंद्र सरकारने महाराष्ट्राला नववर्षाची भेट देताना नाशिक ते सोलापूरदरम्यान १९ हजार १४२ कोटी रुपये खर्चाचा सहा पदरी 'ग्रीनफिल्ड कॉरिडॉर' (३७४ किलोमीटर) विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. उत्तर ते दक्षिण महाराष्ट्राला सहापदरी महामार्गाने जोडणारा हा प्रकल्प महाराष्ट्रासह तेलंगण, आंध्रप्रदेश या राज्यांची जीवनरेखा बनेल, असा विश्वास सरकारकडून व्यक्त करण्यात आला आहे.




पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारने उत्तर महाराष्ट्रातील नाशिक ते दक्षिण महाराष्ट्रातील अक्कलकोट (जि. सोलापूर) असा हा पान १० वर »

### वाढवण बंदराशी थेट कनेक्शन

■ या महामार्गामुळे नाशिक ते सोलापूरदरम्यानचे अंतर ४३२ किलोमीटरवरून ३७४ किलोमीटर येणार आहे. या सहापदरी द्रुतगती महामार्गावर २७ मोठे पूल, १६४ लहान पूल, ५.६ किलोमीटरचे व्हायाडक्ट, ५ उड्डाणपूल, १० इंटरचेंजेस, १७ प्रवेश आणि बहिर्गमनाची ठिकाणे असतील. हाच महामार्ग पुढे तेलंगणातील कर्नुल, आंध्र प्रदेशातील कडप्पा या केंद्रांना आणि तेथून पुढे चेन्नईला जोडला जाईल. वाढवण बंदरही या महामार्गाने नाशिकला जोडले जाणार आहे.

सकाळ




पिंपळगाव बसवंत : येथील टोलनाक्याजवळील धोकादायक कटपाईंट बंद करताना उपस्थित पदाधिकारी.

# टोलनाक्यावरील धोकादायक 'कट' अखेर बंद

## पिंपळगाव बसवंत : विरुद्ध बाजूची सर्वच वाहतूक पोलिसांनी रोखावी

■ सकाळ वृत्तसेवा

पिंपळगाव बसवंत, ता. ३१ : येथील टोलनाक्यावरून साकोरे मिग फाट्याकडे जाण्यासाठी विरुद्ध दिशेने वाहने वळवली जात असल्याने सातत्याने अपघातांचा धोका निर्माण झाला होता. या गंभीर बाबीकडे 'सकाळ'ने बुधवारी (ता.३१) लक्ष वेधताच अखेर हा धोकादायक 'कट' बंद करण्यात आला. पिंपळगाव येथील भाजप पदाधिकाऱ्यांनी युवानेते बापूसाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली टोलनाक्यावर धडक देत हा प्रकार थांबवला असून, पुन्हा असा प्रकार सुरू झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा टोल प्रशासनाला देण्यात आला आहे.

मंगळवारी (ता.३०) सकाळी ओझरहून पिंपळगावकडे दुचाकीवरून येणाऱ्या मनीषा निरभवणे या शिक्षिकेला कादवा नदी पुलावर पाठीमागून येणाऱ्या कारने जोरदार धडक दिल्याने जागीच मृत्यू झाला. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, पिंपळगावहून साकोरे मिग फाट्याकडे जाण्यासाठी विरुद्ध बाजूने येणाऱ्या बेशिस्त वाहनचालकामुळेच हा अपघात घडला. या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर या अपघातामागील नेमकी कारणे आणि टोलनाक्यावरील बेशिस्त वाहतुकीचा धोका 'सकाळ'ने बुधवारच्या अंकात सविस्तरपणे मांडला होता. या वृत्ताची दखल घेत भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी तत्काळ हालचाली करत टोलनाक्यावर आंदोलनास्त्र उगारले. बापूसाहेब पाटील, प्रशांत घोडके, संदीप झुटे, महेंद्र ठाकरे, सचिन कायस्थ आदी उपस्थित होते. ज्या ठिकाणाहून वाहने चुकीच्या दिशेने वळवली जात होती, तो मार्ग पूर्णपणे बंद करण्यात आला. हा प्रकार पुन्हा सुरू झाल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा स्पष्ट इशारा टोल प्रशासनाला देण्यात आला.

टोलनाक्यावरील या धोकादायक वाहतुकीमुळे यापूर्वीही अनेकदा अपघात झाले असून, नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही टोल प्रशासनाकडून दुर्लक्ष झाले होते. 'सकाळ'च्या वृत्तानंतर झालेल्या या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

> टोलप्रशासनाच्या बेफिकिरीमुळे निर्माण झालेला कट पॉइंट हा मौत का कुवा ठरत होता. आतापर्यंत १५ नागरिकांचे कटपाईटमुळे अपघाती निधन झाले. हा धोकादायक मार्ग आता बंद करण्यात आला आहे. टोल प्रशासनाने हा मार्ग पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.
>
> **- बापूसाहेब पाटील,** युवा नेते, भाजप, पिंपळगाव बसवंत

> कटपाईटमुळे होणारे अपघात लक्षात घेऊन तो बंद करण्यात आला आहे. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून अपघात टाळावे.
>
> **- आत्माराम नयळे,** व्यवस्थापक, पीएनजी टोल वे, पिंपळगाव बसवंत

सकाळ

# मनपाकडून त्र्यंबक रस्त्यावर अतिक्रमण निर्मूलन मोहीम

**जुने नाशिक, ता. ३१ :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीसाठी महापालिका प्रशासन सज्ज झाले आहे. या पार्श्वभूमीवर त्र्यंबक रोडचे रुंदीकरण आणि फुटपाथवरील अतिक्रमणांची समस्या सोडविण्यासाठी महापालिका आयुक्त मनीषा खत्री आणि अतिक्रमण उपायुक्त डॉ. संगीता नांदूरकर यांनी त्र्यंबक रोडचा पाहणी दौरा केला. दरम्यान, पश्चिम विभागाच्या अतिक्रमण विभागातर्फे जिल्हा रुग्णालय परिसरात धडक मोहीम राबवून फुटपाथवरील अतिक्रमणे हटविण्यात आली.

अवघ्या दीड ते दोन वर्षांवर सिंहस्थ कुंभमेळा येऊन ठेपला असून, यावेळी भाविकांची लाखोंच्या संख्येने हजेरी लागण्याची शक्यता आहे. वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता भाविकांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये, त्यांची गैरसोय टाळावी आणि अतिक्रमणामुळे शहराचे विद्रुपीकरण होऊ नये, या उद्देशाने महापालिकेतर्फे नियोजन केले जात आहे. त्र्यंबक रस्ता आणि फुटपाथ पूर्णपणे अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत.

बुधवारी (ता. ३१) जिल्हा रुग्णालय ते ठक्कर बाजार, सीबीएस तसेच त्र्यंबक रोडवरील अतिक्रमणांची व रस्ता रुंदीकरणाच्या कामाची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात पश्चिम विभागाचे बांधकाम उपअभियंता प्रशांत बोरसे, नगररचना विभागाचे अजय खोजे, आरोग्य निरीक्षक गायकवाड आणि उद्यान निरीक्षक दीपक बोडके सहभागी झाले होते. यावेळी आयुक्त खत्री यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना कामाचे त्वरित नियोजन करण्याच्या सूचना व आदेश दिले. मोहिमेदरम्यान विनायक जाधव, विभाग प्रमुख प्रवीण बागूल, सुनील कदम, मोहन भांगरे, बापू लांडगे, जावेद शेख, संजय सूर्यवंशी, संतोष पवार आदींनी कारवाई पूर्ण केली.

Nashik, Nashik-Today
01/01/2026 Page No. 2

सकाळ

# औद्योगिक विकासाचा वारू यंदा धावणार

## सिन्नरला दोन नव्या औद्योगिक वसाहती, थर्मल पॉवरही सुरू होणार : पंधरा हजार रोजगारनिर्मिती

■ संपत ढोली : सकाळ वृत्तसेवा

**सिन्नर, ता. ३१ : सिन्नरच्या औद्योगिक विकासाला नवीन २०२६ वर्ष चालना देणारे ठरणार आहे. माळेगाव येथील टप्पा क्रमांक एकचे काम दोन महिन्यांत मार्गी लागणार आहे, तसेच सिन्नर थर्मल पॉवर प्रकल्प सुरू होणार आहे. त्यामुळे जवळपास दोन्ही प्रकल्पांत १५ हजारांवर तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नवीन वर्ष सिन्नरच्या औद्योगिक विकासासाठी आशादायी आहे.**

सिन्नर औद्योगिक वसाहतीत गत वीस वर्षांत एकही नवीन प्रकल्प आलेला नाही. त्यामुळे येथील औद्योगिक विकास जणू काही थांबला होता. गेल्या तीन महिन्यापासून येथील औद्योगिक विकासाला चालना देणाऱ्या घडामोडी घडत असल्याने नवीन वर्षात औद्योगिक विकासाला चालना मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

माळेगाव औद्योगिक वसाहतीचा विस्तार करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या आहेत.

**सकाळ ★ EXCLUSIVE ★**

सुमारे ३९० एकर जमिनीचे संपादन होऊन सहा वर्षे लोटली आहेत. परंतु, स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी काळ्याच्या संदर्भात वाद सुरु होता. त्यास औद्योगिक विकास महामंडळाच्या वरिष्ठ समितीने मंजुरी दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या सहमतीने या क्षेत्रासाठी रस्त्याकरीता जागा संपादित करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. त्याची संयुक्त मोजणी दोन महिन्यात होणार आहे. त्यानंतर टप्पा क्रमांक एकमधील भूखंडांचा आराखडा तयार करण्याला वेग येणार असल्याने माळेगावचे औद्योगिक क्षेत्र विस्तारून किमान १० ते १२ हजार कामगारांना रोजगार उपलब्ध होणार आहे.



सिन्नर : येथील माळेगाव औद्योगिक वसाहत

### थर्मलची प्रक्रियाही पूर्ण होणार

■ दिल्ली येथील कंपनी न्यायाधिकरणाने महाजनको व एनटीपीसी यांना सिन्नर थर्मल पॉवर प्रकल्पाचा ताबा नुकताच दिला आहे. त्याची पुढील प्रक्रिया दोन महिन्यात पूर्ण होणार आहे. प्रकल्प सुरू करण्याच्या हालचालीही वेगाने होत आहेत. त्यामुळे हा प्रकल्प कार्यान्वित होणार असून किमान प्रत्यक्षात एक हजार व अप्रत्यक्षपणे पाच ते सात हजार युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

### दोन औद्योगिक वसाहती येणार

■ माळेगाव औद्योगिक वसाहतीजवळच मापारवाडी शिवारातील औद्योगिक वसाहतीसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरु आहे. चिंचोली शिवारातही औद्योगिक वसाहतीची जागा निश्चित झाली आहे. त्यामुळे तालुक्यात नव्याने या दोन वसाहती स्थापित होणार आहेत. या वसाहतींमुळेही सिन्नरचा औद्योगिक विकासाचा वेग झपाट्याने वाढणार आहे.

साईमत

# सिंहस्थ कुंभमेळा स्वच्छता मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे: आयुक्त

**नाशिक। प्रतिनिधी ।**

-त्र्यंबकेश्वर येथे 2027 मध्ये कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. हा कुंभमेळा स्वच्छ, हरित व पर्यावरणपूरक होण्यासाठी स्वच्छता अत्यंत महत्वाची आहे. 3 जानेवारी 2026 रोजी त्र्यंबकेश्वर शहरातून या स्वच्छता मोहिमेचा प्रारंभ होत असून जास्तीत जास्त नागरिक, संस्था यांनी सहभागी होवून ही मोहिम यशस्वी करावी, असे आवाहन कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले.

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण सभागृहात आयोजित बैठकीत आयुक्त श्री. सिंह बोलत होते. यावेळी निमाचे अध्यक्ष आशिष नहार, क्रेडाईचे सचिव तुषार संकेलचा, जिल्हा शासकीय रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दयानंद देशमुख, त्र्यंबकेश्वर शासकीय औद्योगिक संस्थेचे



प्राचार्य डॉ. एन बी गुरूळे, राहुल देशमुख, डॉ. प्रफुल्ल कांबळे, भुजबळ नॉलेज सिटी एमईटीचे प्रा. योगेश वानखेडे, प्रा. डॉ रणवीर कोरके, संदिप फाउंडेशनचे प्रा. डॉ.सुनील महाजन, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिलचे सचिव शंतनु देशपांडे, स्वदेश फाउंडेशनचे बाळासाहेब माने, गुरू गोविंद सिंग महाविद्यालयाचे प्रा. दीपक पाटील, प्रा. गणेश वाघ, जीईएस ॲण्ड आर.एच सपट कॉलेजचे प्रा. डी.एस. चौधरी, हरित कुंभ समितीचे सदस्य संकेत मेढेकर यांच्यासह विविध महाविद्यालये, शिक्षण संथा, विविध सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आयुक्त श्री. सिंह म्हणाले की, शनिवार 3 जानेवारी 2026 रोजी सकाळी 8 वाजता त्र्यंबकेश्वर शहरातून या स्वच्छता मोहीमेचा शुभारंभ होणार आहे. या मोहिमेत संगम घाट व गौतम तलाव परिसर वेताळ महाराज मंदिर परिसर, आखाडा पार्किंग परिसर, निवृत्ती महाराज चौक, गौतम तलाव पूल येथे विशेष स्वच्छता करण्यात येणार आहे. या मोहिमेत शासकीय विभागांसह स्वयंसेवी संस्था , नागरी समाज संस्था व स्वयंसेवक गट, धार्मिक ट्रस्ट व सामाजिक संस्था, युवक व समुदाय-आधारित स्वयंसेवी संस्था, आरोग्य, पाणी, स्वच्छता व स्वच्छतागृह क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयीन स्वयंसेवक, विद्यार्थी समिती, रहिवासी कल्याण संघ व स्थानिक समुदाय स्वयंसेवक, ब्रह्मगिरी/ त्र्यंबक परिसराला सहकार्य करणारे साहसी व ट्रेकिंग गट या सर्वांना सहभागी करून घेतले जाणार आहे. यापुढेही वेळोवेळी राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमांसाठी सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून निधी उपलब्धेसाठी संस्थाचे योगदान महत्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सार्वमत

# प्रशासकीय यंत्रणांनी अतिरिक्त मनुष्यबळासाठी आवश्यक सेवा-सुविधांचा आराखडा १५ जानेवारीपर्यंत सादर करावा : आयुक्त शेखर सिंह

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा यशस्वी व सुरळीत पार पाडण्यासाठी विविध शासकीय यंत्रणांना अतिरिक्त मुनष्यबळाची आवश्यकता आहे. सर्व प्रशासकीय यंत्रणांनी या अतिरिक्त मनुष्यबळासाठी कुंभ कालावधीत लागणाऱ्या आवश्यक सेवा- सुविधांचा अंदाजित आराखडा 15 जानेवारी 2026 पर्यंत सादर करावा, असे निर्देश कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभहमेळा प्राधिकरण सभागृहात आयोजित बैठकीत आयुक्त श्री. सिंह बोलत होते. यावेळी महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, आरोग्य उपसंचालक डॉ. कपिल आहेर, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.चारूदत्त शिंदे, आरोग्य सहाय्यक संचालक डॉ. योगेश चित्ते, विभागीय वाहतूक अधिकारी किरण



भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दीपक लोणे, महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ प्रशांत शेटे, तहसीलदार प्रदीप वर्पे, इंडियन सिक्युरिटी प्रेसचे व संयुक्त महाप्रबंधक शैलेश अवचट, उप महाप्रबंधक अर्पित थवन यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

आयुक्त श्री सिंह म्हणाले की, प्रत्येक शासकीय विभागाने जिल्ह्याबाहेरून तैनात करण्यात येणाऱ्या मनुष्यबळासाठी त्यांचे निवास, जेवण-पाणी व्यवस्था, वाहतूक, आवश्यक वैद्यकीय सुविधा, व इतर कल्याणकारी बाबींचा सूक्ष्म विचार करून नियोजन करावे. विहित नमुन्यात आराखडा सादर करताना जिल्ह्यातील, जिल्ह्याबाहेरील, पदनिहाय वर्ग 1 ते 4 या श्रेणीनुसार, आगमनाचा दिनांक, मुक्कामाचा कालावधी, मुक्कामाचे ठिकाण, तैनातीचे ठिकाण यानुसार माहिती सादर करणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागाने तैनात करण्यात येणाऱ्या अतिरिक्त मनुष्यबळांचे शहरातील स्थळे निश्चित करावीत. त्यांच्या रहिवासाच्या व्यवस्थेसाठी मंगल कार्यालये, धर्मशाळा, आश्रम यासारख्या संस्थांना प्रत्यक्ष भेट देवून तेथील उपलब्ध सेवा-सुविधांची पाहणी करूनच ती निश्चित करावीत. ज्या ठिकाणी 2 हजार पेक्षा कमी मनुष्यबळ वास्तव्यास राहणार आहेत त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रत्येक दिवशी फिरत्या बाह्यरूग्ण शिबिराची व्यवस्था करावी व ज्या ठिकाणी 5 हजार पेक्षा जास्त मनुष्यबळ वास्तव्यास राहणार आहे त्याठिकाणी कायमस्वरूपी आरोग्य यंत्रणा कार्यरत ठेवण्याबत त्यांनी सूचित केले.

पोलिस विभागासाठी जिल्ह्याबाहेरून येणाऱ्या मनुष्यबळासाठी पावसाळा कालावधीत रेनकोट व सहसाहित्य उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक दायित्व निधीसाठी प्रयत्न करावेत. तसेच कुंभ पर्वणी काळात या मनुष्यबळाची वाहतुक व्यव्यस्थेचेही नियोजन करण्यासह आरोग्य सेवा, दोन्ही वेळेच्या भोजनासाठी मध्यवर्ती स्वयंपाकघर, निवासस्थांनाच्या ठिकाणी वेळेत भोजन पोहचविण्याची व्यवस्था यांचे चोख नियोजन करण्याच्या सूचना आयुक्त श्री. सिंह यांनी दिल्या.

मनुष्यबळाच्या निवासासाठी इंडिया सिक्युरिटी प्रेसचे नेहरूनगर येथे असलेले रिक्त असलेल्या निवासस्थानाच्या दुरूस्तीबाबत व ही निवासस्थाने तात्पुरत्या स्वरूपात सुपूर्द करण्यात बाबतच्या आवश्यक परवानग्या याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना महानगरपालिका आयुक्त श्रीमती खत्री यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

लोकमत

# कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीत १०८ कोटींच्या कामांना मंजुरी : डॉ. गेडाम

## प्रशासकीय विभागांनी तातडीने ना हरकतीचे दाखले द्यावेत

नाशिक। प्रतिनिधी।

**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाच्या आज झालेल्या बैठकीत कुंभमेळ्याशी निगडित 108 कोटी 27 लाख रुपये खर्चाच्या विविध विकास कामांना मंजुरी देण्यात आली. तसेच कुंभमेळ्याशी संबंधित विकास कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी लवकरात लवकर ना हरकतीचे दाखले देण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले. प्राधिकरणाशी संबंधित यंत्रणांच्या बैठकीचे दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून आज दुपारी आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.**

प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता प्रशांत औटी, अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. कपिल आहेर, लेखा व कोषागारे विभागाचे सह संचालक बी. डी. पाटील, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता श्री. शुल, श्री. लटपटे, त्र्यंबकेश्वर नगरपालिकेचे मुख्याधिकारी राहुल पाटील, शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सतीश दिघे, रेल्वेचे मनीषकुमार, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक किरण भोसले यांच्यासह वरीष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

या बैठकीत त्र्यंबकेश्वर येथे नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकामास प्रशासकीय



मंजुरी देणे, खेरवाडी, सुकेणे, ओढा, देवळाली या रेल्वे स्थानकांवर पाणीपुरवठा विषयक कामांना प्रशासकीय मंजुरी देणे, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेतर्गत भूसंपादित व अधिग्रहित जागांचे सर्वेक्षण व अनुषंगिक कामांसाठी सर्वेक्षण सल्लागार नेमणुकीसाठी प्रशासकीय मंजुरी देणे, सिंहस्थ कुंभमेळा आराखडा योजनेंतर्गत त्र्यंबकेश्वर येथील विविध दहा आखाड्यांमध्ये टॉयलेट ब्लॉक, अंतर्गत रस्त्यांच्या कामांसह अनुषंगिक कामांना प्रशासकीय मंजुरी देणे, त्र्यंबकेश्वर परिसरातील वीज पुरवठा यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी आवश्यक कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात येणार आहे. श्री क्षेत्र सप्तश्रृंग गड येथे नवीन बसस्थानकाचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी दिली आहे. या सर्व कामांमुळे त्र्यंबकेश्वर व वणी परिसरातील पायाभूत सोयीसुविधा बळकट होऊन येणाऱ्या भाविकांना विविध सोयी सुविधा प्राप्त होणार आहेत.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले की, कुंभमेळ्यासाठी आता कमी कालावधी राहिला आहे. प्रत्येक विभागाने मार्च 2027 पूर्वी कामे पूर्ण होतील, असे नियोजन करावे. कामांच्या पूर्ततेसाठी आवश्यक ना हरकत दाखले देण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असेही सांगितले. कुंभमेळा आयुक्त श्री. सिंह यांनी त्र्यंबकेश्वर येथे सोयीसुविधांसाठी आवश्यक कामांची माहिती दिली. मनपा आयुक्त श्रीमती खत्री यांनी कामांसाठी ना हरकत दाखले देण्यासाठी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची तर जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी प्रशासकीय इमारतीस आवश्यक जागा, भूसंपादन व अधिग्रहित जमीनीबाबतची माहिती बैठकीत दिली. या कामांमुळे त्र्यंबकेश्वर शहरात मंदिर परिसरात भव्य कॅरीडॉर उभारणे, भाविकांना रेल्वे स्टेशनवर येणाऱ्या भाविकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणे, त्र्यंबकेश्वर येथे साधुग्राम, वाहनतळ, निवाराशेड यांचे नियोजनबद्ध कामास मदत होणे, शहरातील आखाड्यांना मागणीनुसार कामे होण्यास, कुंभमेळा कालावधीत अखंड, सुरक्षित, व विश्वासार्ह वीजपुरवठा होण्यास, सप्तश्रृंग गड येथे भाविकांची सुखकर प्रवासाची सोय करून सिंहस्थ कुंभमेळा यशस्वीपणे पार पाडण्यास मदत होणार आहेत.

Nashik Edition
Jan 01, 2026 Page No. 2
Powered by: eeelego.com

दै.नवराष्ट्र

दि.१ जानेवारी,२०२६

ePaper
नवराष्ट्र Nashik | 01 January 2026 | Page 4 | navarashtra.com

सिंहस्थ \ त्र्यंबकेश्वर येथून ३ जानेवारीला होणार स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ

# पर्यावरणपूरक कुंभमेळयासाठी सर्वांनी पुढे या

▸ **नाशिक (प्र.)** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. हा कुंभमेळा स्वच्छ, हरित व पर्यावरणपूरक होण्यासाठी स्वच्छता अत्यंत महत्वाची आहे. ३ जानेवारी रोजी त्र्यंबकेश्वर शहरातून या स्वच्छता मोहिमेचा प्रारंभ होत असून, जास्तीत जास्त नागरिक, संस्था यांनी सहभागी होऊन ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण सभागृहात आयोजित बैठकीत आयुक्त सिंह बोलत होते. यावेळी निमाचे अध्यक्ष आशिष नहार, क्रेडाईचे सचिव तुषार संकेलचा, जिल्हा शासकीय रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दयानंद देशमुख आदी उपस्थित होते.



## संगम घाट, गौत मतलाव, वेताळ महाराज मंदिर परिसरात राबवणार मोहीम

ते म्हणाले की, शनिवार (दि. ३) रोजी सकाळी ८ वाजता त्र्यंबकेश्वर शहरातून या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ होणार आहे. या मोहिमेत संगम घाट व गौतम तलाव परिसर, वेताळ महाराज मंदिर परिसर, आखाडा पार्किंग परिसर, निवृत्ती महाराज चौक, गौतम तलाव पूल येथे विशेष स्वच्छता करण्यात येणार आहे. या मोहिमेत शासकीय विभागांसह स्वयंसेवी संस्था, नागरी समाज संस्था व स्वयंसेवक गट, धार्मिक ट्रस्ट व सामाजिक संस्था, युवक व समूदाय-आधारित स्वयंसेवी संस्था, आरोग्य, पाणी, स्वच्छता व स्वच्छतागृह क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयीन स्वयंसेवक, विद्यार्थी समिती, रहिवासी कल्याण संघ व स्थानिक समुदाय स्वयंसेवक, ब्रह्मगिरी/त्र्यंबक परिसराला सहकार्य करणारे साहसी व ट्रेकिंग गट या सर्वांना सहभागी करून घेतले जाणार आहे. यापुढेही वेळोवेळी राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमांसाठी सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून निधी उपलब्धेसाठी संस्थाचे योगदान महत्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. स्वच्छ कुंभसाठी अशा प्रकाराच्या स्वच्छता मोहिमांचे आयोजन यापुढेही ठराविक कालावधीनुसार आयोजित केले जाणार आहेत. आपले शहर, आपला कुंभमेळा ही जाणीव मनात ठेवून मोहिमाच्या व्यापक प्रसिद्धीसाठी व नागरिक व संस्थांचा सहभाग वाढविण्यासाठी माध्यमे व संवाद भागीदार, स्थानिक माध्यम संस्था, रेडिओ, डिजिटल प्रचार भागीदार यांचे सहकार्य अपेक्षित आहे.

ePaper
नवराष्ट्र Nashik | 01 January 2026 | Page 4 | navarashtra.com

# जिल्हा रुग्णालयासमोर अतिक्रमण मोहीम

## कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने राबविली विशेष मोहीम

▶ नाशिक (प्र.) कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील अतिक्रमण रडारवर आली असून बुधवारी सकाळी जिल्हा रुग्णालय समोरील फुटपाथवर असणाऱ्या चहाच्या टपऱ्या आणि खाद्यपदार्थांचे दुकाने हटविण्यात आले. अतिक्रमणाचा विळखा पडलेल्या जिल्हा रुग्णालयाने मोकळा श्वास घेतला आहे.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पायाभूत सुविधांचे कामे हाती घेण्यात आले असून अतिक्रमणे हटवून वाहतूक सुरळीत करण्यासह येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारण्यात येणार आहेत. महानगरपालिका आणि कुंभमेळा विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने अतिक्रमण निर्मूलन मोहीम तीव्र करण्यात आली आहेत. नाशिक त्र्यंबकेश्वर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम लवकरच सुरु केले जाणार आहे. या रस्त्यावर असणाऱ्या महत्त्वाच्या ठिकाणी अतिक्रमण हटवण्यास बुधवारपासून सुरुवात झाली आहे. आज सकाळी मोठ्या बंदोबस्तात सुमारे ५० हुन कर्मचाऱ्यांच्या मदतीने जिल्हा रुग्णालया समोरील अतिक्रमण हटविण्यात आले. येथे असणाऱ्या फुटपाथवर चहाच्या टपऱ्या आणि खाद्यपदार्थांचे दुकाने असल्याने या ठिकाणी मोठी ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत होती. ग्राहक वाहने रस्त्यावर लावत असल्याने वाहतुकीला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत होता. दरम्यान अतिक्रमण काढल्याने येथील वाहतूक कोंडी टळली असून जिल्हा रुग्णालय देखील अतिक्रमणाच्या विळख्यातून मोकळे झाले आहे.



### तीस ठिकाणचे अतिक्रमण हटाव मोहीम राबवणार

कुंभमेळ्याच्या तयारीसाठी प्रशासनाकडे जवळपास एक वर्षाचा कालावधी हाती असल्याने पायभूत सोयीसुविधांचे काम वेग पकडणार आहे. हि कामे करतांना अडथळा ठरणारी अतिक्रमणे काढणे अत्यावश्यक असल्याने अतिक्रमण निर्मूलन मोहीम तीव्र केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात रामकुंड परिसर, नाशिक त्र्यम्बक रास्ता, शाही मार्गपरिसरासह शहरातील तीस ठिकाणचे अतिक्रमणे काढली जाणार आहे.

ePaper
नवराष्ट्र Nashik | 01 January 2026 | Page 2 | navarashtra.com

# आपत्ती व्यवस्थापनात समन्वय राखा

▶ **नाशिक (प्र)** सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठी सुरक्षिततेच्या दृष्टीने आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सूत्रबद्ध नियोजन सुरू आहे. यात शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक या सर्वांचा एकात्मिक दृष्टकोन महत्वाचा असल्याचे कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी कार्यशाळेत मागदर्शन करताना सांगितले.

नाशिक-त्र्यंबकेश्वर विकास प्राधिकरण नाशिक मार्फत नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने तात्याश्री लॉन्समधील आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

या कार्यशाळेच्या माध्यमातून प्रत्येक विभागाची आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने करावयाची मानसिक तयारी, नियोजन व येणारे दीड वर्ष आपत्ती निवारणासाठीचा नियमित सराव यावर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. यामुळे प्रत्येक विभागाला आपली जबाबदारी समजणे व सूक्ष्म नियोजन करणे सुलभ होणार आहे.



## शहरातील या ठिकाणच्या कामांचे नियोजन तयार

नाशिक शहर व त्र्यंबकेश्वर येथील आपत्ती व्यवस्थापन व्यवस्था स्वतंत्रपणे कार्यरत राहील हे लक्षात घेवून येथील पार्किंग, होल्डिंग, व्यासपीठ क्षेत्र, भाविक / अमृत स्नान मार्ग, घाट, साधुग्राम, रेल्वे स्थानक, बसस्थानक आदी बाबींवर प्राथमिक स्वरूपात नियोजन संबंधित प्रत्येक विभागाने करावयाचे आहे. त्यानंतर यास विभागीय एकात्मतेसह अंतिम नियोजन पुढील कार्यशाळांमध्ये निश्चित करता येईल, असे आयुक्त श्री सिंह यांनी सांगितले. नाशिकमध्ये होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा स्वच्छ, हरित, सुंदर व सुरिक्षत करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनास प्राधान्य देवून या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. 'आपत्ती' म्हणजे कोणत्याही क्षेत्रात घडणारी मोठ्या प्रमाणावरील दुर्घटना, अपघात, आपत्तीजन्य घटना किंवा गंभीर प्रसंग. ही घटना नैसर्गिक कारणांमुळे किंवा मानवनिर्मित कारणांमुळे, तसेच अपघात किंवा निष्काळजीपणामुळे उद्भवू शकते, असेही शेखर सिंह यावेळी म्हणाले.

सिंहस्थ कुंभमेळा तयारीच्या अनुषंगाने लागणारे आवश्यक मनुष्यबळासाठी इतर जिल्ह्यातील अधिकारी यांचे आतापासून सेवावर्ग आदेश निर्गमित करण्यात येणार आहेत. जेणेकरून नियुक्त अधिकाऱ्यांना त्यांची सेवा दिलेल्या विभागाबाबत माहिती घेवून आपत्ती व्यवस्थापनासाठी बारकाईने अभ्यास करून योग्य नियोजन करता येईल. लवकरच प्रत्येक विभागासाठी चर्चा अधारित प्रशिक्षण सत्राचे होणार आहे.

दै.नवभारत

दि.१ जानेवारी,२०२६

ePaper
नवभारत Nashik | 01 January 2026 | Page 2 | navbharatlive.com

# हरित कुंभ में जन भागीदारी होना जरूरी

## त्र्यंबकेश्वर में 3 जनवरी से विशेष स्वच्छता अभियान, कुंभ मेला आयुक्त की अपील

### घाट और तालाब परिसर की सफाई

■ नाशिक, ब्यूरो. वर्ष 2027 में नाशिक-त्र्यंबकेश्वर में आयोजित होने वाले सिंहस्थ कुंभमेले को स्वच्छ, हरित और पर्यावरण के अनुकूल बनाने के लिए प्रशासन ने कमर कस ली है. कुंभमेला विकास प्राधिकरण के आयुक्त शेखर सिंह ने घोषणा की है कि इस बड़े लक्ष्य की दिशा में 3 जनवरी 2026 से त्र्यंबकेश्वर शहर में एक व्यापक स्वच्छता अभियान शुरू किया जाएगा. उन्होंने अधिक से अधिक नागरिकों और संस्थाओं से इस अभियान को सफल बनाने का आह्वान किया है. कुंभमेला विकास प्राधिकरण के सभागार में आयोजित समन्वय बैठक में आयुक्त शेखर सिंह बोल रहे थे. इस अवसर पर निमा के अध्यक्ष आशीष नहार, क्रेडाई के सचिव तुषार संकेलचा, जिला अस्पताल के चिकित्सा अधिकारी डॉ. दयानंद देशमुख सहित विभिन्न महाविद्यालयों, शिक्षण संस्थानों और गैर-सरकारी संगठनों के प्रतिनिधि उपस्थित थे.



### निजी संस्थाएं ले घाटों को गोद

- घाटों और सार्वजनिक स्थलों पर होगा विशेष ध्यान आयुक्त सिंह ने बताया कि शनिवार, 3 जनवरी 2026 को सुबह 8 बजे से शुरू होने वाले इस अभियान के तहत संगम घाट, गौतम तालाब परिसर, वेताल महाराज मंदिर, अखाड़ा पार्किंग, निवृत्ति महाराज चौक और गौतम तालाब पुल जैसे प्रमुख स्थानों पर विशेष सफाई की जाएगी.
- इस मुहिम में सरकारी विभागों के साथ-साथ धार्मिक ट्रस्ट, सामाजिक संस्थाएं, एनसीसी, एनएसएस के स्वयंसेवक, ट्रेकिंग समूह और रेजिडेंट वेलफेयर एसोसिएशन को भी शामिल किया जाएगा. संस्थाओं से घाट गोद लेने की अपील स्वच्छ कुंभ के उद्देश्य को प्राप्त करने के लिए आयुक्त ने सुझाव दिया कि शहर के कॉलेज और औद्योगिक संस्थान स्वेच्छा से एक-एक घाट 'दत्तक' (गोद) लें, ताकि वहां नियमित अंतराल पर स्वच्छता सुनिश्चित की जा सके.

### नुक्कड़ नाटकों से की जाएगी जनजागृति

इसके अलावा, उन्होंने स्वच्छता जागरूकता रैली और नुक्कड़ नाटकों के आयोजन पर भी जोर दिया. आयुक्त सिंह ने सेवाभावी संस्थाओं से अपील की कि वे अभियान में भाग लेने वाले स्वयंसेवकों के लिए आवश्यक सामग्री जैसे झाड़ू, डस्टबिन, फावड़ा, मास्क, दस्ताने, सैनिटाइजर और टी-शर्ट उपलब्ध कराने में अपना योगदान दें. उन्होंने यह भी स्पष्ट किया कि भविष्य में समय-समय पर ऐसी मुहिम चलाने के लिए 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' फंड के माध्यम से वित्तीय सहायता महत्वपूर्ण होगी.

हमारा महानगर

epaper.hamaramahanagar.net
01 Jan 2026 - Page 5

# ज्यादा से ज्यादा नागरिक सफाई अभियान में हिस्सा लें : शेखर सिंह

**3 जनवरी को त्र्यंबकेश्वर से होगा शुरू यह अभियान**

महानगर नेटवर्क

नाशिक

2027 में नाशिक-त्र्यंबकेश्वर में कुंभ मेला लगेगा। इस कुंभ मेले को साफ, हरा-भरा और पर्यावरण के अनुकूल बनाने के लिए सफाई बहुत जरूरी है। यह सफाई अभियान 3 जनवरी 2026 को त्र्यंबकेश्वर शहर से शुरू हो रहा है और ज्यादा से ज्यादा नागरिक और संस्थाएं इसमें हिस्सा लें और इस अभियान को सफल बनाएं, कुंभ मेला डेवलपमेंट अथॉरिटी के कमिश्नर शेखर सिंह ने यह अपील की। कमिश्नर श्री सिंह नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभ मेला अथॉरिटी हॉल में आयोजित एक मीटिंग में बोल रहे थे। इस अवसर पर एनआईएमए अध्यक्ष आशीष नहार, क्रेडाई सचिव तुषार संकेलचा, जिला सरकारी अस्पताल के चिकित्सा अधिकारी डॉ. दयानंद देशमुख, त्र्यंबकेश्वर सरकारी



औद्योगिक संस्थान के प्राचार्य डॉ. एन. बी. गुरुले, राहुल देशमुख, डॉ. प्रफुल्ल कांबले, भुजबल नॉलेज सिटी एमईटी प्रो. योगेश वानखेड़े, प्रो. डॉ. रणवीर कोरके, संदीप फाउंडेशन के प्रो. डॉ. सुनील महाजन, राष्ट्रीय रियल एस्टेट विकास परिषद के सचिव शांतनु देशपांडे, स्वदेश फाउंडेशन के बालासाहेब माने, गुरु गोबिंद सिंह कॉलेज के प्रो. दीपक पाटिल, प्रो. गणेश वाघ, जीईएस और आरएच सप्त कॉलेज के प्रो. डी.एस. चौधरी, हरित कुंभ समिति के सदस्य संकेत मेढेकर के साथ-साथ विभिन्न कॉलेजों, शैक्षणिक संस्थानों और विभिन्न धर्मार्थ संगठनों के प्रतिनिधि उपस्थित थे। इस ड्राइव में संगम घाट और गौतम तलाव एरिया, वेताल महाराज मंदिर एरिया, अखाड़ा पार्किंग एरिया, निवृत्ति महाराज चौक, गौतम तलाव पूल पर खास सफाई की जाएगी। इस ड्राइव में सरकारी डिपार्टमेंट के साथ NGO, सिविल सोसाइटी ऑर्गनाइजेशन और वॉलंटियर ग्रुप, धार्मिक ट्रस्ट और सोशल ऑर्गनाइजेशन, यूथ और कम्युनिटी-बेस्ड NGO, हेल्थ, पानी, सफाई और सैनिटेशन सेक्टर के NGO, कॉलेज वॉलंटियर, स्टूडेंट कमेटियां, रेजिडेंट वेलफेयर एसोसिएशन और लोकल कम्युनिटी वॉलंटियर, ब्रह्मगिरी/त्र्यंबक एरिया को सपोर्ट करने वाले एडवेंचर और ट्रेकिंग ग्रुप शामिल होंगे। उन्होंने कहा कि समय-समय पर चलाए जाने वाले सफाई ड्राइव के लिए सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंड से फंड देने में ऑर्गनाइजेशन का योगदान अहम होगा। स्वच्छ कुंभ के लिए ऐसे सफाई अभियान अब से रेगुलर इंटरवल पर ऑर्गनाइज किए जाएंगे।

## सफ़ाई कैंपेन में हिस्सा लेने की कमिश्नर ने की अपील

कमिश्नर श्री सिंह ने चैरिटेबल ऑर्गनाइज़ेशन से अपील की कि वे इस सफ़ाई कैंपेन में हिस्सा लेने वाले नागरिकों को सफ़ाई का सामान जैसे झाड़ू, डस्टबिन, फावड़े, बोर्ड, मास्क, ग्लव्स, कपड़े के बैग, टी-शर्ट, हाथ धोने का सामान, सैनिटाइज़र वगैरह देकर अच्छी-खासी मदद करें। इस समय सफ़ाई कैंपेन के बारे में मौजूद चैरिटेबल ऑर्गनाइज़ेशन, कॉलेज के रिप्रेज़ेंटेटिव और इंडस्ट्रियल ऑर्गनाइज़ेशन के रिप्रेज़ेंटेटिव के कॉन्सेप्ट और राय जानी गई।

दै.लोकमत टाईम्स

दि.१ जानेवारी,२०२६

LOKMAT TIMES

LOKMAT TIMES • Anchor

# Pedestrians left with no space to walk

## Illegal parking and encroachments choke city footpaths

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, DEC 31



Footpaths meant for pedestrians are no longer usable for walking in many parts of the city. Instead, they are occupied by vendors and even used by speeding vehicles. Footpaths that were already encroached upon by hawkers, handcarts and stalls are now being taken over by vehicles as well, creating a serious safety risk for pedestrians.

As a result, traffic congestion is common in areas such as Raviwar Karanja, Main Road, Mahatma Gandhi Road, Panchavati Karanja, Dwarka, Mumbai Naka, Chandak Circle and MICO Circle. At the same time, citizens are left asking an exasperated question: where are they supposed to walk?

In busy areas like major junctions and markets, or around schools, colleges and hospitals, footpaths are crowded with hawkers, handcarts and food vendors. In many places, the footpath is completely blocked, forcing pedestrians to walk on the road.

### Footpaths are for pedestrians, right?

According to traffic rules, footpaths are reserved only for pedestrians. Vehicles are not allowed to drive on or park on footpaths. However, these rules are being openly violated.

### Footpaths or alternative roads?

Whenever traffic slows down, two-wheelers, auto-rickshaws and even cars are often seen climbing the footpath. Vehicle drivers using footpaths as an alternative road has become a daily spectacle.

### Fines and action ineffective

Driving or parking vehicles on footpaths is a punishable offence under traffic rules. There are provisions for fines and even seizure of vehicles. The civic body is also responsible for removing encroachments from footpaths.

### Lives of pedestrians at risk

Children, senior citizens and people with disabilities are forced to walk in constant fear on footpaths. Fast-moving vehicles appearing suddenly increase the risk of accidents. In many places, heavy encroachment has left no safe walking space at all. During the monsoon, the situation becomes even worse due to mud, potholes and moving vehicles.

**दै.लोकमत** **दि.१ जानेवारी,२०२६**

लोकमत

# आता नाशिक-कल्याण प्रवास 'लोकल' होणार

Happy News Year 2026

धनंजय रिसोडकर
लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : नाशिकपासून कल्याणपर्यंतचा प्रवास मुंबईतील चाकरमान्यांप्रमाणे लोकलने करता यावा, या स्वप्नाला यंदाच्या वर्षी रेल्वे मंत्रालयामुळे पंख लाभले आहेत. प्रस्तावित नवीन रेल्वे मार्गात कसारा घाटात दोन नवीन मार्ग टाकण्यात येणार आहेत. त्यामुळे अनेक वर्षापासून रखडलेला कल्याण-नाशिक लोकलचा प्रकल्प मार्गी लागण्याच्या प्रयत्नांना गती मिळाली आहे.

प्रदीर्घ काळापासून प्रतीक्षा असलेला कसारा ते मनमाड दरम्यानचा १३१ किलोमीटरचा समांतर रेल्वे मार्ग उभारण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे मुंबई-नाशिक दरम्यानचा रेल्वे प्रवास अधिक गतिमान होऊ शकणार आहे.

**१३१**
**किलोमीटरचा रेल्वे मार्गाला मिळाला हिरवा कंदील.**

या पार्श्वभूमीवर रेल्वे मंत्रालयाकडून कल्याण ते कसारा, तसेच मनमाड ते भुसावळ तिसऱ्या व चौथ्या मार्गिकेचे काम सुरू आहे. केवळ कसारा ते मनमाड हाच टप्पा बाकी होता.



## कसारा घाटात १८ बोगदे

रेल्वे मंत्रालयातर्फे कसारा घाटात नव्याने दोन रेल्वे लाइन टाकण्यात येणार आहेत. प्राथमिक आराखड्यानुसार या मार्गावर तब्बल १८ बोगदे राहण्याची शक्यता आहे. घाटातील चढाईची उंची कमी होणार असल्याने विनाबँकर रेल्वे कसारा घाट पार करतील. त्यामुळे मेल-एक्स्प्रेस गाड्यांचा वेग वाढणार आहे. तर कल्याण-नाशिक लोकल सेवा सुरू करण्यासाठी प्रस्तावित मार्ग फायदेशीर ठरेल.

## नियोजित खर्च ४ हजार ५०० कोटींचा

मध्य रेल्वेचा मुंबई ते भुसावळ हा सर्वाधिक वर्दळीच्या मार्गापैकी एक आहे. या मार्गावरील कसारा घाटामुळे गाड्यांचा वेग मंदावतो. तसेच या मार्गावर रेल्वेंची संख्या वाढवण्यावर मर्यादा येतात. त्यामुळेच या नवीन रेल्वे मार्गाला मान्यता मिळाली आहे. या प्रस्तावित १३१ किलोमीटरच्या प्रकल्पासाठी सुमारे ४ हजार ५०० कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक जमीन संपादनासाठी शासनाने राजपत्र जारी केले आहे.

## या गावांमध्ये होणार भूसंपादन

या रेल्वे प्रकल्पासाठी जिल्ह्यातील चार तालुक्यांमध्ये भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यात नाशिक तालुक्यातील भगूर, वंजारवाडी, लोहशिंगवे, लहवित, संसरी, बेलतगव्हाण, विहितगाव, देवळाली, पंचक, एकलहरे, माडसांगवी, शिलापूर, ओढा, लाखलगाव, सिद्ध पिंप्री या गावांतील जमिनींचेदेखील भूसंपादन करण्यात येणार आहे.

लोकमत

# नववर्षात बिबट्यांसाठी 'रेस्क्यू सेंटर'ची होणार पायाभरणी...!

## वनविभागाच्या प्रस्तावाला केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाकडून मिळाला 'ग्रीन सिग्नल'

Happy **News** Year
2026

अझहर शेख
लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** शहरासह जिल्ह्यात मागील वर्ष हे बिबट्यांमुळे चांगलेच गाजले. मानव-बिबट्या संघर्षाची तीव्रता नाशिककरांनी अनुभवली. जेरबंद केलेल्या बिबट्यांसाठी ठोस उपाययोजना म्हणून 'रेस्क्यू सेंटर'ची मागणी पुढे आली. याबाबतचा प्रस्ताव वनविभागाने शासनाकडे पाठविला आहे. केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाकडून त्यास मंजुरीही मिळाली आहे.

२०२६ सालामध्ये म्हसरूळमधील वनविभागाच्या जागेत इमारतीची पायाभरणी होण्याची शक्यता सूत्रांनी वर्तविली आहे. नाशिक वनपरिक्षेत्रात बिबट्याच्या हल्ल्यात लागोपाठ दोन चिमुकल्यांचा बळी गेल्यानंतर गावकऱ्यांचा कधी नव्हे तो वनविभागाच्या कार्यालयावर मोर्चाही धडकला होता. महात्मानगरजवळच्या लोकवस्तीतसुद्धा बिबट्याने शिरकाव केल्याची घटना घडली. यानंतर शहरातील मुंबईनाका, गडकरी चौकातूनही बिबट्याने फेरफटका लगावला होता. जेरबंद केलेल्या सर्वच बिबट्यांना रेस्क्यू सेंटरमध्ये ठेवण्यात येईल, असे नाही, तर त्यापैकी ज्या बिबट्यांनी मानवी वस्तीत येऊन उपद्रव केलेला आहे, अशा बिबट्यांना कायमस्वरूपी या केंद्रात पुनर्वसनासाठी बंदिस्त केले जाईल, असेही वनाधिकाऱ्यांनी सांगितले.



### 'टीटीसी'वर मोठा भार

म्हसरूळमध्ये वन्यप्राणी उपचार केंद्र (टीटीसी) मागीलवर्षी उभारण्यात आले आहे. हे केंद्र रेस्क्यू सेंटर नाही; मात्र मानव-बिबट संघर्ष उफाळून आल्यामुळे शहरासह जिल्हाभरातून जेरबंद केलेले बिबटे या केंद्रात पिंजराबंद करण्यात आले आहेत. यामुळे या केंद्रावर मोठा भार आला असून सध्या १८ बिबटे याठिकाणी आहेत.

### २०० बिबट्यांच्या क्षमतेचा प्रस्ताव

म्हसरूळ वन आगारातील जागेची रेस्क्यू सेंटरच्या उभारणीकरिता निवड करण्यात आली आहे. पुढील पाच ते दहा वर्षांचा विचार करता दोनशे बिबट्यांच्या क्षमतेची ही इमारत उभारली जावी, असा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, अशी माहिती उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर यांनी दिली.

### प्रस्तावाला जलद मंजुरी

सरकारकडून आगामी आर्थिक अंदाजपत्रकात यासाठी निधीची तरतूद करून घोषणा केली जाऊ शकते. नाशिक शहर व अहिल्यानगरमधील राहुरी येथे रेस्क्यू सेंटर उभारणीच्या प्रस्तावाला जलद मंजुरी देण्यात आली आहे.

लोकमत

मस्ट READ

# जिल्ह्यात कांद्याचे क्षेत्र घटले

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव नेऊर :** यंदा कांद्याची लागवड उशिराने सुरू झाली असली तरी गतवर्षाच्या तुलनेत यंदा उन्हाळ कांद्याच्या लागवडीखालील क्षेत्रामध्ये घट झाली आहे. बागलाण तालुक्यामध्ये सर्वाधिक कांदा लागवड झाली असून सुरगाणा तालुक्यामध्ये सर्वात कमी लागवड क्षेत्र आहे. नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि पेठ या तीन तालुक्यांमध्ये डिसेंबर महिन्याच्या अखेरीस कांदा लागवडच झालेली नसल्याची नोंद झाली आहे. जानेवारी महिन्यातही अनेक ठिकाणी कांदा लागवड होणार असल्याने यंदा लागवडीखाली किती क्षेत्र राहील, याचा अंदाज आलेला नाही.

जिल्ह्याच्या अनेक भागातील शेतकरी आता कांदा पीक घेऊ लागले आहेत. मात्र असे असूनही कांदा रोपांच्या टंचाईमुळे ३१ डिसेंबरपर्यंत जिल्ह्यात ९८ हजार ५३९ हेक्टर क्षेत्रावर कांदा लागवड झाली आहे. मागील वर्षी १० जानेवारीपर्यंत नाशिक जिल्ह्यात एक लाख ८० हजार ८७७ हेक्टरवर लागवड झाली होती. अजूनही अनेक भागात कांदा लागवडी जोरात सुरू आहे. जिल्ह्यात नाशिक, त्र्यंबकेश्वर, पेठ तालुके वगळता अन्य तालुक्यात उन्हाळ कांदा लागवड झालेली आहे.

जानेवारी शेवटपर्यंत कांदा लागवडी सुरू राहतील असे शेतकऱ्यांचे म्हणणे असून यंदा चांगले पीक येण्याची आशा आहे

## खराब हवामानाचा फटका

यावर्षी उन्हाळी कांद्याच्या लागवड क्षेत्रामध्ये घट दिसत असून खर्चामध्ये वाढ झाली आहे. सुरुवातीला अति पावसाने रोपांची सड झाली होती, त्यानंतर टाकलेल्या रोपांवर सध्या कांदा लागवड सुरू आहे. मात्र यावर्षी मात्र रोगट हवामानामुळे कांदा उत्पादन किती निघते हे वातावरणावर अवलंबून राहणार आहे.

लोकमत

# गौण खनिज वाहतूकप्रकरणी गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मालेगाव :** तालुक्यातील वडेल शिवारातील पाट कॅनल येथे संशयित नितीन पवार (२९, रा. अजंग शिवार, ता. मालेगाव) हा ट्रॅक्टर (क्र. एमएच ४१ ए.झेड. ४४८५) मधून बेकायदेशीर गौण खनिज वाहतूक करताना आढळून आला.

या कारवाईत पोलिसांनी अंदाजे २ लाख रुपयांचा ट्रॅक्टर व ट्रॉली व अंदाजे ६ हजार रुपयांची एक ब्रास वाळू असा एकूण २ लाख ६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी वडनेर खाकुर्डी पोलिस ठाण्यात संशयित नितीन पवार याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

Hello Nashik Gramin
Page No. 1 Jan 01, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

मस्ट READ

# सौरपंप योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांवर महाऊर्जाचा दबाव

## ठराविकच पुरवठादार निवडण्याची होतेय सक्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

**खेडलेझुंगे** : शेतकऱ्यांना साहाय्यभूत व्हावी यासाठी महाऊर्जाने आणलेल्या प्रधानमंत्री कुसुम सौर कृषी पंप योजनेसाठी ठरावीक पुरवठादार निवडण्यासाठी महाऊर्जाकडून दबाव येत आहे. जर पुरवठादाराचे नाव न दिल्यास अर्ज रद्द करून भरलेले पैसे परत केले जातील, असे संदेश महाऊर्जाकडून येत असल्याने आपल्याला पंप मिळणार की नाही, याबाबत शेतकरी गोंधळात पडले आहेत.

प्रधानमंत्री कुसुम सौर कृषी पंप योजनेसाठी अनेक शेतकऱ्यांनी पैसे भरले आहेत. मात्र महाऊर्जाकडून ठरावीक कंपन्यांचे पुरवठादार (वेंडर) म्हणून नाव पुढे केलं जात आहे. दर्जाहीन साहित्य, अपूर्ण काम किंवा साहित्य वेळेत न मिळाल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

**पुरवठादाराचे नाव न दिल्यास अर्ज रद्द करून भरलेले पैसे परत केले जातील, असे संदेश येत आहेत.**

> महाऊर्जाने घाईघाईने पुरवठादार (वेंडर) निवडायला सांगणं अन्यायकारक आहे. महाऊर्जा कार्यालयाने 'आहेत तेच पुरवठादार (वेंडर) निवडा' असं सांगितले. मात्र, त्यांच्या दर्जाबाबत खात्री मिळत नाही.
>
> **सत्यभामा घोटेकर,** शेतकरी, खेडलेझुंगे

दै.लोकमत

दि.१ जानेवारी,२०२६

# ‘नायलॉन मांजा’वर सायबर गस्त

## विक्रेत्यांवर नजर; तडीपारी, मोक्का प्रस्तावित

- सायबर गस्तीद्वारे विक्रेते-खरेदीदारांवर नजर
- नायलॉन विक्रीच्या गुन्ह्यात अल्पवयीन मुलांचाही समावेश
- अल्पवयीन मुलांच्या पालकांवरही गुन्हे दाखल
- नायलॉन विक्रेते, खरेदी करणारे तडीपार करणार
- संक्रांतीनंतर शहरात वास्तव्यास परवानगी

### आतापर्यंतच्या घटना...

- २८ डिसेंबर २०२० रोजी नायलॉन मांजाने मान कापल्याने महिलेचा मृत्यू झाल्याचा भद्रकाली पोलिसांत गुन्हा
- संशयितांवर प्रतिबंधात्मक कारवाईला सुरुवात
- सहायक पोलिस आयुक्तांकडून तडीपारी, मोक्कासंदर्भात प्रस्तावाची कार्यवाही
- सन २०२४ मध्ये संक्रांतीनिमित्त झालेल्या पतंगबाजीमुळे शहरात १९ तरुण देखील जखमी
- जानेवारी २०२४ मध्ये शहरातून नायलॉन मांजाप्रकरणी ४२ जण तडीपार
- ८ नोव्हेंबर २०२५ रोजी वडाळा गावातील माळी गल्लीत नायलॉन मांजामुळे दुखापत होत अतिरक्तस्त्रावामुळे नऊ वर्षीय मुलाचा मृत्यू
- संक्रांतीपूर्वी १२ जानेवारी २०२५ रोजी नायलॉनप्रकरणी २४ गुन्हे नोंद; ३३ संशयितांचा समावेश; अल्पवयीनांवरही कारवाई

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

शहरात भयमुक्त मकरसंक्रांत साजरी होण्यासाठी पोलिसांनी नायलॉनसह घातक मांजा वापरण्यावर बंदी लागू करून विक्रेत्यांसह वापरकर्त्यांची धरपकड सुरू केली आहे. आतापर्यंत २२ पेक्षा जास्त गुन्हे नोंदवून संशयितांना बेड्या ठोकल्यानंतर आता 'नायलॉन'ची खरेदी-विक्री रोखण्यासाठी सायबर गस्तदेखील सुरू करण्यात आली आहे. संबंधित गुन्ह्यातील संशयितांविरुद्ध तडीपारी व मोक्काचे प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशान्वये शहरात मांजा प्रतिबंधात्मक मनाई आदेश लागू आहेत. मकरसंक्रांत १४ जानेवारीला साजरी होणार असून, आतापासूनच पतंगबाजी सुरू झाली आहे. सणाच्या काळात पतंगबाजीदरम्यान नायलॉन मांजामुळे होणारी जीवितहानी अथवा गंभीर दुखापत रोखण्यासाठी पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. त्यानुसार पोलिस पथकांनी सर्व पोलिस ठाण्यांच्या हद्दीत संबंधितांवर कारवाई सुरू केली आहे. महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ कलम ३७ (१) (अ) अन्वये मनाई आदेश लागू असल्याने आतापर्यंत विक्रेत्यांसह साठा करणाऱ्यांची धरपकड पोलिसांनी केली आहे. संशयितांच्या हालचाली, कृत्यामुळे एखाद्या व्यक्तीला भय, धोका किंवा दुखापत झाल्यास संबंधितांवर तडीपारी प्रस्तावित करण्यात येत आहे.

# हजारावर अपक्ष रिंगणात

## राजकीय पक्षांकडून ५१८ उमेदवारांनी ठोकले शड्डू; १,५३२ जण मैदानात

म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक

महापालिकेच्या ३१ प्रभागांमधील १२२ जागांसाठी १५३२ उमेदवारांनी २३५७ नामनिर्देशनपत्र दाखल केली आहेत. यामध्ये विविध राजकीय पक्षांच्या ५१८ उमेदवारांचा समावेश आहे. राजकीय पक्षांबरोबरच १०१४ अपक्षांनी अर्ज दाखल करीत राजकीय पक्षांच्या उमेदवारांसमोर आव्हान उभे केले आहे. दरम्यान, महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग ३ अ या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित जागांसाठी सर्वाधिक ६३ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

नाशिक महापालिकेची सन २०२५ ची निवडणूक सर्वच पक्षांसाठी आव्हानात्मक ठरली आहे. पावणेतीन वर्षांनंतर निवडणुका होत असल्याने यंदाच्या निवडणुकीत इच्छुकांचा पूर आला आहे. निवडणुकीसाठी सर्वच पक्षांमध्ये झालेली इच्छुकांची भाऊगर्दी डोकेदुखी ठरली. विशेषतः भाजपमध्ये १२२ जागांसाठी १०६७ इच्छुकांनी उमेदवारीची मागणी केल्यानंतर एबी फार्म वाटपावरून झालेला राडा भाजपची नाचक्की करणारा ठरला. निष्ठावंत कार्यकर्ते आणि अलीकडेच पक्षात प्रवेश केलेले उमेदवार यांच्यातील संघर्ष निवडणूक कार्यालयाबाहेर उघडपणे दिसून आला. या निवडणुकीसाठी प्रथमच २,३५७ नामनिर्देशन पत्रे दाखल केले गेली आहेत. यामध्ये विविध राजकीय पक्षांकडूनच ५१८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. निवडणूक मैदानात अपक्षही मागे नाहीत. १०१४ अपक्षांनी अर्ज दाखल करत राजकीय पक्षांच्या उमेदवारांसमोर आव्हान उभे केले आहे. महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग ३ अ या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित जागेसाठी सर्वाधिक ६३ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.



नाशिक पूर्वच्या मेनरोड येथील महापालिका कार्यालयात सुरू असलेली छाननी प्रक्रिया

### दिग्गजांनी ऐनवेळी बदलले पक्ष

भाजपकडून तब्बल ३३ आयारामांना संधी देण्यात आली. वर्षानुवर्षे पक्षाचे काम करूनही उमेदवारी डावलली गेल्याने निष्ठावंत दुखावले. त्यामुळे भाजपसाठी महापालिकेची ही निवडणूक पक्षीय लढतीपेक्षा अधिक अंतर्गत संघर्ष, शक्तिप्रदर्शन आणि राजकीय गणितांची कसोटी ठरणार असल्याचे स्पष्ट होत आहे. माजी महापौर अशोक मुर्तडक, शशिकांत जाधव, कमलेश बोडके, सतीश सोनवणे यांसारख्या २२ माजी नगरसेवकांना उमेदवारी मिळाली नाही. त्यामुळे यातील काही दिग्गजांनी ऐनवेळी पक्ष बदलला तर, अनेकांनी अपक्ष निवडणूक रिंगणात उतरून पक्षासमोरच आव्हान उभे केले आहे.

### राजकीय पक्षांचे उमेदवार

| | |
|---|---|
| भाजप | ११८ |
| शिवसेना (शिंदे गट) | ८० |
| राष्ट्रवादी (अजित पवार) | ४१ |
| शिवसेना (ठाकरे गट ) | ८२ |
| राष्ट्रवादी (शरद पवार गट) | ३१ |
| मनसे | ३४ |
| आप | ३५ |
| माकप | ०९ |
| काँग्रेस | २२ |
| वंचित | ५५ |
| रिपाइं (आठवले गट) | ३ |
| रिपब्लिकन सेना (आनंदराज आंबेडकर) | १ |
| एमआयएम | ७ |



### सर्वाधिक अर्जांचे प्रभाग

| | | | |
|---|---|---|---|
| प्रभाग ३ ब | ६३ | प्रभाग २२ अ | ४१ |
| प्रभाग २१ अ | ५५ | प्रभाग १४ क | ४१ |
| प्रभाग २० अ | ५३ | प्रभाग १३ | ३६ |
| प्रभाग २ अ | ५० | प्रभाग १४ ड | ३६ |
| प्रभाग १४ अ | ४२ | प्रभाग १० अ | ३६ |
| प्रभाग १ ब | ४१ | प्रभाग ११ ब | ३५ |

# अतिरिक्त मनुष्यबळाच्या निवासव्यवस्थेला गती

म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक

## आराखडा सादर करण्यासाठी 'डेडलाइन'



सिंहस्थ कुंभमेळा यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता सरकारी यंत्रणांना अतिरिक्त मुनष्यबळाची गरज भासेल. सर्व यंत्रणांनी अतिरिक्त मनुष्यबळासाठी सिंहस्थ काळात लागणाऱ्या आवश्यक सेवा-सुविधांचा अंदाजित आराखडा १५ जानेवारीपर्यंत सादर करावा. बाहेरून येणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था मंगल कार्यालये, धर्मशाळा, आश्रमांसारख्या ठिकाणी करावी. या स्थळांना प्रत्यक्ष भेट देवून उपलब्ध सेवा - सुविधांची पाहणी करून ती निश्चित करावीत, असे निर्देश कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहेत.

सन २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थाच्या यशस्वीतेची जबाबदारी सरकारी यंत्रणांवरही असणार आहे. कुंभमेळा प्राधिकरण कार्यालयासह जिल्हाधिकारी कार्यालय आणि विभागीय आयुक्तालयात बैठकांचे सत्र सुरू आहे. त्यात बोलताना त्यांनी हे निर्देश देत विविध सूचना केल्या.

# पोलिसांचे 'नाइट आउट'

## शहरासह जिल्ह्यात तळीरामांची धरपकड

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

सरत्या वर्षाला निरोप देत नववर्षाचे स्वागत करणाऱ्या नाशिककरांच्या सुरक्षेसह गैरप्रवृत्तींना रोखण्यासाठी पोलिसांच्या पथकांनीही 'नाइट आउट' केल्याचा प्रत्यय बुधवारी आला. ठिकठिकाणी पोलिसांनी तपासणी करून संशयितांना ताब्यात घेत शहरासह जिल्ह्यात तळीरामांची धरपकड केली. सायंकाळी सातपासून सुरू झालेला सशस्त्र बंदोबस्त रात्री एकनंतर आस्थापना बंद करून पहाटे साडेपाचपर्यंत नागरिकांच्या सुरक्षेसाठी तैनात दिसला.

'थर्टी फर्स्ट नाइट'मध्ये रंगलेल्या नाशिककरांनी रात्री बाराच्या ठोक्याला जल्लोष केला. शहरच नव्हे, तर ग्रामीण भागातील हॉटेल्स व रिसॉर्टमध्ये तरुणाईने पार्टी रंगवली. बुधवारी (दि. ३१) सायंकाळपर्यंत शहरात ६५ पेक्षा जास्त तळीरामांवर कारवाई झाली होती. सायंकाळी आठ वाजेपासून मद्यपींची धरपकड करून गुन्हे नोंदवण्याची प्रक्रिया पहाटेपर्यंत सुरू राहिली. दरम्यान, भागवत एकादशी असल्याने मांसाहार आणि मद्यप्राशनाला बहुतांश नागरिकांनी पसंती दिली नाही. परंतु, सायंकाळी पाचपासूनच शहरासह जिल्ह्यातील वाइन शॉपवर मद्यप्रेमींची गर्दी दिसली. त्यामुळे पोलिसांनी वाइन शॉप व बार परिसरात गस्त सुरू ठेवली. रात्री आठनंतर सर्व भागात पोलिस बंदोबस्तही नेमण्यात आला.

पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील आस्थापना वेळेत बंद करण्यासाठी ध्वनीक्षेपकावरून सूचना करण्यात आल्या. मद्यपी व रस्त्यावर उगीच फिरणाऱ्यांना अटकाव करण्यात आला. प्रत्येक चारचाकीसह दुचाकीस्वारांची तपासणी करण्यासाठी शहरात पन्नासपेक्षा जास्त ठिकाणी नाकाबंदी सुरू होती. पोलिसांच्या या चोख बंदोबस्तामुळे हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये रात्री उशिरापर्यंत गोंधळ झाल्याचे वृत्त नव्हते. मात्र, शहरासह ग्रामीण भागात काही ठिकाणी झालेल्या पार्ट्यांवर नेमकी कोणती कारवाई झाली, हे पोलिसांकडून आज, गुरुवारी (दि.१) स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

| पोलिस बंदोबस्तातून... | ...या पथकांची गस्त |
|---|---|
| मद्यपींना वाइन शॉप, बारमध्ये परवाने | उपायुक्तांची चार पथके, सहायक आयुक्तांची सात पथके |
| सायंकाळी सहा वाजेपासून बंदोबस्त तैनात | पोलिस ठाणे पीटर मोबाइल (वरिष्ठ निरीक्षक) |
| जिल्ह्यात फार्म हाउस, रिसॉर्ट, हॉटेल तपासणी | पोलिस ठाणे झेब्रा व डीबी मोबाइल (स्थानिक गुन्हे शाखा) |
| रस्त्यांलगत फिरणाऱ्यांना दामिनी मार्शल्सचा दणका | वाहतूक पोलिस सातही युनिट |
| 'ड्रंक अँड ड्राइव्ह'च्या तपासणीनंतर गुन्ह्यांची नोंद | निर्भया व दामिनी मार्शल्स; हद्दीतील बीटमार्शल्स |
| रात्री साडेआठपासून पहाटे साडेपाचपर्यंत पोलिसांचा पहारा | गुन्हे शाखा मध्यवर्ती, युनिट एक, दोन, अंबड व नाशिकरोड |
| रात्री नऊनंतरच्या पार्ट्यांवर पोलिसांची नजर | अमली पदार्थ विरोधी, गुंडा विरोधी पथक |

### पोलिसांचा फौजफाटा...

- **शहर आयुक्तालय :** चार उपायुक्त, सात सहायक आयुक्त, ३० पेक्षा जास्त पोलिस निरीक्षक, दीडशेपेक्षा जास्त उपनिरीक्षक, तीन हजार पोलिस कर्मचारी
- **ग्रामीण पोलिस :** दोन अपर पोलिस अधीक्षक, आठ उपविभागीय अधिकारी, ४० पेक्षा जास्त पोलिस निरीक्षक, दोनशेपेक्षा जास्त उपनिरीक्षक, दीड हजार पोलिस कर्मचारी
- **अतिरिक्त :** शहर व जिल्ह्यात आठशे होमगार्ड, दंगल नियंत्रण पथक, जलद प्रतिसाद पथक

पंकज चांडोले



> ३१ डिसेंबरनिमित्त 'स्टॉप अँड सर्च' कारवाई करण्यात आली. ड्रग्जचा वापर कुठेही होणार नाही, त्यासंदर्भात पथकांनी दक्षता घेतली. चौकांचौकांत बंदोबस्त नेमून वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत नियंत्रण कक्षात वेळोवेळी 'अपडेट' घेतले आहेत.
>
> – किरणकुमार चव्हाण, पोलिस उपायुक्त, गुन्हे

# नाशिकच्या आर्थिक विकासाला मिळणार गती

टीम मटा, नाशिक/नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहारविषयक कॅबिनेट समितीने बुधवारी महाराष्ट्रातील ३७४ किलोमीटर लांबीच्या नाशिक-सोलापूर-अक्कलकोट सहा पदरी 'ग्रीनफिल्ड ॲक्सेस-कंट्रोल कॉरिडॉर'च्या बांधकामाला मंजुरी दिली.

या प्रकल्पामुळे नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होऊन एकूण आर्थिक विकासाला गती मिळणार आहे. हा महामार्ग कोप्पर्थी आणि ओरवाकल यांसारख्या राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर नोड्ससाठी मालवाहतूक सुलभ करील. याशिवाय नाशिक-तळेगाव दिघे हा टप्पा महाराष्ट्र सरकारकडून प्रस्तावित असलेल्या पुणे-नाशिक एक्स्प्रेसवेची गरजही पूर्ण करील.

## प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- हा सहा पदरी मार्ग ताशी १०० किमी वेगाने वाहन चालवण्यासाठी तयार होणार
- नाशिक ते अक्कलकोट दरम्यानचे प्रवासाचे अंतर २०१ किलोमीटरने कमी होईल
- या शहरांदरम्यानच्या प्रवासाच्या वेळेत १४ तासांची बचत होईल
- बुनाशिक, अहिल्यानगर आणि सोलापूर ही शहरे थेट एकमेकांशी आणि पुढे कर्नूलशी जोडणार
- हा मार्ग दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस वे, समृद्धी महामार्ग आणि आग्रा-मुंबई महामार्गाला जोडला जाणार
- कोप्पर्थी आणि ओरवाकल यांसारख्या औद्योगिक केंद्रांतून होणारी मालवाहतूक अधिक जलद व स्वस्त होईल

### रोजगाराची निर्मिती

- या प्रकल्पाद्वारे सुमारे २५१.०६ लाख मनुष्यदिन प्रत्यक्ष, तर ३१३.८३ लाख मनुष्यदिन अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल.
- महामार्गाच्या परिसरात आर्थिक उलाढाल वाढल्याने अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

### मार्गिकेची वैशिष्ट्ये...

- सहा पदरी ॲक्सेस-कंट्रोल्ड ग्रीनफिल्ड कॉरिडॉर
- 'क्लोज टोलिंग' प्रणाली
- डिझाइन स्पीड : किमान ६०, कमाल १०० किमी/तास
- सुरक्षित व विनाखंड वाहतूक व्यवस्था

# खंडणीखोर शर्मावर गुन्हा

## सातपूर पोलिसांकडून अटक; उद्योजकाला धमकावत उकळली होती साठ हजारांची खंडणी

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

उद्योजकांविरोधात एमआयडीसी कार्यालयात तक्रार करीत लाखोंची खंडणी उकळणारा संतोष शर्मा याच्याविरोधात सातपूर पोलिसात खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. शर्माने कंपनीच्या गेटवर उद्योजकाला धमकावत ६० हजारांची खंडणी उकळली आहे.

संतोष शर्मा, शशी राजपूत, रोहित म्हस्के, कैलास दवंडे अशी संशयितांची नावे आहेत. आशीष सोमनाथ शिनकर (४७, रा. नयनसागर सोसायटी, कामटवाडे) यांच्या फिर्यादीनुसार, सातपूर औद्योगिक वसाहतीत त्यांची इन्फिनिटी एंटरप्रायजेस प्रा. लि. कंपनी आहे. या कंपनीबाबत संशयित शर्माने एमआयडीसीकडे तक्रार केली. त्यानंतर त्यांच्या कंपनीच्या गेटवर संशयितांनी अतिक्रमण हटाव असे पोस्टर लावले, तसेच कामगारांमध्ये असंतोष निर्माण करून त्यांना शिवीगाळ केली. संशयितांनी शिनकर यांच्याकडे तीन लाखांच्या खंडणीची मागणी केली. संशयित जानेवारीपासून त्यांना त्रास देत आहे. नोव्हेंबरमध्ये संशयित त्यांच्या गेटवर जाऊन दमदाटी व गेम करून टाकण्याची धमकी दिली. त्या वेळी त्याने त्यांच्याकडून बळजबरीने ६० हजार रुपये खंडणी उकळली. या प्रकरणी सातपूर पोलिसात खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, संशयित शर्मा याच्याविरोधात अंबड पोलिसात खंडणीचे दहा गुन्हे दाखल असून, त्याला अटक करण्यात आली आहे. सातपूरच्या महिला उपनिरीक्षक बारेला तपास करीत आहेत.

### पिस्तुलासह दुचाकी हस्तगत

**नाशिक :** कॅनॉल रोडवरील लोखंडी पाइपमध्ये दडून बसलेल्या दोन जणांना शिताफीने अटक केल्यानंतर त्यांच्याकडून जिवंत काडतुसासह गावठी कट्टा व दुचाकी, महागडे मोबाइल असा सुमारे अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गंगापूर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने ही कारवाई केली. तौफिक इकबाल हाश्मी (रा. श्रमिकनगर, शिवाजीनगर, सातपूर), समीर अशोक गुंजाळ (रा. गोवर्धन गाव) असे अटक करण्यात आलेल्या दोन संशयितांची नावे आहेत. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी आयुक्तालय हद्दीतील प्रभारींना शस्त्र बाळगणाऱ्यांवर धडक कारवाईचे आदेश दिले आहेत. गंगापूरचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड यांना सुला वाइनकडे जाणाऱ्या कॅनॉल रोड परिसरात गावठी कट्ट्यासह संशयित आल्याची खबर मिळाली होती. गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक भारत पाटील यांना सूचना देत त्यांनी घटनास्थळ गाठले. त्या वेळी कॅनॉल रोडवरील शिंदोरे रस्त्याच्या पुढे लोखंडी पाइपजवळ दुचाकी दिसली. या पाइपमध्ये दोघे संशयित दडून बसले होते. त्यांना ताब्यात घेत गावठी कट्टा, पल्सर व दोन आयफोन असा २ लाख ३७ हजारांचा मुद्देमाल त्यांच्याकडून जप्त करण्यात आला.



### 'ट्रॅफिक वॉर्डन'वर हल्ल्याचा प्रयत्न

**नाशिक :** महापालिका निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याच्या प्रक्रियेदरम्यान मुंबई नाका परिसरात मंगळवारी (दि. ३०) सकाळी वाहतूक नियमनावरून ट्रॅफिक वॉर्डन आणि टेम्पोतील दोन जणांमध्ये वाद झाले. संशयितांनी वॉर्डनवर हल्लाचा प्रयत्न केल्याने मुंबई नाका पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी एका संशयिताला अटक केली असून, दुसऱ्याचा शोध सुरू आहे. अटल दिव्यांग भवनात नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवार व कार्यकर्त्यांची गर्दी झाल्याने मुंबई नाका पोलिसांनी छान हॉटेलजवळील टी-पॉइंट परिसरात बॅरिकेडिंग करून रस्ता बंद केला होता. त्या ठिकाणी ट्रॅफिक वॉर्डन सनी मधुकर दाईने (वय २४, रा. उपनगर, नाशिक) त्यांच्यासमवेत असलेल्या उर्वरित कर्मचाऱ्यांसह वाहतुकीचे नियमन करीत होते. त्या वेळी एका मिनी टेम्पातून आलेले सलमान गनी बागवान व जावेद सलाउद्दीन बागवान या संशयितांनी बॅरिकेडिंग ओलांडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. वॉर्डनने त्यांना थांबवून पर्यायी मार्ग सांगितला असता दोघांनीही वॉर्डनशी हुज्जत घातली. वाद वाढल्यानंतर दोघांनी आरडाओरड करीत वॉर्डनला धमकावून दगड उचलून डोके फोडण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान, संशयितांनी टेम्पोची काचही फोडली. मुंबई नाका पोलिसांनी एका संशयितास ताब्यात घेतले.

**मटा अँकर** तब्बल एक लाखाने वाढ; दररोज सुमारे अकराशे जणांचा विमान प्रवास

# नाशिकमधून वर्षात चार लाख जणांचे ‘उड्डाण’

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

**मावळते वर्ष २०२५ मध्ये ओझर विमानतळावरून चार लाख नाशिककरांनी प्रवास केला. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात तब्बल एक लाखाने वाढ नोंदविली गेली. दरमहा सरासरी ३४ हजार, तर दररोज सुमारे अकराशे व्यक्तींनी नाशिक येथून विमानप्रवास केल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. सिंहस्थापर्यंत प्रवाशांत दुपटी-तिपटीने वाढ होण्याचा अंदाज अभ्यासकांकडून व्यक्त होत आहे.**

ओझर विमानतळावरून सध्या ‘इंडिगो’ची नवी दिल्ली, हैदराबाद, बेंगळुरू, इंदूर, अहमदाबाद, गोवा आदी ठिकाणांसाठी विमानसेवा सुरू आहे. सन २०२५ मध्ये बेंगळुरूसाठी सेवा सुरू झाली, तर हैदराबाद व नवी दिल्लीसाठी अतिरिक्त विमान सुरू करण्यात आले. त्यामुळे ओझर विमानतळावरील प्रवाशांत मोठी वाढ झाल्याचे चित्र आहे. सन २०२३ मध्ये २ लाख २५ हजार ११९ जणांनी, तर २०२४ मध्ये ३ लाख १ हजार ९०८ जणांनी ओझर विमानतळावरून प्रवास केला होता. त्यात २०२५ मध्ये तब्बल एक लाखाने वाढ झाल्याचे चित्र आहे. २०२५ मध्ये नोव्हेंबर महिन्यात सर्वाधिक (४३ हजार ४१६), तर ऑगस्टमध्ये सर्वांत कमी (२६ हजार १०) प्रवाशांची नोंद झाली. नोव्हेंबरअखेरपर्यंत ओझर विमानतळावरून ३ लाख ६१ हजार ९७४ जणांनी प्रवास केला असून,




“ **दिल्लीसाठी अतिरिक्त विमान सुरू झाल्याने प्रवाशांत मोठी वाढ झाली. विमानसेवेचा विस्तार होत असल्याने प्रतिसादही वाढत आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यापर्यंत दरमहा एक लाख प्रवाशांचे उद्दिष्ट गाठू शकतो. उद्योजकांकडून सर्व स्तरांवर पाठपुरावा सुरू आहे.**

-मनीष रावल, उपाध्यक्ष, निमा

**सन २०२५ मधील विमान प्रवासी**

| | |
|---|---|
| जानेवारी | ३१,७३७ |
| फेब्रुवारी | ३१,७९४ |
| मार्च | ३४,३४९ |
| एप्रिल | ३६,२०३ |
| मे | ३७,५०९ |
| जून | ३२,४९० |
| जुलै | २७,१५२ |
| ऑगस्ट | २६,०१० |
| सप्टेंबर | २६,४३९ |
| ऑक्टोबर | ३४,८७५ |
| नोव्हेंबर | ४३,४१६ |
| एकूण : ३,६१,९७४ | |

**शुभवार्ता**

अद्याप डिसेंबर महिन्याची आकडेवारी समोर येणे बाकी आहे. डिसेंबरमध्येही ४० हजारांहून अधिक जणांनी प्रवास केल्याचा अंदाज असून, त्यामुळे २०२५ मध्ये सुमारे चार लाख जणांनी ओझर येथून प्रवास केल्याची बाब पुढे येत आहे. आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर ओझर विमानतळावर नव्या टर्मिनल इमारतीचे काम सुरू होणार असून, त्यामुळे विमानतळाची प्रवासी क्षमता वाढणार आहे. परिणामी अन्य विमान कंपन्याही नाशिककडे आकर्षित होणार आहेत. २०२६ च्या ऑक्टोबर वा नोव्हेंबरपासून नव्या विमान कंपनीची सेवा सुरू होण्याची चिन्हे आहेत. तसे झाल्यास ओझर विमानतळावरील प्रवाशांचा आकडा दुपटीने व प्रत्यक्ष सिंहस्थात तिपटीने वाढण्याचा अंदाज आहे.

# ‘लाडकी बहीण’ ई-केवायसीला पुन्हा मुदतवाढ?

## लाभार्थींमध्ये संभ्रम कायम; अधिकृत आदेशाची प्रतीक्षा

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक

चित्र : एआय



### संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध

https://ladakibahin.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ई-केवायसीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दरम्यान, अधिकृत आदेश अद्याप प्राप्त न झाल्याने जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे लाभार्थींनी अंतिम मुदतीबाबत अधिकृत पत्राची प्रतीक्षा करावी, असे आवाहन महिला व बालविकास विभागाकडून करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांसाठी ई-केवायसी करण्यास पुन्हा एकदा मुदतवाढ दिली जाणार असल्याची चर्चा आहे. त्यानुसार आता ३१ जानेवारीपर्यंत ई-केवायसी करण्याची संधी मिळणार असल्याचे बोलले जात असले, तरी जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाकडे याबाबत अद्याप अधिकृत पत्र प्राप्त झालेले नाही. त्यामुळे लाभार्थी महिलांमध्ये प्रक्रियेबाबत संभ्रमाचे वातावरण आहे.

महायुती सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पात्र लाभार्थी महिलांना ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेला १८ सप्टेंबरपासून सुरुवात करण्यात आली होती. सुरुवातीला १८ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, ठरवून दिलेल्या कालावधीत अनेक महिलांची ई-केवायसी पूर्ण न झाल्याने विभागाकडून ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. ३१ डिसेंबर रोजी ही मुदत संपत असताना अद्यापही मोठ्या संख्येने महिलांची ई-केवायसी प्रक्रिया अपूर्ण असल्याचे समोर आले आहे.

ग्रामीण भागात तांत्रिक अडचणी, इंटरनेटची समस्या, माहितीअभावी तसेच कागदपत्रांच्या त्रुटींमुळे अनेक लाभार्थींना ई-केवायसी पूर्ण करता आलेली नाही. यामुळे पुन्हा एकदा मुदतवाढ दिली जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यानुसार आता ३१ जानेवारीपर्यंत ई-केवायसी करता येणार असल्याचे संकेत आहेत. योजनेत पारदर्शकता राखण्यासाठी तसेच पात्र लाभार्थींनाच नियमित आर्थिक लाभ मिळावा, या उद्देशाने ई-केवायसीची अट घातली आहे.

# नववर्षात पोलिसांचे दहशतवादविरोधी 'डावपेच'!

मटा विशेष

सौरभ बेंडाळे
saurabh.bendale@timesofindia.com



> नववर्षात सिंहस्थ नियोजनाला पूर्णतः प्राधान्य असेल. 'ड्रग्ज'विरुद्ध कारवाया सुरू असून, त्यात अधिक वाढ करणार आहोत. 'अँटि टेरर टॅक्टिक्स'चे प्रशिक्षण सर्वांना देण्यात येईल. गुन्हेगारांविरूद्धही 'झीरो टॉलरन्स' भूमिका कायम आहे.
>
> – संदीप कर्णिक, पोलिस आयुक्त

## राज्यात 'बालेकिल्ला पॅटर्न'

शहरात सप्टेंबर अखेरपर्यंत ४२ 'रेकॉर्ड ब्रेक' खून झाले. ३१ डिसेंबरपर्यंत हा आकडा ४८ पर्यंत पोहोचला. गुन्हेगारी नियंत्रणासाठी ऑक्टोबर महिन्यात पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशान्वये, 'नाशिक जिल्हा, कायद्याचा बालेकिल्ला' मोहीम सुरू झाली. सराइत गुन्हेगारांसह बहुतांश राजकीय पक्षातील कार्यकर्ते व नेत्यांना विविध गुन्ह्यांत अटक झाली. राज्यभरात नागरिकांनी या मोहिमेचे स्वागत केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही 'गुन्हेगारीचा राजाश्रय मोडून काढणार', असे सांगत पोलिसांचे कौतुक केले. आता हा 'पॅटर्न' राज्यभरात वापरला जात असून, २०२६ मध्ये गरजेनुसार त्याचा 'पार्ट-२' सुरू होणार आहे.

**नाशिक** : गुन्हेगारीविरुद्ध 'बालेकिल्ला' मोहिमेची राज्यभरात अंमलबजावणी सुरू झाल्याने नाशिक पोलिसांनी नववर्षात त्याचा दुसरा भाग राबविण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच सन २०२६ मध्ये सिंहस्थ नियोजनाला प्राधान्य देत दहशतवादी विरोधी सेलसहित (एटीसी) सर्व पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांना दहशतवाद विरोधी 'डावपेच' शिकविण्यात येणार आहेत. त्यासाठी भयमुक्त व सुरक्षित सिंहस्थाचा संकल्प नाशिक पोलिस आयुक्तालयाने केला आहे.

सन २०२६-२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थाचे ध्वजारोहण ३१ ऑक्टोबर रोजी होणार असून, ऑगस्ट २०२७ पासून अमृत स्नानांचे मुहूर्त आहेत. 'हायटेक' सिंहस्थाबाबत महत्त्वाच्या बंदोबस्तांवेळी शहर पोलिस आयुक्तालयाने यशस्वी चाचपणी केली आहे. नववर्षात सिंहस्थाचे सूक्ष्म नियोजन करण्याचे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी आदेश दिले आहेत. शहरात एकवीस रस्ते, पाच पुलांची उभारणी व नऊ रस्त्यांची दुरुस्ती होत आहे. त्यामुळे वाहतूक नियोजनासाठी वाहतूक पोलिसांच्या सात पथकांत १२० अंमलदार नियुक्त केले आहेत. यासह तीन हजार 'ट्राफिक वॉर्डन'सहित वाहतूक सुरक्षेला नववर्षात प्राधान्य असेल.

दरम्यान, आयुक्त कर्णिक यांनी सन २०२३ च्या नोव्हेंबर महिन्यात नाशिक शहराची सूत्रे हाती घेतल्यापासून दहशतवादी विरोधी कक्षाच्या कामकाजाला प्राधान्य दिले आहे. या पथकांनी अडीच वर्षांत महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. सन २०२५ मध्ये पोलिस ठाणेनिहाय कार्यरत असलेल्या 'एटीसी'सह सर्व पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. जेणेकरुन सिंहस्थापूर्वी सर्व अधिकारी-कर्मचारी हे दहशतवादी विरोधी डावपेचात सक्षम ठरतील. त्यानुसार गुन्हेगारी नियंत्रणासह नववर्षात सिंहस्थ नियोजनाला अग्रस्थान आहे.

**दै.दिव्य मराठी** **दि.१ जानेवारी,२०२६**

**केंद्राची नववर्ष भेट** • महाराष्ट्रातील १९, १४२ कोटींच्या ग्रीनफील्ड महामार्गाला मंजुरी

# नाशिक-सोलापूर-अक्कलकोट प्रवास अवघ्या ४ तासांतच शक्य

प्रतिनिधी | नाशिक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक घडामोडींच्या मंत्रिमंडळ समितीने 'नाशिक-सोलापूर-अक्कलकोट' या सहापदरी ॲक्सेस कंट्रोल्ड ग्रीनफिल्ड महामार्गाला बुधवारी मंजुरी दिली. एकूण ३७४ किलोमीटर लांबीच्या या महामार्गासाठी १९,१४२ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. नाशिक, अहिल्यानगर व सोलापूर या शहरांना जोडणारा हा मार्ग पुढे कुर्नूलला जोडला जाईल. यामुळे नाशिक-अक्कलकोट ५२९ किलोमीटर अंतर दीडशे किमीने घटेल. ७-८ तासांचा हा प्रवास या महामार्गामुळे अवघ्या ४ तासात शक्य होणार आहे. हा मार्ग ताशी १०० किमीसाठी डिझाइन केला आहे. सरासरी वेग ताशी ८० किमी असेल. बीओटी तत्वावरील या महामार्गावर टोल द्यावा लागणार आहे.

## ताशी १०० किमीचा वेग | नाशिकला मिळेल तीन एक्स्प्रेस-वे शी कनेक्टिव्हिटी

### शेतमाल, औद्योगिक वाहतुकीला गती

१) लॉजिस्टिक क्षमता मजबूत होईल. २) नाशिक-तळेगाव दिघी जोडले जाणार असून नाशिक-पुणे एक्स्प्रेस वेसाठी हे उपयुक्त ठरेल. ३) सुरत ते चेन्नई महामार्गाचा हा भाग आहे. त्यामुळे पूर्व व पश्चिम बंदरे जोडली जातील. हा ३१ तासांचा प्रवास १७ तासांवर ४) शेतमाल आणि औद्योगिक उत्पादनांच्या वाहतुकीला गती मिळेल, फायदा होईल.



### 3 वर्षांत प्रकल्प पूर्ण होणार

सुरत-चेन्नई ग्रीनफील्ड महामार्गाचा हा भाग आहे. भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होईल. ती पूर्ण होताच प्रकल्प ३ वर्षांत पूर्ण होईल. चेन्नई ते हसापूर (महाराष्ट्र सीमा) ७०० किमीचा चौपदरी महामार्ग प्रगतिपथावर आहे.

**दिव्य मराठी नॉलेज**

### ८ रेल्वेस्थानके, ६ विमानतळांना जोडणारा दुवा

'ग्रीनफील्ड कॉरिडॉर' म्हणजे पूर्णपणे नव्या जागेवर बांधला जाणारा महामार्ग. गावांच्या बाहेरून किंवा शेतजमिनीतून भूसंपादन करून हा रस्ता काढला जातो. याच धर्तीवरील उभारण्यात येणारा हा महामार्ग ८ रेल्वेस्थानके व ६ विमानतळे जोडणारा दुवा ठरेल.

**दिव्य मराठी एक्स्पर्ट**

ललित बुब, अध्यक्ष, आयमा

### ऑटो. लॉजिस्टिक उद्योगांना लाभ; रोजगार वाढतील

चेन्नई, बेंगळुरू, हैदराबाद, कोइम्बतूर यांसारखी आयटी, टेक्सटाइल्स, ग्रॅनाइट, मार्केट, ऑटो व इंजिनिअरिंग हब नाशिकशी जोडली जातील. विस्तारीकरण, लॉजिस्टिकसाठी नाशिकच्या मार्गातील ठिकाणांना महत्त्व दिले जाईल. यातून मोठी गुंतवणूक येईल आणि रोजगार वाढतील. या प्रकल्पामुळे वाढवण बंदराजवळ दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस वे, नाशिकमधील आडगाव येथे आग्रा-मुंबई महामार्ग व पांगरी येथे समृद्धी महामार्गाशी कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. हा महामार्ग त्र्यंबकेश्वर, शिर्डी, तुळजापूर, अक्कलकोट या तीर्थस्थळांसह संभाजीनगर, नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव, सोलापूरच्या विकासाला गती देईल.

**धागेदोरे** • दोघा संशयितांना राजस्थानातून अटक; दोन दिवसांची पोलिस कोठडी

# राजस्थानात १ ग्रॅम एमडी ड्रग्ज ५०० रुपयात, मालेगावात दोन हजारात

**प्रतिनिधी** | मालेगाव

किल्ला पोलिसांनी तीन आठवड्यांपूर्वी जप्त केलेल्या ६० ग्रॅम एमडी पावडर तस्करीचे राजस्थान कनेक्शन समोर आले आहे. राजस्थानातून एक ग्रॅम एमडी ५०० रुपयात खरेदी करत तिची मालेगावात दोन हजार रुपये प्रती ग्रॅमने विक्री केली जात होती. तस्करांना एमडीचा पुरवठा करणाऱ्या दोघांना पोलिसांनी राजस्थानातून अटक केली आहे. यात मुन्ना खान शेख जमाल खान ऊर्फ मामू (रा. मध्यप्रदेश) व परवेज हमीद खान (रा. राजस्थान) यांचा समावेश आहे. दोघांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

चंदनपुरी रस्त्यावर ११ डिसेंबरच्या रात्री छापा टाकून पोलिसांनी संशयित अबरार मुख्तार शेख (रा. जळगाव) याला अटक केली होती. त्याच्या ताब्यातून सहा लाख रुपये किमतीची नशेखोरीसाठीची ६० ग्रॅम एमडी पावडर हस्तगत केली होती. कारवाई दरम्यान अरबाज महेमूद खान ऊर्फ गबा व गुलाब वाहिद शाह हे फरार झाले होते. तपासात एमडी तस्करीचे धागेदोरे राजस्थानपर्यंत पोहोचले. पोलिस उपनिरीक्षक बी. एच. चव्हाण यांनी मागील आठवड्यात पथकासह राजस्थान गाठून बांसवाडा जिल्ह्यातील राजतलाब पोलिस ठाण्याच्या हद्दीत सापळा रचला होता. त्यांनी संशयित मुन्ना खान व परवेज खान यांना अटक करून मालेगावात आणले. तपास अपर पोलिस अधीक्षक तेगबीरसिंह संधू व पोलिस निरीक्षक सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## बांसवाडा जिल्ह्यातील राजतलाब पोलिसांच्या मदतीने अटक




ताब्यात घेतलेल्या दोघा संशयितांसह किल्ला पोलिसांचे पथक.

### महाराष्ट्राच्या विविध भागात एमडीचा पुरवठा

दोघांना पहिल्यांदा चार दिवसांची कोठडी सुनावण्यात आली होती. मंगळवारी (दि.३०) दुसऱ्यांदा दोन दिवस कोठडीत ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे. दोघे संशयित महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये एमडी पावडरचा पुरवठा करत होते.

### दोघेही संशयित सराईत गुन्हेगार आहेत

*अटक केलेले दोघे संशयित सराईत गुन्हेगार आहेत. परवेज खान याच्याकडून काही महिन्यांपूर्वी राजस्थान पोलिसांनी लाखोंच्या संख्येत कुत्ता गोळ्यांचा साठा हस्तगत केला होता. या टोळीतील जळगावचा अरबाज खान ऊर्फ गबा हा सध्या पवारवाडी पोलिसांच्या ताब्यात आहे. त्यालाही या गुन्ह्यात अटक करून सखोल चौकशी केली जाईल.*

– **बी. एस. चव्हाण,** उपनिरीक्षक, किल्ला पोलिस ठाणे, मालेगाव.

### आंतराष्ट्रीयस्तरावर दहा हजार किंमत

पोलिसांनी जप्त केलेल्या ६० ग्रॅम एमडी पावडरची प्रती ग्रॅम दहा हजार रुपये किंमत लावली आहे. मात्र, संशयित अवघ्या दोन हजारात चोरटी विक्री करत होते. आंतराष्ट्रीय बाजारपेठेत अस्सल एमडीची दहा हजार रुपये किंमत आहे. तर संशयित एमडीमध्ये भेसळ करून कमी किमतीत विक्री करतात. भेसळीच्या एमडी विक्रीतून त्यांना ग्रॅममागे किमान १५०० रुपयांचा नफा मिळतो. मुंबई शहरात एक ग्रॅम एमडीची किंमत २० हजार रुपये आहे.

**इनसाइड स्टोरी**

### राजस्थानात एमडी निर्मितीचे कारखाने

राजस्थान अमली पदार्थ निर्मिती व विक्रीचा अड्डा बनले आहे. प्रतापगड जिल्ह्यातील देवल्दी गावात एमडी तयार करण्याचे कारखाने आहेत. स्थानिक पोलिसांनी या गावात छापे टाकून कोट्यवधींची एमडी बनविणारे कारखाने उद्ध्वस्त केले आहे. मध्यप्रदेशमध्ये १८१४ कोटींची एमडी जप्त प्रकरणात देवल्दी गावातील शोएब लालाचे सहभाग आढळून आला होता. पोलिसांनी त्याची कोट्यवधींची मालमत्ता जप्त केली आहे. प्रतापगडसह पाली, जोधपूर आदी जिल्ह्यांमधून एमडीची तस्करी होत आहे. अटकेतील दोघे तरुण या भागातून एमडी खरेदी करून पुरवठा करत होते.

**विकासवाटा...** • कुंभमेळ्यानिमित्त वाहतूक मोकळी करण्यासाठी पार्किंग, रिंगरोडकडे विशेष लक्ष, रेल्वे स्थानकांमध्येही कामे सुरू

# नवीन वर्षात वाहतूक कोंडीतून मिळणार दिलासा

नाशिक | शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना दुसरीकडे वाहनांची संख्याही वाढते आहे त्यामुळे अर्थातच नाशिककरांना तासनतास वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळेच कुंभमेळ्याच्या विकासनिधीतून शहरातील वाहतूक कोंडी सुटण्यासाठी २८ मोक्याच्या ठिकाणी पार्किंग स्पॉट विकसीत करत कोंडी होऊ नये, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यात शहराबाहेरील वाहतूक गरजेशिवाय शहरात येणार नाही, यासाठी ६६ किमीच्या रिंगरोडचेही काम होणार असल्याने वाहतूक मोकळी होण्यास मदत होईल. तर जिल्ह्यातील ५ रेल्वेस्थानकांचाही विकास करण्यात येत असल्याने रेल्वेंची संख्याही वाढण्याची शक्यता आहे.

## पार्किंग स्पॉट — २८ मोक्याच्या ठिकाणी होणार 'पे अँड पार्क'



### पार्किंगचा प्रश्न सुटणार

नवीन वर्षात नाशिककरांना वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या वाहतूक सेलतर्फे शहरातील २८ मोक्याच्या ठिकाणी 'पे अँड पार्क' योजना कार्यान्वित केली जाणार आहे. यासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. यात सुधारित दरामुळे तीन मक्तेदारांनी स्वारस्य दाखवले होते. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पार्किंगचा प्रश्न मार्गी लावण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे.

### असा होणार फायदा

**रस्ते होतील मोकळे, वेळही वाचेल**

नेहमीच्या वाहतूक कोंडीतून होणार मुक्तता शहराच्या मध्यवर्ती भागात पार्किंगसाठी जागा उपलब्ध होणार [illegible] वाहने पार्किंगमध्ये लागल्याने रस्ते मोकळे होऊन वाहतूक सुरळीत होईल. वाहनचालकांचा वेळेचा अपव्यय होणार नाही. इंधनाचीही बचत होईल.

| 4155 | 28 | 700 ते 1500 |
|---|---|---|
| [illegible] | पार्किंग ठिकाणे | [illegible] |

**येथे होणार पार्किंग :** शालिमार, कालिदास कलामंदिर, महात्मा फुले कलादालन, पश्चिम भाग - गंगापूर रोड, कॅनडा कॉर्नर (अशोक पार्क), सिटी सेंटर मॉल परिसर, नाशिक रोड, पंचवटी भाग - रामकुंड, सीतागुंफा, [illegible] अपार्टमेंट, संत गाडगे महाराज पूल, इतर- मुंबई नाका.

## रिंगरोड — ६६ किमीचा रिंगरोड ठरेल शहरासाठी गेमचेंजर




### २५ गावांतून हा रस्ता जाणार

सिंहस्थाच्या निमित्ताने शहराच्या बाहेरून ६६.१५ किमीचे रिंगरोड उभारले जाणार आहेत. ते आता [illegible] असल्याने या भागातील गावांचा विकास आता वेगाने होणार आहे. २५ गावांतून हा रस्ता जाणार आहे. [illegible] समावेश आहे. या भागात आता रस्त्यांच्या विकासासोबत [illegible] ठिकाणी नवीन उद्योग-व्यवसाय वाढीला गती मिळेल. [illegible] ठक्के उत्पन्न [illegible] होणाऱ्या भागातून मिळण्याचे लक्ष्य आहे.

### असा होणार फायदा

**उद्योग, व्यवसाय केंद्र उभी राहतील**

- शहराबाहेरील वाहतूक गरजेशिवाय शहरात येणार नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी दूर होईल.
- या रिंगरोडवर उद्योग आणि व्यवसायाची केंद्र उभी राहतील. त्यातून रोजगारवाढीसह उत्पन्नही वाढेल.
- दिंडोरी, इगतपुरी, सिन्नर, निफाड, त्र्यंबकला सहज जाता येईल. दळणवळण सुविधांमध्ये वाढ होईल.

| असे होणार रस्त्यांसाठी भूसंपादन | |
|---|---|
| गावे - २५ | |
| [illegible] भू-संपादन - [illegible] | |
| [illegible] ठिकाणे - [illegible] | |

| [illegible] | [illegible] | |
|---|---|---|
| [illegible] | [illegible] | [illegible] |
| 371977 चौ.मी. | 3659.47 कोटी | 4262.64 कोटी |

## रेल्वे — नाशिकरोडसह पाच रेल्वेस्थानकांचा विकास



कुंभमेळ्यानिमित्ताने रेल्वे मंत्रालयाकडून [illegible] १ हजार [illegible] कोटी रुपयांतून नाशिकरोड, देवळाली, ओढा, खेरवाडी, कसबे सुकेणे या स्थानकांचा विकास करण्यात येणार आहे. कुंभमेळ्यासाठी [illegible] कोटी भाविक येण्याची शक्यता असून त्यासाठी रेल्वे गाड्यांची संख्या वाढेल. [illegible] विशेष आणि कमी अंतराच्या मेमू सेवा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये कामाख्या, हावडा, पटना, दिल्ली, जयपूर, बिकानेर, मुंबई, पुणे, नागपूर आणि नांदेड या स्थानकांना नाशिकशी जोडण्यासाठी रेल्वेचा प्रयत्न सुरू आहेत. मध्य वालदेवी नदीवर रेल्वे लाइनवरून [illegible] काम सुरू आहे.

### असा होणार फायदा

**नाशिकरोड स्थानकाचा कायापालट**

नाशिकरोड स्थानकातील फलाट क्र. ४ [illegible] होणार आहे. फलाट क्र. १ ची लांबी २४ डब्यांची गाडी उभी राहू शकेल इतकी वाढवण्यात येणार आहे. १२ मीटर रुंदीचा पादचारी पूल बांधण्यात येणार आहे. [illegible] म्हणून उपयोग करण्यात येणार आहे.

**देवळालीत** [illegible] लाइन्स, अतिरिक्त **स्थानकावर** फलाट, २ पादचारी पूल बांधणार. दोन फलाट कोच, [illegible] होणार.

| [illegible] | [illegible] | |
|---|---|---|
| 1011 [illegible] | 12 [illegible] पूल | 06 [illegible] पूल |

# नांदुरी घाटासह येवल्याचा प्रवास होणार सुखर

**शुभवार्ता** चार किलोमीटरचे कॉंक्रिटीकरण काम गतीने पूर्ण

## सप्टेंबरपर्यंत वाहतुकीस खुला होणार नांदुरी घाट



नांदुरी घाट रस्ता.

रवींद्र बोरसे | कळवण

महाराष्ट्राचे अर्धे शक्तिपीठ असलेल्या सप्तशृंग गड ते नांदुरी घाट या ९ किलोमीटर रस्ता कॉंक्रिटीकरण काम आणि रस्त्याला आवश्यक तेथे संरक्षक भिंत बांधण्याच्या कामाने गती पकडल्याने भाविकांमध्ये समाधान आहे. यामुळे नांदुरी ते गड घाट रस्ता सुरक्षित होत असून काम पूर्ण झाल्यास फक्त १० मिनिटात नांदुरी ते गड हा प्रवास होणार आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये हे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.

नाशिक जिल्ह्यात असलेल्या सप्तशृंग गडावर पावसाचे प्रमाण तुलनेने जास्त असते. यामुळे नांदुरी ते गड घाट रस्त्याने प्रवास करणे जिकिरीचे होते. शिवाय कितीही चांगला रस्ता बनवला तरी तो पावसाळ्यात खराब होण्याचे प्रमाण जास्त होते. यामुळे पर्यटनस्थळांचा विकास व्हावा, या उद्देशाने केंद्र शासनाने केंद्रीय मार्ग निधी योजनेंतर्गत नांदुरी गड घाट रस्त्याचे संपूर्ण कॉंक्रिटीकरण करणे, संपूर्ण रस्त्याला आवश्यक तेथे संरक्षक भिंत करणे हे काम करण्यासाठी ५० कोटी रुपयांच्या निविदेस मान्यता देण्यात आली आहे. या माध्यमातून रस्ता कॉंक्रिटीकरण कामास सुरुवात झाली होती. सप्तशृंगी गडाच्या बाजूने सुरू झालेले काम तीन किलोमीटर झाले आहे.

### कामाची प्रगती अशी

- **3** किमीचे कॉंक्रिटीकरण काम झाले.
- **5** किमी संरक्षण भिंतीचे काम पूर्ण.
- **6** कोटी निधी वितरित झाला.
- **26 नोव्हे. 2026** पर्यंत कामाची मुदत आहे.
- **50 कोटी 50 लाख** कामाची किंमत

### असा असेल रस्ता

- कॉंक्रिटीकरण पांढरा टॉपिंग
- रस्ता खचू नये म्हणून रस्ता टिकवून ठेवणारी संरक्षक भिंत
- डांबर फरसबंदीवर स्ट्रक्चरल काँक्रीटीकरण पर्याय
- पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा साईड गटार
- बॅटी रोडच्या तुलनेत कमी देखभाल
- रात्रीच्या वेळी वाहने चालवण्यासाठी रस्त्याला रिफ्लेक्टर
- रस्त्याच्या दुतर्फा दिशादर्शक फलक

**सोहळा** २७ एकरात तीर्थाची उभारणी; देश-विदेशातील १५ लाख भाविकांच्या उपस्थितीची शक्यता

## णमोकार तीर्थावर ६ फेब्रुवारीपासून जैन धर्मियांचा 'महाकुंभ'

अनिल पाटणी | उमराणे

नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वीच जैन धर्मीयांचा 'महाकुंभ' चांदवड तालुक्यातील मालसाने येथील णमोकार तीर्थावर भिणार आहे. ६ ते २५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान येथे भव्य आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक प्राणप्रतिष्ठा महोत्सव होणार असून, देश-विदेशातून लाखो भाविक उपस्थित राहणार आहेत.

२७ एकर क्षेत्रात उभारण्यात आलेल्या या तीर्थात १०८ फूट उंच समवशरण, ५१ फूट अरिहंत भगवान व ३१ फूट पंचपरमेष्ठी भगवान यांच्यासह सुमारे ३ हजार जिनबिंबांची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. ६ ते १३ फेब्रुवारी पंचकल्याणक महोत्सव, तर १३ ते २५ फेब्रुवारी महामस्तकाभिषेक सोहळा होईल. या महोत्सवासाठी सुमारे १५ लाख भाविक येण्याची शक्यता लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३६.३५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली आहे. रस्ते, पाणी, वीज, पार्किंग, हेलिपॅड व स्वच्छता सुविधांची कामे सुरू झाली आहेत.



- ६ ते २५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान येथे भव्य आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक प्राणप्रतिष्ठा महोत्सव
- २७ एकर क्षेत्रात उभारण्यात आले हे तीर्थस्थळ
- १०८ फूट उंच समवशरण
- ५१ फूट अरिहंत भगवान
- ३१ फूट पंचपरमेष्ठी भगवान
- ३ हजार जिनबिंबांची प्राणप्रतिष्ठा होणार
- ६ ते १३ फेब्रुवारी पंचकल्याणक महोत्सव
- १३ ते २५ फेब्रुवारी महामस्तकाभिषेक सोहळा
- ३६.३५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मंजुरी
- राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्यासह अनेक आचार्य, साधू-साध्वींची उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे.

**दिलासा** येवला ते नाशिक प्रवासाच्या वेळेत एक तासाची होणार बचत; अडथळे कमी होण्यास मदत

## ५६० कोटी रुपयाच्या पिंपळस ते येवला रस्त्याचे काम पूर्णत्वाकडे

नीलेश देसाई | लासलगाव

निफाड तालुक्यातील पिंपळस ते येवला शहरापर्यंतच्या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. ५६० कोटी रुपयांतून होणारे हे काम अत्यंत वेगाने सुरू असून साधारणतः पावसाळ्यापर्यंत पूर्ण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हा रस्ता झाल्यास नाशिक ते येवला प्रवासासाठीचा वेळ एक तासाने कमी होणार असून दीड तासात येवल्याला पोहोचता येणार आहे. पिंपळस ते येवला अतिशय वर्दळीचा रस्ता असून या रस्त्याचे चौपदरीकरण झाल्याने येथील रस्त्यावरून येणारे वाहतुकीचे अडथळे कमी होणार आहे.







पिंपळस ते येवला कॉंक्रिटीकरणाचे सुरू असलेले काम.

### चौपदरी रस्त्याचे कॉंक्रिटीकरण

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नातून आशियाई विकास बँक प्रकल्पातील पिंपळस ते येवला चौपदरी रस्त्याचे कॉंक्रिटीकरण या रस्त्याच्या कामासाठी ५६० कोटी मंजूर करण्यात आले होते. तेव्हापासून या रस्त्याचे मजबुतीकरण, रुंदीकरण आणि कॉंक्रिटीकरण काम वेगाने सुरू आहे. हा रस्ता झाल्यास वेळेबरोबरच इंधनाचीही बचत होणार आहे.

तक्रार करूनही बांधकाम विभागाचे दुर्लक्ष, सटाणा- दोधेश्वर मार्गावरील काटेरी झुडपांचा प्रश्न ऐरणीवर

# झुडपांना बस घासल्याने १८ विद्यार्थ्यांना बाधा; सटाणा ग्रामीण रुग्णालयात उपचार

**प्रतिनिधी** | सटाणा

सटाणा–दोधेश्वर रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर वाढलेली काटेरी झाडे व झुडपे हटविण्याबाबत वारंवार तक्रारी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याचा फटका शालेय विद्यार्थ्यांना बसला आहे. या झुडपांमुळे त्रास होऊन तब्बल १८ शालेय विद्यार्थ्यांना सटाणा ग्रामीण रुग्णालयात दाखल करावे लागले.

मंगळवारी (दि. ३०) सटाणा आगाराची बस सकाळी साडेअकरा वाजता कौतिकपाडे मार्गावरून शालेय विद्यार्थ्यांना घेऊन जात होती. कौतिकपाडे ते मुळाणे दरम्यान समोरून येणाऱ्या वाहनाला रस्ता देताना चालकाने बस रस्त्याच्या कडेला घेतली. त्यावेळी रस्त्याच्या बाजूला वाढलेल्या काटेरी झुडपांतील झाड बसला घासले गेले. या घर्षणामुळे झाडावरील काटे व सूक्ष्म कण बसमध्ये उडाले आणि विद्यार्थ्यांच्या अंगावर पडले. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या अंगाला तीव्र खाज सुटून आग होऊ लागली. विद्यार्थ्यांनी तातडीने आपला त्रास बस वाहकाच्या निदर्शनास आणून दिला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत चालक आणि वाहकाने प्रसंगावधान राखत बस थेट सटाणा ग्रामीण रुग्णालयात नेली. या बसमध्ये सुमारे १८ शालेय विद्यार्थी होते. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संदीप भगत यांनी विद्यार्थ्यांवर तातडीने उपचार सुरू केले. घटनेची माहिती समजताच पालकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती.



सटाणा ग्रामीण रुग्णालयात पालकांनी केलेली गर्दी.

### झाडे काढली जातील

*सटाणा- दोधेश्वर रस्त्यावरील दोधेश्वर घाटात काटेरी झाडे झुडपे आहेत. मात्र ते वनविभागाच्या हद्दीत येते. त्यासाठी वनविभागाची परवानगी काढावी लागते. लवकर झाडे काढले जातील. तर मुळाणे कौतिकपाडे रस्ता हा कळवण विभागाकडे येतो, याबाबत त्यांच्याशी बोलावे लागेल.-* **कौस्तुभ पवार,** *कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम*

**इनसाइड स्टोरी**

### काटेरी झुडपांमुळे यापूर्वीही अपघात

सटाणा-दोधेश्वर मार्गावरील दुतर्फा वाढलेल्या काटेरी झुडपांमुळे दोधेश्वर घाटात वळणावर समोरचे वाहन दिसत नाही. त्यामुळे येथे अनेकदा अपघात घडले आहेत. याबाबत वाहनधारकांनी अनेकदा तक्रारी करूनही संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष आहे. या घटनेनंतर ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुतर्फा वाढलेल्या काटेरी झुडपांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### वेळीच उपचाराने अनर्थ टळला

*रस्त्याच्याकडेला असलेल्या काटेरी झुडपांचे बसला घर्षण झाल्याने त्यातील विषारी घटक मुलांच्या अंगावर पडल्याने हा त्रास झाला. जास्त वेळ झाला असता तर खाज, आग, जळजळ, पुरळ, सूज किंवा लाल चट्टे आले असते. तसेच डोळ्यांना इजा होणे किंवा मुलांना श्वास घेण्यास त्रास झाला असता. मात्र वेळीच औषधोपचार झाल्याने अनर्थ टळला. –* **डॉ. संदीप भगत,** वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय सटाणा

**दै.आपलं महानगर** **दि.१ जानेवारी,२०२६**

आपल्या वाचन्य, आठवत्या वाचन्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# पालखेड डावा कालव्याला गळती

## पाण्याचा अपव्यय : वितरिकांना रब्बीचे आवर्तन देण्याची मागणी

प्रतिनिधी। आपलं महानगर वृत्तसेवा

**येवला ।** गळती व अवैध उपशांमुळे पालखेड डावा कालव्याच्या येवला तालुक्यातील चारी क्रमांक ३३ ते ५२ अंतर्गत येणाऱ्या सुमारे ४० गावांमधील वितरिकांच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचत नाही. त्यामुळे हाता तोंडाशी आलेले पीक वाया जाते. या पार्श्वभूमीवर जलहक्क संघर्ष समितीने संपूर्ण पालखेड कालव्याची गळती व अवैध उपसा तात्काळ थांबवून "टेल टू हेड" पाणीवाटप राबवावे, अशी मागणी जिल्हाधिकारी व पालखेड कालवा प्रशासनाकडे समितीचे संयोजक भागवतराव सोनवणे यांनी केली आहे.मागण्या मान्य न झाल्यास पालखेड लाभ क्षेत्रातील उर्वरित ३८ गावे आंदोलनाचा मार्ग स्वीकारतील, इशाराही देण्यात आला आहे.



येवला पूर्व ४६ ते ५६ चारीची गळती बंद झाली असली तरी 1 ते 33 दरम्यान मोठ्या प्रमाणात गळती आणि अवैध उपसा आहे. फक्त दोन गावांत ८० क्युसेक पाण्याची गळती कालव्या लगतच्या सर्व जमिनी दीर्घ काळ आवर्तन चालल्या ने उपळून नापिकी वाढली आहे. कालव्याची स्थिरता धोक्यात आली असून पाण्याच्या वहनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. यामुळे गळती वाढत असून त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना व शेतीला बसत आहे. गळती मुळे चारी क्रमांक ३३ च्या टेल भागालाही सध्या पाणी मिळत नाही. त्यामुळे गेटच्या दोन्ही बाजूंना प्रत्येकी २० मीटर अंतरावर कालवा अस्तरीकरण करणे आहे.

> “कालव्या ची वहन क्षमता विढविण्या प्रयत्न आहे. त्या साठी जास्त गळती असलेल्या ठिकाणी कालवा दुरुस्ती सुरु आहे. येवला पूर्व भागात दुरुस्ती झाली आहे. चारी क्रमांक 33 च्या जवळील गळती काढण्याचे काम काही शेतकऱ्यांनी बंद पाडले आहे. विशेषतः डीवाय-33 चारीच्या वरच्या बाजूस १ ते १.५ किमी अंतराचे अस्तरीकरण केल्यास सध्या वाया जाणारे ७० ते ८० क्युसेक पाणी वाचू शकते.
>
> - **वैभव भागवत,** कार्यकारी अभियंता, पालखेड कालवा विभाग.

> “खरीप हंगामात २५० क्युसेसने सोडलेले पाणी पुढे जाताना अवघे ११० क्युसेसपर्यंत कमी होते. त्यामुळे ४६ ते ५२ वितरिकांना खरीपाचे पाणीही मुबलक मिळत नाही. आम्हाला रब्बी साठीही आवर्तन हवे आहे. बोकटे यात्रेला पाणी हवे आहे. कालवा प्रशासनाने आताच नियोजन करावे.
>
> - **भागवतराव सोनवणे,** संयोजक, जलहक्क संघर्ष समिती, येवला.

Nashik Edition
Jan 01, 2026 Page No. 6
Powered by: erelego.com

आपलं महानगर | My महानगर .com

# नळवाडपाडा ते ठेपणपाडा रस्ता दुरुस्तीला मुहूर्त लागेना

## संबंधित विभागाने लक्ष देण्याची मागणी

**दिंडोरी ।** रस्ते हे ग्रामीण भागातील एक प्रतीक च बनले असून आवश्यक गरज सोडून आता तर रस्त्याना महत्व प्राप्त झाले मात्र याच रस्त्याची दिंडोरी तालुक्यातील ठेपणपाडा ते नळवाडपाडा येथे दयनीय अवस्था दिसून आली आहे मात्र या कडे कोणत्याच प्रकारे संबंधित विभाग लक्ष देत नसून रस्ता दुरुस्त कधी होणार ! याकडे ठेपणपाडा वासियाच्या नजर लागल्या आहेत,

याबाबत माहिती अशी कि दिंडोरी तालुक्यातील ठेपणपाडा हे गाव अनेक समस्या विना अपुरे असून त्यात नळवाडपाडा ते ठेपणपाडा दरम्यान रस्त्याची बिकट अवस्था झाली आहे.

मागील काळात या रस्त्याची डागडुजी ही निव्वळ बघण्यापुरतीच केली होती. त्यामुळे या रस्त्याचा पूर्णपणे सुफडा साफ होऊन रस्ता खचला गेला आहे. त्यामुळे यांचा फटका जाणाऱ्या वाहनधारकांना बसत असून रस्ता खराबी असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून असे घडल्यास संबंधित विभाग जबाबदार असेल असा इशारा ग्रामस्थांनी दिला असून रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणीही केली आहे.



### रस्त्यावर खड्डेच खड्डे

नळवाडपाडा ते ठेपणपाडा हा वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा असून या रस्त्यातून अनके वाहनांची रेलचेल चालू असते मात्र सदरील रस्त्याची अवस्था पाहता रस्ता पूर्णपणे खचला असून सर्वत्र खड्डेच खड्डे निर्माण झाले आहे त्यामुळे याचा परिणाम वाहनधारक यावर पडत असल्याने रस्ता कधी दुरुस्त होणार याकडे लक्ष लागून आहे.

### लोकप्रतिनिधींचेही दुर्लक्ष

नळवाडपाडा ते ठेपणपाडा हा वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा असून या रस्त्यातून अनके वाहनांची रेलचेल चालू असते. मात्र तालुक्यातील सर्वच लोकप्रतिनिधींनीदेखील याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप वाहनधारकांनी केला आहे. मतदानाच्या काळात विविध आश्वासनांची खैरात वाटणारे लोकप्रतिनिधी निवडणुकीनंतर याकडे का दुर्लक्ष करतात असा सवालही उपस्थित केला आहे.

### शेतकरी वर्गाला अडचणींचा सामना

रस्त्याच्या खराबीमुळे येथील परिसरातील जोरन जोरणपाडा ठेपणपाडा कवडासर आदी गावातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल हा दिंडोरी अथवा इतर ठिकाणी न्यावा लागतो त्यात शेतकऱ्यांना नळवाडपाडा ते ठेपणपाडा याचा रस्त्याचा आधार असतो मात्र याच रस्त्याची दुर्दशा झाली असून पर्यायी रास्ता शिल्लक नसल्याने वाहनधारक तसेच शेतकरी वर्गाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आल्याचे चित्र दिसून आले आहे.

आपल्या बातम्या, आपल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# कुंभमेळा विकासासाठी 108 कोटींच्या कामांना मंजुरी

## मार्च 2027 पूर्वी कामे पूर्ण करा : विभागीय आयुक्त डॉ. गेडाम

**नाशिक।** नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी 108 कोटी 27 लाख रुपयांच्या विविध विकासकामांना कुंभमेळा विकास प्राधिकरणाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. कुंभमेळ्याशी संबंधित सर्व विकासकामे वेळेत पूर्ण होण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी तातडीने ना-हरकत दाखले द्यावेत, असे निर्देश प्राधिकरणाचे अध्यक्ष व विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले.



दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आयोजित या बैठकीस कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, नाशिक महापालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, विविध जिल्ह्यांचे वरिष्ठ अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, आरोग्य, वीज, रेल्वे व परिवहन विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत त्र्यंबकेश्वर येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम, खेरवाडी, सुकेणे, ओढा व देवळाली रेल्वे स्थानकांवर पाणीपुरवठा व्यवस्था, त्र्यंबकेश्वर नगरपरिषद क्षेत्रातील भूसंपादित जागांचे सर्वेक्षण, दहा आखाड्यांमध्ये टॉयलेट ब्लॉक व अंतर्गत रस्ते, वीजपुरवठा यंत्रणा बळकटीकरण तसेच श्री क्षेत्र सप्तश्रृंग गड येथे नवीन बसस्थानक बांधकामास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली.

डॉ. गेडाम यांनी सांगितले की, कुंभमेळ्याला मर्यादित कालावधी शिल्लक असून मार्च 2027 पूर्वी सर्व कामे पूर्ण होतील, अशा पद्धतीने नियोजन करणे आवश्यक आहे. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी त्र्यंबकेश्वर येथील आवश्यक सोयीसुविधांबाबत माहिती दिली. त्र्यंबकेश्वर व वणी परिसरातील पायाभूत सुविधा भक्कम होणार असून भाविकांसाठी पाणीपुरवठा, वीज, वाहतूक, निवास व स्वच्छतेच्या सोयी अधिक सक्षम होणार आहेत असेही शेवटी त्यांनी स्पष्ट केले.

Nashik Edition
Jan 01, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

DESHDOOT Times
....watching north maharashtra
epaper.deshdoot.com
01 Jan 2026 - Page 1

# Green, clean Simhastha mission from Jan 3

**NASHIK:** With the Simhastha Kumbh Mela scheduled to be held in Nashik–Trimbakeshwar in 2027, ensuring cleanliness and environmental sustainability has become a top priority. The Kumbh Mela Development Authority will launch a large-scale cleanliness campaign from Trimbakeshwar city on January 3, 2026, and Commissioner Shekhar Singh has appealed to citizens, institutions and organisations to participate in large numbers to make the initiative a success.

Commissioner Singh was addressing a meeting held at the Nashik–Trimbakeshwar Kumbh Mela



Authority hall. NIMA President Ashish Nahar, CREDAI Secretary Tushar Sanklecha, District Government Hospital Medical Officer Dr Dayanand Deshmukh, Trimbakeshwar Government Industrial Institute Principal Dr N. B. Gurule, along with representatives of colleges, educational institutions and charitable organisations, were present.

He informed that the cleanliness campaign will begin at 8 am on Saturday, January 3, from Trimbakeshwar. Special cleaning activities will be undertaken at key locations including Sangam Ghat and Gautam Talav area, Vetal Maharaj Temple vicinity, Akhada parking area, Nivrutti Maharaj Chowk, and the Gautam Talav bridge.

The campaign will see participation from government departments as well as NGOs, civil society groups, religious trusts, social organisations, youth and community volunteer groups, health, water and sanitation NGOs, college students, resident welfare associations, local volunteers, and adventure and trekking groups active in the Brahmagiri–Trimbak region. Commissioner Singh stressed that support from organisations through Corporate Social Responsibility (CSR) funds will play a vital role in sustaining cleanliness initiatives. He said such drives will be conducted regularly to ensure a clean and green Kumbh Mela. Emphasising the spirit of "Our City, Our Kumbh Mela," he sought cooperation from media, radio and digital promotion partners to ensure wide publicity and increased public participation.

DESHDOOT Times
....watching north maharashtra

epaper.deshdoot.com
01 Jan 2026 - Page 1

# Rs 108 crore infra push

**NASHIK:** The Nashik–Trimbakeshwar Simhastha Kumbh Mela Development Authority has approved development works worth Rs 108.27 crore in its recent meeting.

Authority Chairman and Divisional Commissioner Dr. Praveen Gedam directed the concerned departments to expedite the process of issuing No Objection Certificates (NOCs) so that all Kumbh Mela–related works are completed within the stipulated timeframe.

Dr. Gedam was speaking at a review meeting of departments associated with the Authority, which was held via video conferencing.

During the meeting, administrative approval was granted for several key projects. These include the construction of a new administrative building in Trimbakeshwar, water supply works at Kherwadi, Sukene, Odha and Deolali railway stations, and the appointment of a survey consultant for survey and allied works related to land acquired by the Trimbakeshwar Municipal Council.

Approval was also given for the construction of toilet blocks, internal roads and allied works in ten akhadas in Trimbakeshwar under the Simhastha Kumbh Mela plan, as well as for projects to strengthen the power supply system in the Trimbakeshwar area.

In addition, administrative approval has been granted for the construction of a new bus stand at Shri Kshetra Saptashringi Gad.

Dr. Gedam stated that with limited time remaining before the Kumbh Mela, all departments must plan to complete the approved works before March 2027. He emphasized the need to complete NOC-related procedures at the earliest to avoid delays.

# जिल्हा अहिल्यानगर

लोकमत

# युरिया खताचा ऑनलाइन स्टॉक, पण बाजारात तुटवडा

## कोपरगाव तालुक्यात शेतकऱ्यांना खत मिळेना: लिंकिंगमुळे शेतकरी त्रस्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**धामोरी** : कोपरगाव तालुक्यात सध्या युरिया खताचा तुटवडा तीव्र स्वरूपात जाणवत आहे. हा तुटवडा नैसर्गिक आहे की कृत्रिम, असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत. कृषी विभागाच्या ऑनलाइनप्रणालीवर तालुक्यात युरिया खताचा मोठ्या प्रमाणात बंपर स्टॉक उपलब्ध असल्याची नोंद असतानाही प्रत्यक्षात मात्र कृषी सेवा केंद्रांवर शेतकऱ्यांना युरिया मिळत नाही.

गहू, मका, कांदा, ऊस, तसेच इतर रब्बी पिकांसाठी युरियाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. युरिया खतामुळे पिकांना नायट्रोजन मिळून पिकांची जोमदार वाढ होते. पाने हिरवीगार राहतात आणि उत्पादन वाढीस मदत होते. स्वस्त व लवकर परिणाम देणारे खत असल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर युरियावर अवलंबून असतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शेतकरी युरिया खरेदीसाठी बाजारात गेले असता खत नाही, रॅक लागलेला नाही, माल आलेला नाही अशी उत्तरे कृषी दुकानदाराकडून मिळत आहेत. काही ठिकाणी तर युरिया देण्यासाठी इतर महागडी खते किंवा लिन्किंड खते खरेदी करण्याची सक्ती केली जात आहे.

दरम्यान, खरीप हंगाम अतिवृष्टीमुळे हातचा गेला असून, आता शेतकऱ्यांना रब्बी हंगामातून चांगले उत्पादन मिळेल अशी अपेक्षा आहे. मात्र, पिकांसाठी खतेच मिळत नसल्याने शेतकरी कृषी सेवा केंद्राकडे चकरा मारत आहेत. ऊस, गहू, मका, कांदा पिकासाठी युरियाची अत्यंत गरज आहे. मात्र, बाजारात खत मिळत नाही. ज्या ठिकाणी खत आहे, तिथे इतर खते घेण्याची सक्ती केली जाते. शेतकऱ्यांना लवकरात लवकर खते मिळावीत, अशी मागणी शेतकरी राजेंद्र नाजगड, प्रकाश सोनवणे, गणेश घायतडक, भारत कासार आदींनी केली आहे.



### खत देण्यास टाळाटाळ

कृषी विभागाच्या ऑनलाइन नोंदीनुसार कोपरगाव तालुक्यात १५३ कृषी सेवा केंद्रे असून, त्यामध्ये बुधवार (दि.३१) रोजी तब्बल १२ हजार १०० गोण्या युरिया उपलब्ध असल्याचे दिसते. ही माहिती ई-पॉश मशीनवर अद्ययावत असतानाही प्रत्यक्षात दुकानदारांकडून खत देण्यास टाळाटाळ केली जात आहे. एवढा साठा असूनही शेतकऱ्यांना खत मिळत नसेल, तर यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा नेमकी कुठे आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

"

बुधवार (दि. ३१) रोजी कोपरगाव तालुक्यात ऑनलाइन ई-पॉश मशीनवर १२ हजार १०० गोण्या उपलब्ध आहेत. ऑनलाइन उपलब्ध साठा असूनही, जर कोणतेही कृषी सेवा दुकानदार शेतकऱ्यांना युरिया देण्यास टाळाटाळ करत असेल, तर संबंधित कृषी सेवा केंद्रावर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.'

**गणेश बिरदवडे,** गुणनियंत्रक अधिकारी



लोकमत

# चांदा पाणी योजनेचे काम संथगतीने सुरु

## आतापर्यंत योजनेवर ९ कोटी ६७ लाख रुपये खर्च

बाळकृष्ण पुरोहित
लोकमत न्यूज नेटवर्क

भेंडा : जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत चांदा नळ पाणीपुरवठा योजनेच्या आराखड्यास ४ सप्टेंबर २०२० रोजी मान्यता मिळाली. त्यासाठी २१ कोटी ८२ लाख ६ हजार १०८ रुपयांचा निधी १८ एप्रिल २०२२ रोजी मंजूर झाला. योजनेचे काम १९ ऑक्टोबर २०२३ पासून सुरू झाले. आजवर त्यावर ९ कोटी ६७ लाख रुपये खर्च झाले आहेत.

योजनेचा उद्भव मुळा उजवा कालवा आहे. योजनेत चांदा, फकीरवाडी, हनुमानवाडी, खडकवाडी, सोमेश्वरवाडी, वाखारवाडी, शास्त्रीनगर, समतानगर, दत्तवाडीचा समावेश होतो. २०५४ ची लोकसंख्या गृहीत धरून प्रती मानसी प्रतिदिन ५५ लिटर पाणी पुरवठ्याचा आराखडा तयार केला आहे. अशुद्ध जलवाहिनी, मुळा कालवा ते साठवण तलाव व्यास ६०० मिमी लांबी ४०० मीटर पुरवठा बाकी आहे. अस्तित्वातील रांजणगाव पाणीपुरवठा योजनेतील मातीचा तलाव ४ हजार मीटर खोदकाम झालेले आहे. अशुद्ध व शुद्ध पाणी पंपिंग मशीनरी, तसेच अशुद्ध पाणी साठवण तलाव ते जलशुद्धीकरण केंद्र जलवाहिनी २५० मिमी व्यास १०० मीटर लांब मिळालेली नाही.

**९**
**कोटी ६७ लाख रुपये आजवर त्यावर खर्च झाले आहेत.**

जलशुद्धीकरण केंद्र क्षमता अडीच दशलक्ष लिटर असून, ६८ टक्के काम विविध टप्प्यांवर पूर्ण झाले आहे. शुद्ध जलवाहिनीचे काम ३६ टक्के झाले आहे. मुख्य संतुलन टाकी उंची २५ मीटर, ३ लाख १५ हजार क्षमतेच्या टाकीचे काम पूर्ण झाले आहे, तर जलदाब चाचणीचे काम बाकी आहे. शुद्ध पाणी जलवाहिनी पुरवठा ६४ टक्के, तर २५ टाकली आहे. वितरण व्यवस्था जलवाहिनीचे ७७ टक्के काम पूर्ण झाले आहे. उंच टाक्या गावठाण व शास्त्रीनगरचे काम पूर्ण झाले असून, जलदाब चाचणी बाकी आहे.



### टाक्या दुरुस्तीचे काम बाकी

खडकवाडी व हनुमानवाडी अस्तित्वातील उपयोगात येणाऱ्या टाक्या दुरुस्तीचे काम अद्याप सुरू नाही. सौरऊर्जा प्रकल्प व ऑटोमेशनचे काम बंद आहे. कालवा इनटेक व्यवस्था प्रस्ताव जलसंपदा विभागास मंजुरीसाठी दाखल केला आहे. रस्ता ओलांडण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी दोन वर्षांपासून प्रतीक्षेत आहे.

लोकमत

मस्ट READ

# वापरलेले वैद्यकीय साहित्य फेकले उघड्यावर

## नागरिकांच्या आरोग्याला धोका, कारवाईची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**निंबळक :** अहिल्यानगर तालुक्यातील निंबळक येथील खासगी रुग्णालयात वापरण्यात आलेल्या इंजेक्शनच्या सुई व सिरिंज थेट रस्त्याच्या कडेला उघड्यावर फेकून दिल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. जैववैद्यकीय कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे कायद्याने बंधनकारक असताना संबंधितांनी नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळला जात आहे. यामुळे जनावराच्या पोटात सुया गेल्या तर ते दगावण्याची शक्यता आहे.
देहरे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच तीन खासगी रुग्णालये आहेत. या रुग्णालयात वापरल्या जाणाऱ्या सुया रस्त्याच्या कडेला उघड्यावर पडलेल्या आहे.

या रस्त्यावरून शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक व जनावरे यांची नियमित वर्दळ असते. अशा वापरलेल्या सुयांमुळे एचआयव्ही, हिपॅटायटीस बी व सीसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो. विशेषतः लहान मुले व भंगार गोळा करणाऱ्यांच्या जीवाला मोठा धोका असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**अशा वापरलेल्या सुयांमुळे एचआयव्ही, हिपॅटायटीस बी व सीसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो.**

जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियमांनुसार रुग्णालयांनी वापरलेल्या सुया, ब्लेड, सिरिंज यांची विल्हेवाट अधिकृत यंत्रणेमार्फत करणे आवश्यक आहे. मात्र देहरे येथील रुग्णालयामधून या नियमांचे सर्रास उल्लंघन करत आहे. त्यामुळे संबंधित रुग्णालयावर तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित हॉस्पिटलवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



**“ रुग्णालयाच्या नियमाचे उल्लंघन होत असेल तर त्या रुग्णालयाचा परवाना रद्द करण्याचा अधिकार जिल्हा आरोग्य अधिकारी यांना असतो. दोषी आढळल्यास त्याच्यावर कार्यवाही होणार, याबाबत पाहणी करून प्रस्ताव जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पाठवला जाईल.**

**विनोद काकडे,** तालुका आरोग्य अधिकारी

### नागरिकांचा इशारा

या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोग्य विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ व स्थानिक प्रशासनाने त्वरित दखल घ्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा निष्काळजीपणावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

लोकमत

# तिसगाव ग्रामस्थांचे पाण्यासाठी चार तास उपोषण

## ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठिय्या, आश्वासनानंतर स्थगित

लोकमत न्यूज नेटवर्क

**तीसगाव :** पाथर्डी तालुक्यात मोठी व्यापारी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या तीसगाव येथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. गेल्या दीड-दोन महिन्यांपासून तीसगावकरांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याचे सामाजिक कार्यकर्ते मन्सूरभाई पठाण यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयासमोर चार तास लाक्षणिक उपोषण करण्यात आले. दोन दिवसांत नियमितपणे पाणीपुरवठा करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी उपोषण स्थगित केले.

ग्रामपंचायतकडे गेल्या सहा-सात महिन्यांपासून प्रादेशिक योजनेची ३५ लाख रुपये पाणीपट्टी थकीत आहे. यामुळे नळ योजना समितीने पाणीपुरवठा बंद केला आहे. पाणी मिळत नसल्यामुळे मंगळवारी पठाण यांच्यासह महिला व ग्रामस्थांनी उपोषण केले. त्यानंतर ग्रामपंचायत प्रशासनाने मिरी-तिसगाव नळ योजना समितीकडे दोन लाख रुपयांची थकबाकी बँकेत वर्ग केली. बाकी रक्कमदेखील टप्प्याटप्प्याने भरण्याचे मान्य केले. तीसगाव मिरी नळ योजनेचे पाणी सुरू करण्याचे अध्यक्ष एकनाथ आटकर यांनी ग्रामस्थांना आश्वासित केले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

यावेळी संजय लवांडे, प्रदीप ससाणे, नितीन लवांडे, अक्षय साळवे, सतीश साळवे, समर्थ मांजरे, महेश विधाते, दिनेश ससाणे, खुर्शीत शेख, प्रसाद देशमुख, मेहताब पठाण, आसिफ शेख, शौकत पठाण, विक्रम ससाणे, रफिक शेख, सरपंच इलियास शेख, सचिन साळवे, नंदकुमार लोखंडे, नितीन खंडागळे, अशोक माळी, राजमोहम्मद पठाण, अन्वर शेख, अर्शद शेख, राजू नाईक, जाकीर सय्यद, अमोल साळवे, नसीर सय्यद, शबाना पठाण, नजमा मणियार, रशिदा मणियार, नेहा मणियार, रिजवाना पठाण, हजरा पटेल, वहिदा मणियार, परवीन पठाण, सोनम शेख, लालबी पठाण, शकिला पठाण, सादिया पठाण आदींनी चर्चेत सहभाग घेतला.



तिसगावकरांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने सामाजिक कार्यकर्ते मन्सूरभाई पठाण यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयासमोर चार तास लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

> **शासन निर्णयाप्रमाणे तत्काळ ५० टक्के रक्कम भरली तर पन्नास टक्के सवलत मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांनी थकीत घरपट्टी, पाणीपट्टी भरावी.**
>
> **गणेश ढाकणे,** ग्रामविकास अधिकारी

दै.सकाळ दि.१ जानेवारी २०२६

# मधमेश्वर पक्षी अभयारण्याचे काय होणार?

## बंधाऱ्याला दहा नवे दरवाजे बसविताना तज्ज्ञांचा सल्ला गरजेचा : मर्यादित दृष्टिकोन नको

सतीश वैजापूरकर : सकाळ वृत्तसेवा

सकाळ EXCLUSIVE

**शिर्डी, ता. ३१ : गोदावरी उजव्या कालव्याचे काँक्रिटीकरण करताना विविध गावांजवळ सुबक घाट बांधले नाहीत आणि सौंदर्यदृष्टी ठेवली नाही, तर ती मोठी चूक ठरेल. घाट बांधून सामान्य जनतेची गैरसोय दूर करता येईल. सौंदर्यदृष्टी ठेवली, तर विरंगुळा म्हणून लोक कालव्याच्या भरावावर फिरायला येतील. अगदी तसेच नांदूर मधमेश्वर बंधाऱ्याला नवे दहा दरवाजे बसविताना त्याच्या पाणी फुगवट्यावरील रामसर दर्जा प्राप्त पक्षी अभयारण्याकडे दुर्लक्ष केले, तर तो फार मोठा करंटेपणा ठरेल. पर्यावरण, पर्यटन आणि त्यातून मिळणारा रोजगार याकडे साफ दुर्लक्ष केल्यासारखे होईल. गोदावरी उजव्या कालव्याचे काँक्रिटीकरण म्हणजे यंत्राद्वारे माती उकरणे एवढा मर्यादित दृष्टिकोन, या काँक्रिटीकरण मागे असू नये, अशी जाणकारांची अपेक्षा आहे.**



नांदूर मधमेश्वर (जि. नाशिक) :

सकाळ

# शनिशिंगणापूरमध्ये अडवणुकीला जोर

## आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली, 'लटकूंचे' रॅकेट वाढले

**सोनई, ता. ३१ : शनिभक्तांची अडवणूक केल्यास कठोर कारवाई होणार, असा आदेश विभागीय आयुक्त तथा शनैश्वर देवस्थानचे प्रशासक डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिला होता. त्यानंतरही गावात वाहनांची अडवणूक करणे व भक्तांना सक्तीचे पूजा साहित्य विकण्याचे प्रकार सुरूच आहेत. आदेशानंतर 'लटकूगिरी' ला लगाम लागण्याऐवजी रॅकेटमधील संख्या दुपटीने वाढली आहे. पोलिस यंत्रणेने रस्त्यावर होमगार्ड उभे केले असले, तरी सर्वांची भूमिका शोभेची वस्तूप्रमाणे पाहण्यास मिळत आहे.**

चार दिवसांपूर्वी शनिवारी (ता. २७) सकाळी आठ वाजता आयुक्त डॉ. गेडाम यांनी भक्तांच्या वाढत्या तक्रारींनंतर वेशांतर करून अडवणूक, सक्ती व पूजा साहित्य विक्रीचे अर्थकारण जाणून घेतले होते. दस्तुरखुद्द गेडाम यांना लटकूंचा महाप्रताप पाहण्यास मिळाल्यानंतर त्यांनी देवस्थानच्या जनसंपर्क कार्यालयात वाहनतळ मालक व व्यावसायिकांची बैठक घेतली होती. या बैठकीत पूजेच्या दराचे फलक लावणे व अव्वाच्या सव्वा रक्कम घेऊन भक्तांची फसवणूक करू नये, अशा सूचना केल्या होत्या.

वाहनतळ मालकांना सक्त सूचना दिल्यानंतर अडवणूक कारनामा थांबेल, असे वाटले. मात्र, रविवारपासून आजपर्यंत (बुधवार, ता. ३१) परिस्थितीत बदल झाला नसल्याचे प्रत्यक्ष भेटीत जाणवले. लटकूंवर कारवाई करण्याऐवजी वाहतूक पोलिस जिल्हा परिषद शाळेच्या समोर घरगुती वाहनाने येणाऱ्या भक्तांची वाहने अडवून अर्थपूर्ण प्रसाद घेताना दिसत आहेत. देवस्थानच्या बरखास्त केलेल्या विश्वस्तांनी अव्वाच्या सव्वा स्वरूपात सुरक्षा कर्मचाऱ्यांची नोकरभरती केली असली, तरी त्यातील एकही कर्मचारी भक्तांना दिलासा देण्यासाठी रस्त्यावर दिसला नाही.

### अन्य तेल माथी मारले जाते...

■ येथे तिळाचे तेल म्हणून अन्य महागडे तेल माथी मारले जाते. पूजा साहित्य न घेतल्यास दमदाटी केली जाते. गावाचा महिमा कमी होत असल्याने उपाययोजना होणे आवश्यक असल्याचे भाविक तेजस पटेल यांनी सांगितले.



**शनिशिंगणापूर :** चक्क पोलिस ठाण्याच्या समोर भाविकांची वाहने अडवताना लटकू.

वाहने अडवून सक्ती होत असलेल्या ठिकाणी बंदोबस्त ठेवला आहे. आमची फिरती गस्त सुरू असते. भाविकांना त्रास व सक्ती केल्यास कारवाई केली जाईल.

- **आशिष शेळके**, सहायक पोलिस निरीक्षक

प्रवासी करनाक्यावर लटकूंचे साम्राज्य सध्या वाढले आहे. याबाबत त्यांना सांगितले जाते. मात्र, ते कामगारांना दमदाटी करतात. याबाबत आयुक्त डॉ. गेडाम यांची भेट घेऊन वास्तव सांगितले जाणार आहे.

- **बाळासाहेब बानकर**, सरपंच, शनिशिंगणापूर

Nagar, Main
01/01/2026 Page No. 4

दै.दिव्य मराठी

दि.१ जानेवारी २०२६

### अस्वच्छतेचे पसरले साम्राज्य, लोंबकळत्या तारांची समस्या कायम

# 'फेज टू'च्या जलवाहिन्यांमधून पाणी नाही, मोकाट जनावरांचा मुक्तसंचार

प्रतिनिधी | अहिल्यानगर

मध्यवर्ती शहरातील दाट लोकवस्ती असलेल्या या प्रभागातील बहुतांश रस्त्यांवर वीज, इंटरनेट, टीव्ही केबलच्या तारा लोंबकळलेल्या अवस्थेत आहेत. झेंडीगेट, कोठला, कौलारू, मंगलगेट भागात कायम अस्वच्छता असते. प्रभागातील ड्रेनेज लाईन तुंबण्याचे प्रकार सातत्याने होतात. प्रभागात फेज टू योजनेतील जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. मात्र, त्यातून पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे सर्व भागात पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नाही.

या भागात रस्ते, पथदिवे व ड्रेनेज लाईनची अनेक कामे मार्गी लागली आहेत. अंतर्गत रस्तेही करण्यात आले आहेत. मात्र, रस्ते झाल्यावर पुन्हा पुन्हा केली जाणारी खोदाई व त्यानंतर दुरुस्ती होत नसल्याने रस्त्यांची दुरावस्था होत आहे.

## वारूळाचा मारुती परिसरात कचऱ्याची समस्या कायम

### तेलिखुंट परिसरातील रस्त्याच्या रखडलेल्या कामामुळे नाराजी

तेलिखुंट परिसर हा कायम वर्दळीचा चौक आहे. मध्य शहरातील चितळे रस्ता, कापड बाजार, सर्जेपुरा, डाळमंडई, आडते बाजार, दाणे डबरा आदी परिसराचे प्रमुख रस्ते या चौकात एकत्र येतात. या परिसरातील रस्त्याचे काम अनेक महिन्यांपासून रखडले आहे. अत्यंत संथगतीने काम सुरू असल्याने नागरिकांना त्रासाचा सामना करावा लागतो. त्यामुळे याबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

**२०१८ : जुना प्रभाग क्रमांक ९**



| जागा | नगरसेवक. | पक्ष | मते |
|---|---|---|---|
| अ | शीला चव्हाण | काँग्रेस | ३५३८ |
| ब | मालन ढोणे | भाजप | ६१२४ |
| क | श्रीपाद छिंदम | अपक्ष | ४५३२ |
| ड | सुप्रिया जाधव | काँग्रेस | ६४८४ |

**प्रभागाची व्याप्ती :** मोहन बाग, मातभाई गल्ली, तोफखाना, बागडपट्टी, लोणार गल्ली, शेरकर गल्ली, पारनाईक गल्ली, बेलदार गल्ली, कॅम्प कौलारू, घास गल्ली, कोठला, शनी गल्ली, झेंडीगेट परिसर, जुने सिव्हील हॉस्पिटल, एस.टी.डेपो, एस.टी. वर्क शॉप, कोठला, बापूशाह दर्गाह, मंगलगेट, हॉटेल मिलन, झेंडीगेट परिसर, हवेली.

**असा आहे प्रभाग क्रमांक १० :** • एकूण मतदार २२ हजार ९०० • महिला : ११४७९ पुरुष : ११४२०

दै.लोकमंथन

दि.१ जानेवारी २०२६

लोकमंथन

# राहुरीत गुन्हेगारी वाढली, पोलिसांची पकड सैलच !




**लोकमंथन प्रतिनिधी**

**देवळाली प्रवरा** : राहुरी तालुक्यात २०२५ हे वर्ष गुन्हेगारीच्या रक्तरंजित आणि भयावह छायेत गेले. गुन्हेगार बिनधास्त झाले, अवैध धंदे फोफावले आणि सर्वसामान्य नागरिक दहशतीखाली जगू लागले. कायदा राखण्याची जबाबदारी असलेली पोलिस यंत्रणा मात्र गुन्हे उघडकीस आणण्याच्या आकडेवारीवर समाधान मानताना दिसली. २०२५ मध्ये राहुरी पोलिस ठाण्यात तब्बल १ हजार २७ गुन्हे दाखल झाले. हा आकडा केवळ कागदावरचा नाही, तर तो तालुक्यातील बिघडलेल्या कायदा-सुव्यवस्थेचा आरसा आहे.

राहुरी तालुक्यात २०२५ मध्ये अल्पवयीन ५० मुली पळवून नेल्याच्या घटना समोर आल्या. महिलांवरील अत्याचाराचे ९ गुन्हे, तर विनयभंगाचे तब्बल ७४ गुन्हे दाखल झाले.

## गुन्हेगारीचा तीन वर्षांचा प्रवास

सन २०२३ मध्ये राहुरी पोलिस ठाण्यात १,०५५ गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी फक्त ७६३ गुन्ह्यांचा तपास पूर्ण झाला. २०२४ मध्ये पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी गुन्हेगारी नियंत्रणासाठी विविध उपक्रम हाती घेतल्याने गुन्ह्यांचा आकडा काहीसा कमी झाला. त्या वर्षी ९७८ गुन्हे दाखल होऊन ७३१ गुन्हे उघडकीस आले. मात्र २०२५ मध्ये गुन्हेगारीने पुन्हा उसळी घेत १,०२७ गुन्ह्यांचा टप्पा ओलांडला. जरी ८३३ गुन्हे उघडकीस आले असले, पण उरलेले गुन्हे? आरोपी मोकाट असताना नागरिक सुरक्षित कसे राहणार? तरी गुन्हेगारीचा आलेख खाली आणण्यात प्रशासन अपयशी ठरले.

## निष्कर्ष

२०२५ मध्ये राहुरी पोलिसांनी अनेक गुन्हे उघडकीस आणले, हे नाकारता येणार नाही. मात्र गुन्हेगारीचा वाढता आलेख, महिलांची असुरक्षितता, अवैध धंद्यांचा सुळसुळाट आणि अपूर्ण तपास या बाबी पाहता, पोलिस प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे आहे. केवळ गुन्हे उघडकीस आणणे पुरेसे नसून, गुन्हे घडण्याआधीच त्यांना आळा घालणे, हीच खरी कसोटी राहुरी पोलिसांसमोर आहे.

## गुन्ह्यांचा आलेख

खून-२, सदोष मनुष्यवध-२, खुनाचा प्रयत्न-५, अत्याचार- ९, विनयभंग-७४, दरोडा व तयारी-४, जबरी चोरी-१७, चैनस्नेचिंग-९, घरफोडी - ३९, दिवसा घरफोडी-६, दुचाकी चोरी-४६, चारचाकी वाहनचोरी-६, इतर चोरी- ५०, वाळू चोरी-६, शेतकरी अवजार चोरी-२२.

## ऑपरेशन 'मुस्कान' : दिलासादायक बाब

गुन्हेगारीच्या अंधारात एक आशेचा किरण ठरले ते ऑपरेशन 'मुस्कान'. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अपहरण झालेल्या ९९ मुलींना सुरक्षितपणे पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. शाळा, महाविद्यालये व सामाजिक कार्यक्रमांतून मुलींच्या सुरक्षिततेबाबत केलेले प्रबोधन स्तुत्य आहे. मात्र गुन्हे घडूच नयेत, यासाठी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक आहेत.

## अनोळखी मृतदेह : तपास यंत्रणेवर प्रश्नचिन्ह

२०२५ मध्ये बारागाव नांदूर परिसरात प्लास्टिकच्या पिंपात सापडलेला मृतदेह, मुळा नदीपात्रातील अनोळखी मृतदेह, तसेच नगर-मनमाड महामार्गावर संशयास्पद स्थितीत आढळलेले मृतदेह अशा १० घटनांतील मृतांची ओळख अजूनही पटलेली नाही. हे पोलिस तपासाच्या मर्यादा अधोरेखित करणारे वास्तव आहे.

## अवैध धंदे : गुन्हेगारीचे खरे मूळ

राहुरी शहर व ग्रामीण भागात वाळू तस्करी, मटका, जुगार अड्डे, गावठी दारू, नशेची औषधे, गावठी कट्टे हे अवैध व्यवसाय खुलेआम सुरू आहेत. या धंद्यांमधून निर्माण होणाऱ्या आर्थिक ताकदीच्या जोरावर गुन्हेगारांकडून सर्वसामान्यांवर दहशत निर्माण केली जात आहे. परिणामी मारहाण, दमदाटी, लुटमार, घरफोडी, दरोडे यांसारख्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. वाळू, मुरुम व मातीची तस्करी ही राहुरी तालुक्यातील गंभीर समस्या बनली असून, शासकीय संपत्ती लुटली जात असतानाही कारवाई तोकडी असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

Ahmednagar Edition
Jan 01, 2026 Page No. 2
Powered by: erelego.com

दै.नवराष्ट्र दि.१ जानेवारी २०२६



# ६०० कोटी रुपयांची कर्जमागणी

## नगर-मनमाड रस्ताकामासाठी नागरिकाचा प्रशासनाला उपरोधिक टोला

▶ रियाज पठाण । नवराष्ट्र

नवनागापूर. अहिल्यानगर-मनमाड महामार्गाच्या अनेक वर्षांच्या दुरवस्थेने नागरिकांचा संयम सुटल्याचे चित्र समोर आले असून, देहरे (ता. राहुरी) येथील सुनील चांदणे यांनी थेट स्टेट बँकेच्या एमआयडीसी शाखेकडे ६०० कोटी रुपयांच्या वैयक्तिक कर्जाची उपरोधिक मागणी करून संपूर्ण प्रशासनालाच आरसा दाखवला आहे. विशेष म्हणजे या अर्जाची प्रत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांना माहितीस्तव पाठवण्यात आली आहे. यामुळे रस्त्याच्या प्रश्नाला धार प्राप्त झाली आहे. अर्जदार सुनील चांदणे यांनी अर्जात नमूद केले आहे, की ते देहरे येथील रहिवासी असून त्यांच्या कुटुंबातील एकूण पाच सदस्यांचा रोजचा प्रवास अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरूनच होतो. स्वतःचा देहरे-राहुरी, पत्नीचा देहरे-वांबोरी, वहिनीचा देहरे-नगर, पुतणींचा देहरे-विळद घाट शाळेसाठी आणि मोठ्या बंधूंचा जिल्ह्यातील विविध ठिकाणी या रस्त्यावरून नियमित प्रवास होत असल्याने कुटुंबासाठी तो जीवघेणा ठरत आहे. मनमाड महामार्गाची अवस्था इतकी भयानक आहे की, रस्ता कमी आणि खड्ड्यांचे साम्राज्य अधिक आहे. परिणामी, त्यावरून प्रवास करणे म्हणजे अपघाताला आमंत्रण देण्यासारखे झाले आहे.



### पगारातून कपात करा

कर्जमागणी केलेले ६०० कोटी रुपये अहिल्यानगर-मनमाड महामार्गाच्या कामासाठी वापरण्याचे अर्जात चांदणे यांनी नमूद केले आहे. खर्चाचा तपशील बँकेला सादर करण्याची तयारी दर्शवतानाच, माझ्या पगारातून दरमहा हप्ता कापून घ्या, असे लिहून त्यांनी शासनाच्या निष्क्रीयतेवर उपरोधिक, पण तीव्र प्रहार केला आहे.

### राज्य, केंद्र सरकारपर्यंत पोहोचवला इशारा

अर्जाची प्रत मंत्र्यांना पाठवण्यात आल्याने, हा केवळ स्थानिक प्रश्न न राहता थेट राज्य व केंद्र सरकारपर्यंत पोहोचवलेला उपरोधिक इशारा ठरतो. रस्ता सरकारकडून होणार नसेल, तर नागरिक स्वतः पुढाकार घेतील, असा संदेश दिला गेला आहे. हसवणारा हा अर्ज प्रत्यक्षात रडवणारे वास्तव सांगतो आणि तरीही यंत्रणा शांत राहिली, तर उद्या उरतील फक्त अपघातांचे आकडे आणि निष्क्रीयतेची नोंद.

### विनोद नव्हे, तर सरकारच्या अपयशाची लक्तरे

खरे तर हा अर्ज हसण्याचा विषय नसून, गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या महामार्गाबाबत शासनाच्या अपयशाची लक्तरे वेशीवर टांगण्याचा प्रकार आहे. या रस्त्यावर आतापर्यंत असंख्य अपघात झाले, अनेक निष्पाप नागरिकांचे प्राण गेले, तर काही प्रवासी कायमचे अपंग झाले. मात्र प्रत्येक अपघातानंतर आश्वासनांची पुनरावृत्ती होते आणि काही दिवसांत सर्वकाही विसरले जाते. ज्या प्रवासासाठी पूर्वी ४५ मिनिटे लागत होती, त्याच प्रवासासाठी आज तीन-तीन तास खर्ची पडतात.

# जिल्हा धुळे

लोकमत

# पाठलाग करून वाळूचे ट्रॅक्टर पकडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिंदखेडा** : तालुक्यातील अलाने परिसरातील बुराई नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर मंगळवारी रात्री पोलिसांनी पाठलाग करून पकडले.

मंगळवारी (दि. ३०) रात्री ८ वाजेच्या सुमारास बुराई नदीतून वाळूची अवैध वाहतूक होणार असल्याची गुप्त माहिती पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना मिळाली होती. माहिती मिळताच वारे यांनी स्वतः मोटारसायकलवरून आलाने गावाजवळील अमरधाम परिसरात सापळा रचला. काही वेळातच वाळूने भरलेले दोन ट्रॅक्टर मुख्य रस्त्यावर येताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता, चालकांनी ट्रॅक्टर भरधाव वेगाने दरखेडा गावाच्या दिशेने पळवले.

**दोन्ही ट्रॅक्टर आलाने गावातील असल्याचे निष्पन्न झाले असून पुढील तपास पोलिस महसूल विभाग करत आहे.**

## थरारक पाठलाग आणि जप्ती

पोलिसांनी पाठलाग सुरू केल्याचे लक्षात येताच चालकांनी पकडले जाण्याच्या भीतीने धावत्या ट्रॅक्टरचे हायड्रोलिक उचलून ट्रॉलीतील वाळू रस्त्यावरच ओतून दिली आणि शेताच्या रस्त्याने पळ काढला. मात्र, पोलीस निरीक्षक वारे, कॉन्स्टेबल प्रशांत पवार आणि शिरीष भदाणे यांनी पाठलाग सुरूच ठेवत दोन्ही ट्रॅक्टर शोधून काढले आणि ते पोलीस ठाण्यात जमा केले.

## महसूल विभागाची कारवाई

या कारवाईची माहिती मिळताच तहसीलदार नितीनकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने घटनास्थळी धाव घेतली. रात्री ९ वाजेच्या सुमारास दरखेडा रस्त्यावरून स्वराज आणि मेस्सी कंपनीचे (दोन्ही लाल रंगाचे) विना क्रमांकाचे ट्रॅक्टर जप्त करण्यात आले. ग्राम महसूल अधिकारी ए. पी. मडोळे, एस. पी. साळुंके, एस. बी. गोमासे आणि पी. आर. कुलकर्णी यांच्या पथकाने पंचनामा केला.

जप्त करण्यात आलेल्या ट्रॅक्टरपैकी एकावर यापूर्वी पाच वेळा अवैध वाहतुकीप्रकरणी दंडात्मक आणि फौजदारी कारवाई झालेली आहे. मात्र, यावेळी नवीन शासन निर्णयानुसार अधिक कठोर कारवाई करण्याचे संकेत तहसीलदार देवरे यांनी दिले आहेत.

Hello Dhule
Page No. 4 Jan 01, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

# धुळ्यात साकारतेय आरटीओचे अत्याधुनिक ऑटोमॅटिक टेस्टिंग सेंटर

## वाहनधारकांचा वेळ वाचेल; युद्धपातळीवर काम सुरू

प्रवासी आणि मालवाहतूक वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र अधिक अचूक पद्धतीने देण्यासाठी धुळे आरटीओ प्रशासनातर्फे स्वयंचलित फिटनेस चाचणी केंद्रे (ऑटोमॅटिक टेस्टिंग सेंटर एटीसी) उभारण्यात येत आहे. लवकरच या ठिकाणी वाहनांची फिटनेस तपासणी स्वयंचलित यंत्रे सुरू होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जुन्या पद्धतीने वाहनांची तपासणी करत असत. मात्र, आता संगणकीय प्रणाली आणि स्वयंचलित यंत्रांच्या मदतीने वाहनांचे इंजिन, ब्रेक आणि इतर तांत्रिक बाबींची तपासणी केली जाणार आहे. यात मानवी हस्तक्षेपाला जागा नसल्याने अहवाल पूर्णपणे अचूक येणार आहे. वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी राज्यभरात एकूण ५४ केंद्र उभारली जाणार असून, त्यात धुळ्याचाही समावेश करण्यात आला आहे.




### वेळ वाचणार :

सध्या फिटनेस प्रमाणपत्रासाठी वाहनांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागते. मात्र, एटीसीमध्ये अत्याधुनिक सेन्सर्स आणि सॉफ्टवेअरमुळे एका वाहनाची संपूर्ण चाचणी अवघ्या सहा मिनिटांत पूर्ण होईल. यामुळे वाहनधारकांचा मोठा वेळ वाचणार आहे.

### अवघ्या सहा मिनिटांत वाहनांची फिटनेस तपासणी होणार :

स्वयंचलित केंद्रात ब्रेकिंग सिस्टीमची कार्यक्षमता, हेडलाइटचा प्रकाश आणि दिशा, स्टिअरिंगची पकड आणि अलाइनमेंट, वाहनाद्वारे होणारे प्रदूषण, स्पीड गव्हर्नर आणि टॅक्सची स्थिती, टायरची स्थिती आणि इंजिनचा आवाज, अवघ्या सहा मिनिटांत प्रक्रिया पूर्ण होणार आहे. तसेच पारंपरिक तपासणीमध्ये वाहनांना ट्रॅकवरून चालवावे लागे, जे वेळखाऊ होते. 'एटीसी'मध्ये वाहन स्थिर स्थितीतच सर्व चाचण्या घेता येतील. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर कोणताही परिणाम होणार नाही.

### फिटनेस टेस्टमध्ये केली जाते ही तपासणी

स्वयंचलित यंत्रांद्वारे इंजिन कार्यक्षमता आणि उत्सर्जन, ब्रेक कार्यक्षमता, स्टिअरिंग आणि सस्पेन्शनची सुरक्षितता, लाइट्स, सिग्नल्स, हेडलॅम्प्स आणि बत्तींची कार्यक्षमता, वाहनाचे टायर, व्हील आणि संरचनात्मक मजबुती, सुरक्षितता संबंधित इतर तांत्रिक तपासण्या केल्या जाणार आहेत. तसेच ऑटोमॅटिक टेस्टिंग सेंटरमध्ये अत्याधुनिक यंत्राद्वारे पारदर्शक वाहन तपासणी होणार असल्याने यांत्रिकदृष्ट्या योग्य वाहन रस्त्यावर येऊन तांत्रिक कारणांमुळे होणारे अपघात टळण्यास मदत होईल.

"

### धुळ्यात लवकरच सुविधा :

धुळे येथे प्रादेशिक परिवहन विभागातर्फे ऑटोमॅटिक टेस्टिंग सेंटर उभारण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. नऊ कोटी रुपये खर्च करून हे सेंटर उभारले जात आहे. या अत्यानुधिक यंत्राद्वारे पारदर्शकपणे वाहन तपासणी होणार आहे. जेणेकरून यांत्रिक दृष्ट्या योग्य असलेले वाहन रस्त्यावर येऊन, तांत्रिक कारणांमुळे होणारे अपघात कमी होतील. लवकरच ही सुविधा धुळेकरांसाठी सुरू होणार आहे.

**चारूदत्त व्यवहारे**, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे

लोकमत

# धुळे-चाळीसगाव महामार्गाचा कायापालट !



## प्रवासाचा वेळ वाचणार; दळण-वळणाला चालना

उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्याला जोडणारा सर्वात महत्त्वाचा दुवा असलेल्या धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या (NH-52) कामाला आता वेग आला आहे. विशेषतः धुळे ते चाळीसगाव या टप्प्यातील रखडलेली कामे मार्गी लागत असून, हा महामार्ग आता हाय-टेक स्वरूपात आकाराला येत आहे. यामुळे धुळे आणि चाळीसगाव दरम्यानचे अंतर अवघ्या काही मिनिटांवर येणार असून व्यापार आणि दळण-वळणाला मोठी चालना मिळणार आहे.

**कामाचे मुख्य आकर्षण :** ४ पदरी रस्ता आणि सुसज्ज उड्डाणपूल

धुळे ते चाळीसगाव या साधारण ६० ते ६५ किलोमीटरच्या अंतराचे रुंदीकरण करताना सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

**वेळेची बचत :** पूर्वी या प्रवासाला दीड ते दोन तास लागायचे, मात्र कामाच्या पूर्ततेनंतर हे अंतर ४५ ते ५० मिनिटांत पार करणे शक्य होईल.

**बायपासची सुविधा :** चाळीसगाव शहरात होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शहराबाहेरून काढण्यात आलेल्या बायपासचे काम प्रगतीपथावर.

**गरताड रेल्वे उड्डाणपूल :** या मार्गावरील रेल्वे क्रॉसिंगमुळे होणारी कोंडी फोडण्यासाठी गरताड जवळील उड्डाणपुलाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

## विकासाचे नवे द्वार: स्थानिकांना काय फायदा?

**व्यापारी वृद्धी :** चाळीसगावची कृषी उत्पन्न बाजार समिती आणि धुळ्यातील औद्योगिक वसाहत एकमेकांशी वेगाने जोडली जाईल.

**शिक्षण आणि आरोग्य :** चाळीसगावच्या रुग्णांना धुळे किंवा संभाजीनगर येथील मोठ्या रुग्णालयात पोहोचण्यासाठी 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळणे सोपे होईल.

**इंधनाची बचत :** चढ-उतार आणि खड्डे कमी झाल्यामुळे वाहनांच्या इंधनाचा खर्च २० टक्क्यांनी कमी होण्याचा अंदाज आहे.

## सद्यस्थिती आणि आव्हान

सध्या धुळे ते चाळीसगाव दरम्यान काही ठिकाणी पुलांची कामे सुरू असल्याने डायव्हर्शन देण्यात आले आहेत. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ठेवले आहे. तांत्रिक अडचणी आणि भूसंपादनाचे छोटे प्रश्न मार्गी लागल्याने आता कामाचा मार्ग मोकळा झाला आहे.

**प्रशासनाचा विश्वास :** धुळे-चाळीसगाव टप्प्यातील काम ९०% पूर्ण झाले असून, उर्वरित किरकोळ कामे आणि सुरक्षा भिंतींचे काम लवकरच पूर्ण होईल. हा मार्ग उत्तर महाराष्ट्राच्या प्रगतीची नवी जीवनवाहिनी ठरेल.

लोकमत
हॅलो धुळे
epaper.lokmat.com जळगाव, गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६

स्वागत नववर्षाचे २०२६




धुळ्यातील शिवतीर्थ चौकातील शहीद अब्दुल हमीद यांचा रणगाडा.

इंग्रजी नवीन वर्ष २०२६ हे धुळे जिल्ह्याच्या औद्योगिक आणि कृषी विकासासाठी चांगले ठरावे, अशी अपेक्षा धुळेकरांची आहे. विशेषत: सुलवाडे - जामफळ उपसा सिंचन योजना आणि बोरविहीर ते नरडाणा रेल्वे मार्ग या दोन महत्वाकांक्षी प्रकल्पांच्या कामाला यावर्षी अधिक गती मिळून, जिल्ह्याचा सिंचनाचा आणि दळणवळणाचा प्रश्नी मार्गी लागावा हीच अपेक्षा आहे.

# तापीचे पाणी आता थेट जामफळच्या कुशीत !



## उत्तर महाराष्ट्रात सिंचनाची मोठी क्रांती

### दुष्काळी तालुक्यांसाठी ठरणार वरदान

उत्तर महाराष्ट्रातील विशेषत धुळे आणि शिंदखेडा या दुष्काळी तालुक्यांसाठी 'वरदान' ठरणाऱ्या सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. तापी नदीचे अतिरिक्त पाणी दुष्काळी भागाकडे वळवणाऱ्या या महाकाय प्रकल्पाचे काम आता ८५ टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले असून, आगामी काळात खान्देशातील सुमारे १०० गावांचा कायापालट होणार आहे.

### कामाची सद्यस्थिती : ८५% काम पूर्ण

**जामफळ धरण :** धरणाचे मुख्य काम पूर्ण झाले असून पाणी साठवण्यासाठी ते सज्ज आहे.

**पंपगृह :** दभाशी आणि लळिंग येथील उपसा केंद्रांचे (पंपहाऊस) काम ९० टक्क्यांपेक्षा जास्त पूर्ण झाले आहे.

**पाईपलाईन :** मुख्य जलवाहिनीचे काम पूर्ण झाले असून, आता वितरिकांचे जाळे विणण्याचे काम सुरू आहे.

**रेल्वे क्रॉसिंग :** रेल्वे रुळांखालील पाईप पुशिंगच्या तांत्रिक कामासाठी विशेष परवानगी मिळाली असून ते कामही प्रगतिपथावर आहे.

शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण वर्षानुवर्षे पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असलेल्या शिंदखेडा पट्ट्यातील शेतकऱ्यांसाठी ही योजना 'लाईफलाईन' ठरणार आहे. या योजनेमुळे केवळ सिंचन नव्हे, तर परिसरातील भूजल पातळीत मोठी वाढ होणार असल्याने विहिरींच्या पाणी पातळीतही सुधारणा होईल.

### बजेटमध्ये झाली होती मोठी वाढ :

अडथळे झाले दूर राज्य शासनाने या प्रकल्पासाठी ५ हजार ३२९ कोटी ४६ लाख रुपयांच्या दुसऱ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेला हिरवा कंदील दाखवला आहे. सुरुवातीला कमी बजेट असलेल्या या योजनेचा खर्च वाढल्याने कामात काहीसे अडथळे आले होते, मात्र आता निधीचा प्रवाह सुरळीत झाल्याने ठेकेदार आणि जलसंपदा विभागाने कामाचा वेग वाढवला आहे.

### काय आहे योजनेचे स्वरूप?

तापी नदीवरील सुलवाडे बॅरेजमधून पावसाळ्यातील अतिरिक्त ९.२४ टीएमसी पाणी उपसा करून ते जामफळ धरणात साठवले जाईल. तिथून हे पाणी बंदिस्त पाईपलाईनद्वारे शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचवले जाणार आहे.

**लाभार्थी क्षेत्र :** ३३,३६७ हेक्टर जमीन ओलिताखाली येणार.

**फायदा होणारी गावे :** शिंदखेडा तालुक्यातील ४४ आणि धुळे तालुक्यातील २३ गावांसह परिसरातील एकूण १०० गावांना लाभ.

| ठळक वैशिष्ट्ये | तपशील |
|---|---|
| नदी | तापी नदी |
| मुख्य साठा | जामफळ धरण |
| प्रकार | उपसा सिंचन |
| सिंचन पद्धत | बंदिस्त नलिका वितरण प्रणाली |
| प्रशासकीय मंजुरी | ५,३२९.४६ कोटी (मे २०२५) |

## बोरविहीर-नरडाणा रेल्वे मार्गाचे काम युद्धपातळीवर !

### उत्तर भारताशी जोडले जाणार धुळे !

बोरविहीर (धुळे) ते नरडाणा हा नवीन रेल्वेमार्ग मनमाड-इंदूर रेल्वे प्रकल्पाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या मार्गाच्या कामाबाबतची सद्यस्थिती आणि महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे:

**प्रकल्पाची व्याप्ती आणि खर्च**

**एकूण लांबी :** सुमारे ५०.६० किलोमीटर.

**प्रकल्पाची किंमत :** या ५० किमीच्या टप्प्यासाठी सुमारे १,१७५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**उद्देश :** या मार्गामुळे धुळे शहर थेट उत्तर भारताशी (इंदूरमार्गे) जोडले जाईल, ज्यामुळे व्यापार आणि प्रवासासाठी मोठा फायदा होईल.

**रेल्वे स्थानके :** या मार्गावर न्यू धुळे (बोरविहीर), सिमखेडी, लामकाणे, सोनगीर आणि नरडाणा ही मुख्य स्थानके असणार आहेत.

### कामाची सद्यस्थिती

या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ३०२ हेक्टर जमिनीपैकी सुमारे २९३ हेक्टर जमिनीचे संपादन पूर्ण झाले आहे. वाढीव मोबदल्याबाबत जमिनीच्या मोजमापावरून शेतकऱ्यांच्या मागण्या सुरू आहेत, त्यासाठी प्रशासनाकडून फेरसर्वेक्षणाचे आदेश देण्यात आले आहेत. या मार्गावरील बांधकामाची जबाबदारी रचना इन्फ्रा इंजिनिअरिंगकडे सोपविली असून, सप्टेंबर २०२५ पर्यंत भौतिक प्रगती सुमारे ५८% इतकी झाली आहे.



### पूर्ण होण्याचा कालावधी

रेल्वेच्या अधिकृत अहवालानुसार, या मार्गाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट मार्च २०२८ पर्यंत ठेवण्यात आले आहे. जमिनीचा ताबा जसा मिळेल, तसा कामाचा वेग वाढवला जात आहे.

प्रमुख वैशिष्ट्ये



| घटक | तपशील |
|---|---|
| प्रकल्प प्रकार | नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग |
| एकूण अंतर | ५०.६० किमी |
| महत्त्वाची गावे | बोरविहीर, लामकाणे, सोनगीर, नरडाणा |
| बजेट (२०२५-२६) | ५२८ कोटी रुपये (या वर्षासाठी तरतूद) |

दिव्य मराठी, धुळे. गुरु

**अनास्था** • दोन्हीकडच्या ग्रामस्थांना करावा लागतो जीवघेणा प्रवास

# नरडाणा ते रेल्वेस्थानक भागाला जोडणारा रस्ता रेल्वेने केला बंद

प्रतिनिधी | कापडणे

नरडाणा रेल्वे स्थानकाचे आधुनिकीकरण करताना रेल्वे प्रशासनाने स्थानिक ग्रामस्थांच्या दळणवळणाचा मुख्य रस्ताच बंद केला आहे. यामुळे नरडाणा गाव आणि रेल्वे स्टेशन परिसर अशा दोन भागांत संपर्क तुटला असून, ग्रामस्थांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. समस्या न सुटल्यास रेल्वे रोको आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

रस्ता बंद केल्याने गावातील शाळा, बँका आणि दवाखाने हे एका बाजूला, तर रेल्वे स्थानक परिसर दुसऱ्या बाजूला अशी विभागणी झाली आहे. पर्यायी मार्ग म्हणून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वरील उड्डाणपुलाचा वापर करावा लागतो, मात्र तेथील भरधाव वाहनांमुळे अपघाताची मोठी भीती निर्माण झाली आहे.



जीव धोक्यात घालून रेल्वेरूळ ओलांडताना रहिवासी व शालेय विद्यार्थी.

**प्रमुख मागण्या :** गेट क्रमांक १२० जवळ मंजूर झालेल्या अंडर ब्रिजचे काम तातडीने सुरू करावे. तोपर्यंत ग्रामस्थांसाठी तात्पुरत्या स्वरूपात सुरक्षित रस्त्याची सोय करावी. विद्यार्थी आणि रुग्णांच्या सुरक्षेसाठी रेल्वेने संवेदनशील पावले उचलावीत. या निवेदनावर नरडाणा परिसरातील शेकडो ग्रामस्थ, प्रवासी, शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता रेल्वे प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अंडरब्रिजला मंजुरी मिळूनही प्रशासन सुस्त

काही काळापूर्वी पश्चिम रेल्वेचे विभागीय अधिकारी अशोक कन्सल यांनी या भागाची पाहणी केली होती. त्यावेळी त्यांनी गेट क्रमांक १२० जवळ अंडर ब्रिजला (बोगदा) मंजुरी दिली होती. मात्र, अद्याप या कामाला सुरुवात झालेली नाही. सद्यःस्थितीत इंदूर-मनमाड रेल्वे मार्गाचे काम सुरू असताना पूल क्रमांक २७५ खालील छोटा मार्गही बंद केला आहे. परिणामी, नागरिक रेल्वे रूळ ओलांडून ये-जा करत आहेत, जे अत्यंत धोकादायक आहे.

**ग्रामस्थांनी आंदोलनाचा घेतला पवित्रा**

रेल्वे प्रशासनाच्या या भूमिकेमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना लेखी निवेदन पाठवले आहे. भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्यास पूर्णतः रेल्वे प्रशासन जबाबदार राहील, असा स्पष्ट इशारा निवेदनात दिला आहे.

# धनगरांना आरक्षणासाठी मतदानावर बहिष्कार

## धनगर नेते दीपक बोराडे यांचा सरकारला इशारा

**प्रतिनिधी** | धुळे

संविधानानुसार धनगर समाजाला 'एसटी' प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी २१ जानेवारी रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन छेडण्यात येणार आहे. गेल्या आठ दशकांपासून समाजाची फसवणूक होत असून, आता 'आरक्षण नाही, तर मतदान नाही' हीच आमची भूमिका आहे,' असा इशारा धनगर नेते दीपक बोराडे यांनी धुळे येथे पत्रकार परिषदेत दिला.

बोराडे यांनी सरकारवर जोरदार टीका करताना सांगितले की, २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले आश्वासन ११ वर्षांनंतरही हवेतच आहे. सत्तेत आणण्यासाठी ज्या धनगर समाजाने भाजपला साथ दिली, त्याच समाजाच्या उपकाराची सरकारला जाण राहिलेली नाही. त्यामुळे मुंबईतील या आंदोलनात राज्यभरातील समाजबांधव आपल्या लेकराबाळांसह आणि विद्यार्थी गणवेशात सहभागी होणार आहेत. राजकीय पक्षांमधील नेत्यांनी पक्षभेद विसरून समाजासाठी मैदानात उतरावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या परिषदेला विठ्ठल मारनर, पंडीत मदने यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

दै.दिव्य मराठी

दि.१ जानेवारी,२०२६

दिव्य मराठी, धुळे. गुरु

अनास्था • दोन्हीकडच्या ग्रामस्थांना करावा लागतो जीवघेणा प्रवास

# नरडाणा ते रेल्वेस्थानक भागाला जोडणारा रस्ता रेल्वेने केला बंद

प्रतिनिधी | कापडणे

नरडाणा रेल्वे स्थानकाचे आधुनिकीकरण करताना रेल्वे प्रशासनाने स्थानिक ग्रामस्थांच्या दळणवळणाचा मुख्य रस्ताच बंद केला आहे. यामुळे नरडाणा गाव आणि रेल्वे स्टेशन परिसर अशा दोन भागांत संपर्क तुटला असून, ग्रामस्थांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. समस्या न सुटल्यास रेल्वे रोको आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

रस्ता बंद केल्याने गावातील शाळा, बँका आणि दवाखाने हे एका बाजूला, तर रेल्वे स्थानक परिसर दुसऱ्या बाजूला अशी विभागणी झाली आहे. पर्यायी मार्ग म्हणून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वरील उड्डाणपुलाचा वापर करावा लागतो, मात्र तेथील भरधाव वाहनांमुळे अपघाताची मोठी भीती निर्माण झाली आहे.



जीव धोक्यात घालून रेल्वेरूळ ओलांडताना रहिवासी व शालेय विद्यार्थी.

**प्रमुख मागण्या :** गेट क्रमांक १२० जवळ मंजूर झालेल्या अंडर ब्रिजचे काम तातडीने सुरू करावे. तोपर्यंत ग्रामस्थांसाठी तात्पुरत्या स्वरूपात सुरक्षित रस्त्याची सोय करावी. विद्यार्थी आणि रुग्णांच्या सुरक्षेसाठी रेल्वेने संवेदनशील पावले उचलावीत. या निवेदनावर नरडाणा परिसरातील शेकडो ग्रामस्थ, प्रवासी, शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता रेल्वे प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अंडरब्रिजला मंजुरी मिळूनही प्रशासन सुस्त

काही काळापूर्वी पश्चिम रेल्वेचे विभागीय अधिकारी अशोक कन्सल यांनी या भागाची पाहणी केली होती. त्यावेळी त्यांनी गेट क्रमांक १२० जवळ अंडर ब्रिजला (बोगदा) मंजुरी दिली होती. मात्र, अद्याप या कामाला सुरुवात झालेली नाही. सद्यःस्थितीत इंदूर-मनमाड रेल्वे मार्गाचे काम सुरू असताना पूल क्रमांक २७५ खालील छोटा मार्गही बंद केला आहे. परिणामी, नागरिक रेल्वे रूळ ओलांडून ये-जा करत आहेत, जे अत्यंत धोकादायक आहे.

### ग्रामस्थांनी आंदोलनाचा घेतला पवित्रा

रेल्वे प्रशासनाच्या या भूमिकेमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना लेखी निवेदन पाठवले आहे. भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्यास पूर्णतः रेल्वे प्रशासन जबाबदार राहील, असा स्पष्ट इशारा निवेदनात दिला आहे.

# धनगरांना आरक्षणासाठी मतदानावर बहिष्कार

## धनगर नेते दीपक बोराडे यांचा सरकारला इशारा

प्रतिनिधी | धुळे

संविधानानुसार धनगर समाजाला 'एसटी' प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी २१ जानेवारी रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन छेडण्यात येणार आहे. गेल्या आठ दशकांपासून समाजाची फसवणूक होत असून, आता 'आरक्षण नाही, तर मतदान नाही' हीच आमची भूमिका आहे,' असा इशारा धनगर नेते दीपक बोराडे यांनी धुळे येथे पत्रकार परिषदेत दिला.

बोराडे यांनी सरकारवर जोरदार टीका करताना सांगितले की, २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले आश्वासन ११ वर्षांनंतरही हवेतच आहे. सत्तेत आणण्यासाठी ज्या धनगर समाजाने भाजपला साथ दिली, त्याच समाजाच्या उपकाराची सरकारला जाण राहिलेली नाही. त्यामुळे मुंबईतील या आंदोलनात राज्यभरातील समाजबांधव आपल्या लेकराबाळांसह आणि विद्यार्थी गणवेशात सहभागी होणार आहेत. राजकीय पक्षांमधील नेत्यांनी पक्षभेद विसरून समाजासाठी मैदानात उतरावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या परिषदेला विठ्ठल मारनर, पंडीत मदने यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

सकाळ

# दीड वर्षानंतर साखरेचे वितरण पुन्हा सुरू

## धुळे जिल्ह्यात अंत्योदय कार्डधारकांसाठी लाभ

**धुळे, ता. ३१ :** रेशन दुकानातून दीड वर्षापासून बंद असलेले साखरेचे वितरण पुन्हा सुरू होत आहे. त्यामुळे गरीब आणि गरजू कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळेल.

जिल्ह्यात अंत्योदय योजनेचे एकूण ७५ हजार ७८६ लाभार्थी आहेत. त्यात धुळे तालुक्यात २५ हजार ७१३, साक्री २१ हजार ८९१, शिरपूर १४ हजार ३६३ आणि शिंदखेडा तालुक्यात १३ हजार ८१९ लाभार्थ्यांचा अंतर्भाव आहे. अंत्योदय कार्डधारकांना प्रत्येक महिन्याला एक किलो साखर २० रुपये प्रतिकिलो दराने वितरित केली जाईल. या योजनेत धुळे जिल्ह्यातील ७५ हजारांहून अधिक लाभार्थ्यांचा समावेश आहे. खुल्या बाजारातील वाढलेल्या दराच्या तुलनेत ही सवलत गरीब कुटुंबांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.



जिल्हा पुरवठा विभागाने वितरणासाठी आवश्यक साखरेचा साठा तयार केला आहे. लवकरच सर्व रेशन दुकानदारांना साखरेचे वितरण सुरू करण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत. सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना भगत यांनी सांगितले, की केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार साखरेचा पुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला आहे. केवळ अंत्योदय कार्डधारकांना या सवलतीचा लाभ मिळणार आहे. प्राधान्य कुटुंब किंवा इतर कार्डधारकांना हा पुरवठा लागू होणार नाही.

Dhule, Dhule-Today
01/01/2026 Page No. 1

दै.देशदुत दि.१ जानेवारी,२०२६

देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
01 Jan 2026 - Page 3

# नरडाणा ते रेल्वेस्थानक भागाला जोडणारा रस्ता केला बंद

## दोन्हीकडच्या ग्रामस्थांना करावा लागतो जीवघेणा प्रवास, रेल्वेस्थानकाकडे जाण्यासाठी बोगदा करण्याची ग्रामस्थांची मागणी

■ **कापडणे । प्रतिनिधी**

नरडाणा गाव ते रेल्वे स्टेशन परिसर अशा दोन प्रमुख भागांना जोडणारा रस्ता रेल्वे प्रशासनाकडून बंद करण्यात आल्याने, ग्रामस्थांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. नरडाणा येथील पश्चिम रेल्वेचे रेल्वे स्थानक हे जरी सेवा सुविधांयुक्त बनविण्यात आले असले तरी यात ग्रामस्थांचे हित पाहण्यात आलेले नाही. यात रेल्वे स्टेशनकडे जाणारा बोगदा तयार करावा अशी मागणी रेल्वे स्थानक ते गावात ये-जा कराव्या लागणाऱ्या ग्रामस्थांनी, विद्यार्थ्यांनी व व्यावसायीकांनी केली आहे.

या संदर्भात प्रधानमंत्री, रेल्वेमंत्री यासह विविध मंत्री महोदय तसेच पदाधिकारी व शासकीय अधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात निवेदन देण्यात आले आहे.

सुरत-भुसावळ या पश्चिम रेल्वेच्या स्थानकावरील नरडाणा या गावाचे रेल्वे स्थानक हे रेल्वे प्रशासनाने अत्याधुनिक अशा सर्व सेवा व सुविधांनी युक्त केले. पण हे करतांना या रेल्वे स्थानकाकडे जाण्यासाठी आधीपासून सुरू असलेला रस्ता बंद करण्यात आला आहे. नरडाणा गावाचे, नरडाणा गाव व रेल्वे स्टेशन परिसर असे दोन प्रमुख भाग पडतात. रेल्वे स्टेशन भागात राहणारे ग्रामस्थ, विद्यार्थी, व्यावसायीक यांना दैनंदिन कामासाठी नरडाणा गावात जावे लागते. तसेच गावातील विविध नागरिकांना रेल्वेच्या प्रवासासाठी व रेल्वे संबंधित कामासाठी, रेल्वे स्थानकावर यावे लागते. शिक्षणासाठी गावातील शाळांमध्ये जाणारी विद्यार्थी, दैनंदिन व्यवहारासाठी बँकांमध्ये जाणारे नागरिक, दवाखान्यात जाणारी रुग्ण व त्याचे नातेवाईक, गावात विविध



जीवनावश्यक वस्तूंसाठी ये-जा करणाऱ्या ग्रामस्थांना सुरक्षित असा एकही रस्ता नाही. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीनच्या उड्डाणपुलावरून यायचे झाल्यास भरधाव वेगाने वाहणाऱ्या वाहनांच्या मधून रस्ता काढून जाणे म्हणजे स्वतःच्या जीवाशी खेळणे आहे.

दरम्यान, पश्चिम रेल्वेचे विभागीय अधिकारी अशोक कन्सल यांनी या ठिकाणी येऊन पाहणी केली असता, गेट क्रमांक १२० या ठिकाणी अंडर ब्रिज बोगद्याला मंजुरी दिली होती. परंतु त्या संदर्भात रेल्वे प्रशासनाकडून अजून पर्यंत कोणतेही दखल घेण्यात आलेली नाही. सद्यःस्थितीत इंदूर -मनमाड मार्गाचं काम हे प्रगतीपथावर असून पूल क्रमांक २७५ मधून दोन्ही परिसरातील लोकांचे दळणवळण होत असतांना त्या ठिकाणी असलेला रेल्वे रुळा खालून जाणारा छोटासा पूल प्रशासनाकडून बंद करण्यात आलेला असून नागरिकांना विद्यार्थी व शेतकऱ्यांना रेल्वेच्या रुळांना ओलांडून यावे जावे लागत आहे. रुळावरून येणे हे प्रवाशांच्या विद्यार्थ्यांच्या व शेतकऱ्यांच्या जीवितास अत्यंत धोकेदायक असून, भविष्यात एखादी दुर्घटना घडल्याची शक्यता नाकारता येत नाही. दुर्दैवाने एखादी दुर्घटना घडल्यात यास रेल्वे प्रशासन जबाबदार राहिल. मागणी पूर्ण न झाल्यास रेल्वे रोको आंदोलनाचा पर्याय अवलंबवावा लागेल अशा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. रेल्वे प्रशासनाने ग्रामस्थांच्या या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असल्याचे या निवेदनात म्हटले आहे.

सदर निवेदन प्रधानमंत्री, रेल्वे मंत्र्यांसह, राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, विद्यमान खासदार, जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांना पाठवण्यात आहे आहेत. या निवेदनावर नरडाणासह परिसरातील विविध ग्रामस्थ, प्रवासी, रेल्वे स्टेशन वरील नागरीक, शेतकरी व विद्यार्थी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार



नरडाणावासीयांचा प्रश्न रेल्वे प्रशासनाने गांभिर्याने घेण्याची आवश्यकता आहे. अस्तित्वात असलेला रस्ता बंद केल्याने नरडाणा गाव व रेल्वे स्थानक परिसरातील ग्रामस्थांची मोठी ससेहोलपट होत आहे. बोगदा न झाल्यास एखादी अप्रिय घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रेल्वे प्रशासनाने या मागणीची दखल न घेतल्यास तीव्र जनआंदोलन छेडले जाईल तसेच भविष्यात, जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमारभाऊ रावल यांच्या माध्यमातून दिल्ली येथे शिष्टमंडळ नेऊन केंद्र स्तरावर पाठपुरावा केला जाईल. नरडाणा ग्रामस्थांचा हा जिव्हाळ्याचा विषय असून त्यासाठी सर्वंकष प्रयत्न केले जातील.

**- एल.डी.पाटील**, माजी पंचायत समिती सदस्य

# जिल्हा जळगाव

दै.लोकमत दि.१ जानेवारी,२०२६

लोकमत

# माल वाहतुकीतून रेल्वेला १८३ कोटींचा महसूल

## भुसावळ विभागाची कामगिरी; महसुलात ९३ टक्क्यांची वाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**भुसावळ :** मध्य रेल्वेने मालवाहतूक आणि पार्सल क्षेत्रात चालू आर्थिक वर्षात नोव्हेंबर २०२५ पर्यंत मध्य रेल्वेने पार्सल वाहतुकीतून तब्बल १८३.८० कोटी रुपयांचा विक्रमी महसूल मिळवला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यात ३७ टक्के वाढ झाली असून, यात भुसावळ विभागाने ९३ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे.

मध्य रेल्वेच्या एकूण कामगिरीत भुसावळ विभागाचा वाटा लक्षणीय ठरला आहे. मागील आर्थिक वर्षात (२०२४-२५) भुसावळ विभागाला पार्सल वाहतुकीतून ८.९० कोटी रुपये मिळाले होते. मात्र, चालू वर्षात ही रक्कम १७.२० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. मुंबई विभागाने सर्वाधिक १३६.२० कोटींची कमाई केली असली तरी, टक्केवारीच्या बाबतीत भुसावळ विभागाने सर्वाधिक वाढ नोंदवली आहे.

मुंबई विभाग पार्सल महसुलात आघाडीवर असून चालू आर्थिक वर्षात १३६.२० कोटी रुपयांचा महसूल मिळवला आहे. मागील वर्षी हा आकडा ९५.२० कोटी रुपये होता, म्हणजेच ४३ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. पुणे विभागातून २०.२० कोटी, नागपूर विभागातून ७.६० कोटी, तर सोलापूर विभागातून २.६० कोटी रुपयांचा पार्सल महसूल प्राप्त झाला आहे.



### 'शेतकरी समृद्धी' ठरली विशेष

शेतकऱ्यांचा माल परवडणाऱ्या दरात बाजारपेठेपर्यंत पोहोचवण्यासाठी देवळाली ते दानापूर दरम्यान सुरू करण्यात आलेल्या 'शेतकरी समृद्धी विशेष' ट्रेनला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. आतापर्यंत या गाडीच्या ६३ फेऱ्या झाल्या असून, त्यातून ९०४४ टन मालाची वाहतूक झाली. यातून रेल्वेला ३.२४ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे.

### रेशीम कोशांची पहिलीच रेल्वे वाहतूक

रेल्वेने प्रथमच रेशीम कोशांच्या वाहतुकीत पाऊल ठेवले आहे. नोव्हेंबर महिन्यात सोलापूर आणि पंढरपूर येथून कर्नाटकातील राम नगरम या आशियातील सर्वात मोठ्या बाजारपेठेत १४,९३९ किलो रेशीम कोष पाठवण्यात आले.

### नव्या प्रयोगांमुळे वाढले उत्पन्न

या नावीन्यपूर्ण प्रयोगामुळे रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

लोकमत

# महावितरणच्या जागेत दुकान, नगरपालिकेने बजावली नोटीस

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोदवड :** बोदवड शहरात अतिक्रमणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, वीज वितरण कंपनीच्या शासकीय रोहित्रालगत थेट पक्क्या टिन शेडचे अतिक्रमण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात असलेल्या महावितरण कंपनीच्या रोहित्रासाठी शासनाने स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिली असताना, त्या शासकीय जागेचा गैरवापर करण्यात आला आहे.

या रोहित्रालगत असलेल्या ज्यूस सेंटर चालकाने थेट रोहित्राकडे जाण्याचा मार्गच बंद करत पक्के टिन शेड उभारून अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकारामुळे रोहित्राच्या देखभाल, दुरुस्ती व आपत्कालीन कामकाजात अडथळा निर्माण होण्याची शक्यता असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

**महावितरण कंपनीच्या शेड उभारलेल्या व्यक्ती बाबत नगरपंचायत कडे तक्रार दिली असून संबधिताला आता कायदेशीर नोटीस देणार आहेत.**

योगेश जैस्वाल, सहायक उपअभियंता

महावितरणने लेखी नोटीस दिल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

सतीश पुदाके, मुख्याधिकारी

## नगरपंचायतीकडे लेखी तक्रार

या अतिक्रमणाबाबत शहरातील नागरिकांनी नगरपंचायतीकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीची दखल घेत नगरपंचायत कार्यालयाने संबंधित अतिक्रमणधारकास बांधकाम परवान्याची वैध कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत अनधिकृत बांधकाम केलेल्या जमील बागवान यांची प्रतिक्रिया घेतली असता मला कल्पना आहे की तक्रार कोणी दिली आहे, मी सुद्धा नगरपंचायतकडे एक तक्रार दिली आहे, असे सांगितले. तर या अनधिकृत बांधकामबाबत नगरपंचायतकडे तक्रार आल्याची माहिती नगरपंचायत कार्यालयाकडून देण्यात आली

लोकमत

# घरपट्टी अन नळपट्टी करवसुलीने ग्रामपंचायती झाल्या मालामाल..!

## भडगावमध्ये ४९ ग्रामपंचायतींची थकबाकी ३ कोटी २० लाख; अखेरच्या दिवशी कार्यालयांत गर्दी

अशोक परदेशी
लोकमत न्यूज नेटवर्क

**भडगाव** : शासनाने ३१ डिसेंबरपर्यंत थकबाकी भरल्यास ५० टक्के सवलत देण्याचे जाहीर केल्याने सर्वच ग्रामपंचायतींची करवसुली जोमात झाली. त्यामुळे करसवलतीच्या माध्यमातून ग्रामस्थांचा प्रतिसाद चांगला मिळत असल्याच्या प्रतिक्रिया ग्रा. पं. अधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

### चालू वर्षाचा कर १०० टक्के भरावा लागणार

ग्रामविकास विभागाकडून ५० टक्के करसवलतीचा अध्यादेश जारी झाल्याने शासन निर्णयानुसार गावातील करवसुलीने वेग पकडला आहे. ३१ डिसेंबर ही शेवटची मुदत असल्याने घरपट्टी व पाणीपट्टी थकबाकी भरण्यासाठी भडगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये ग्रामस्थांची मोठी गर्दी होत आहे. चालू वर्षाचा कर मात्र १०० टक्के भरावा लागणार आहे. या योजनेला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ द्यावी, अशी मागणी बाजार समिती उपसभापती पी. ए. पाटील यांनी केली आहे.

### थकबाकी वसुलीसाठी कर्मचारीही घरोघरी

थकबाकी भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. थकबाकी वसुलीसाठी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी घरोघरी फिरताना दिसून आले. शासनाने थकबाकी वसुलीत ५० टक्के सूट दिल्याने ग्रामपंचायतींच्या थकबाकी वसुलीत मोठी भर पडली आहे. कोणतीही निवडणूक लागली म्हणजे इच्छुक उमेदवार संपूर्ण थकबाकी भरण्यासाठी धावपळ करताना दिसतात. काही जण थकबाकीची रक्कमच भरत नाहीत, असेही चित्र गावोगावी दिसून येते.

**५० टक्के**

सूट दिल्याने अनेक ग्रामस्थांनी त्यांची जुनी थकबाकी त्वरित भरणे पसंत केले आहे. अखेरच्या दिवशी अनेक ग्रामपंचायतींमध्ये थकबाकी भरण्यासाठी ग्रामस्थांची गर्दी होती. गेली काही वर्षे थकबाकी असलेल्या ग्रामस्थांनाच या नव्या योजनेचा लाभ मिळणार आहे.

**थकबाकीचा भरणा केल्यास ३१ डिसेंबरपर्यंत होती ५० टक्के सूट**

> ग्रामपंचायतीच्या थकबाकी रकमेत ५० टक्के सूट देणाऱ्या योजनेची मुदत ही ३१ डिसेंबरपर्यंत होती. ३१ मार्च २०२५ या मागील वर्षातील थकबाकीला ५० टक्के सूट शासनाने दिली आहे तर १ एप्रिल २०२५पासून चालू वर्षाची थकबाकी पूर्ण भरावी लागणार आहे. घरपट्टीची थकबाकी १ कोटी ८० लाख इतकी आहे तर पाणीपट्टीची थकबाकी १ कोटी ४२ लाख इतकी आहे. शासनाने दिलेल्या सवलतीमुळे थकबाकीची मोठ्या प्रमाणावर वसुली झाली. शेवटच्या दिवशीही अनेक ग्रामपंचायतींमध्ये मोठी गर्दी दिसून आली.
>
> **अशोक खैरनार**, ग्रामपंचायत विभाग, विस्तार अधिकारी, भडगाव

भरणार
रकंडिशन
न्बीमध्ये)
३-१५, ६-१५
मराठी चित्रपट
ण्यायोग्य
विद्यालय
ाध्यम
चेन खेडकर,
ार्थ चांदेकर,
ळी इ.
गोल्ड
१०० रु.
२३२८२४३९
चित्रपट मनोरंजन

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
01 Jan 2026 - Page 8

# जिल्ह्यात २०२५ मध्ये बाल सुरक्षेच्या क्षेत्रात मोठी प्रगती

## २५० बालविवाह रोखले, ६७ मुले व मुली मानवी तस्करीतून वाचवली

■ अमळनेर । प्रतिनिधी

बालसंरक्षणाच्या दृष्टीने २०२५ हे वर्ष जळगांव जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले कारण आधार बहुउद्देशीय संस्था अमळनेर या संस्थेने जिल्हा प्रशासन, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा आणि समुदाय नेते यांच्या घनिष्ठ समन्वयातून एकूण ३१७ मुलांना वर्षभरात वाचवले.

यापैकी २५० मुलांना बालविवाहापासून तर ६७ मुलांना मानवी तस्करीपासून वाचवण्यात आले. तस्करीतून वाचवलेल्या मुलांपैकी ३३मुली आणि ३४मुले होती. आधार बहुउद्देशीय संस्था ही Just Rights for Children (JRC) या प्रकल्पात देशातील सर्वात मोठ्या बालसंरक्षण नेटवर्कची भागीदार संस्था असून, देशभरातील ४५१ जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या २५० पेक्षा अधिक संस्थांचे हे नेटवर्क बालहक्कांचे संरक्षण आणि मुलांवरील गुन्हे रोखण्यासाठी काम करते. प्रतिबंध, संरक्षण आणि न्यायालयीन कारवाई या (Prevention, Protection and Procedure) ३P मॉडेलवर कार्यरत या नेटवर्कने जानेवारी २०२५ पासून आजपर्यंत देशभरात १,९८,६२८ बालविवाह रोखले आणि ५५,१४६ मुलांना मानवी तस्करीतून वाचवले आहेत. यापैकी ४०,८३० मुलगे आणि १४,३१६ मुली होत्या. बालतस्करीच्या एकूण ४२,२१७ प्रकरणांवर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

संयुक्त कृतीच्या परिणामाबद्दल बोलताना आधार संस्था अध्यक्ष डॉ.भारती पाटील व संचालक रेणू प्रसाद यांनी सांगितले, बालसंरक्षणाच्या दृष्टीने २०२५ हे वर्ष आमच्यासाठी मैलाचा दगड ठरले आहे. जिल्हा प्रशासन, पोलिस, ग्रामपंचायती आणि शिक्षक यांच्यासोबत जवळून कार्य केल्यामुळे जमिनीवर स्पष्ट बदल दिसत आहेत. जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणेचा या प्रकल्पात संवेदनशील सहभाग असून त्यांच्या सक्रियतेमुळेच हे शक्य झाले आहे.

■ जळगाव जिल्हा प्रशासनाच्या 'बाल विवाह मुक्त भारत' या १०० दिवसीय मोहिमेत समन्वयाने काम करताना संस्थेने विवाह सोहळ्यांमध्ये सेवा देणारे केटरर, तंबू पुरवठादार, टेलर्स आदी घटकांशी संपर्क साधून बालविवाह रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या प्रकल्पात आधार संस्थे कडून प्रकल्प संचालक प्राध्यापक विजय वाघमारे, जिल्हा समन्वयक आनंद पगारे, कार्यक्रम समन्वयक मोहिनी धनगर, सुनील हिवाळे, दिपाली हिवाळे, प्रदीप पाटील निवेदिता ताठे हे काम पाहतात.

**–आनंद पगारे, जिल्हा प्रकल्प समन्वयक जस्ट राईट्स फॉर चिल्ड्रेन प्रकल्प आधार बहुउद्देशीय संस्था**

आपल्यातील मुले ही समाजातील सर्वात असुरक्षित घटक आहेत आणि त्यांना वाचवणे महत्त्वाचे असले तरी ते केवळ पहिले पाऊल आहे. त्यांचे पुनर्वसन, शिक्षणात पुनःप्रवेश आणि असुरक्षित कुटुंबांना शासन योजनांद्वारे मदत करणे आवश्यक आहे, ज्यामुळे दारिद्र्य, बालमजुरी आणि बालविवाहाचा दुष्टचक्र मोडता येईल.

देशभरातील इतर गठउ भागीदार संस्थांबरोबर मिळून ही संस्था २०३० पर्यंत बालविवाह निर्मूलन, बालमजुरीतून मुलांची सुटका आणि वेगवेगळ्या जिल्ह्यांतील तसेच राज्यांमधील मजुरी, विवाह आणि देहव्यापारासाठी होणाऱ्या बालतस्करीची प्रकरणे ओळखून त्यावर कार्यवाही करण्यासाठी प्रयत्नशील आहे. हे नेटवर्क रेल्वे संरक्षण दलासह विविध कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांबरोबर घनिष्ठ समन्वय ठेवून वेळीच हस्तक्षेप सुनिश्चित करते.

कारण प्रत्येक धर्मात विवाह विधी प्रामुख्याने धर्मगुरूंमार्फतच केले जातात, त्यामुळे नेटवर्कने देशभरातील तीन लाखांहून अधिक विविध धर्मांतील धर्मगुरूंना संलग्न करून बालविवाह हा दंडनीय गुन्हा असल्याचा संदेश दिला आहे आणि कोणत्याही धर्मात किंवा श्रद्धेत या गुन्ह्याला मान्यता नाही हे स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील मोठ्या संख्येने धार्मिक स्थळांवर त्यांच्या परिसरात बालविवाहास परवानगी नाही असे फलक लावण्यात आले आहेत.

# जिल्ह्यात ५५६ कोटी वीज थकबाकी; कारवाई होणार

## महावितरण कंपनी ॲक्शन मोडवर; राजकीय वरदहस्त असलेल्यांचेही वीज कनेक्शन कापले जाणार

प्रतिनिधी | जळगाव

जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील शहर आणि ग्रामीण भागात महावितरणने वीज बिल थकबाकीदारांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला आहे. जळगाव जिल्ह्यात ५५६ कोटी रुपयांची वीज थकबाकी आहे. वारंवार आवाहन करूनही बिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या सहा हजार ग्राहकांचा वीजपुरवठा डिसेंबर महिन्यात खंडित करण्यात आला आहे. आता राजकीय वरदहस्त असलेल्या आणि आर्थिक संपन्न असूनही देयके न भरणाऱ्या बड्या थकबाकीदारांची नावे आता सार्वजनिक केली जाणार आहेत.

जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यात कृषी वर्गवारी वगळता सुमारे साडेसहा लाख लघुदाब ग्राहकांकडे महावितरणची ११०३ कोटी २३ लाख रुपयांची थकबाकी आहे. यात जळगाव जिल्ह्यात ५५६ कोटी ५३ लाख, धुळे जिल्ह्यात ३२२ कोटी १० लाख व नंदुरबार जिल्ह्यात २२४ कोटी ६० लाख रुपयांची थकबाकी आहे. विशेष म्हणजे अनेक ग्राहकांनी वर्षभरापासून एक रुपयाचाही भरणा केलेला नाही. यामुळे महावितरणच्या थकबाकीचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे. मुजोर ग्राहकांविरोधात थेट पोलिस बंदोबस्तात कारवाईच्या सूचना महावितरणच्या जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी यांनी परिमंडलातील अभियंत्यांना दिल्या आहेत.

### पोलिस बंदोबस्तात कारवाई करणार

थकबाकी वसुलीसाठी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली आहेत. काही संवेदनशील भागांत कर्मचाऱ्यांना विरोध होण्याची शक्यता लक्षात घेता, ही कारवाई आता पोलिस बंदोबस्तात केली जाणार आहे.

**कामाची गोष्ट**

### ग्राहकांनी ऑनलाइन भरावे वीजबिल

महावितरणने ऑनलाइन बिल भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. यूपीआय नेट बँकिंग, वॉलेट्स, फोन पे, गुगल पे, महावितरणच्या वेबसाइटद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

# धरणासाठी केंद्राचा २७.१५ कोटी

## पाडळसरे निम्न तापी प्रकल्पाला अभियंत्यांची कमतरता कायम

▸ **अमळनेर (वा.)** तालुक्यातील निम्न तापी प्रकल्पाअंतर्गत पाडळसरे धरणाच्या कामासाठी केंद्र शासनाकडून २७.१५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. राज्य शासनाच्या तुलनेत केंद्राचा ५४.५० टक्के हिस्सा असून, झालेल्या कामाच्या मोबदल्यात केंद्राकडून निधी प्राप्त होतो. यासाठी ५८ कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठवण्यात आला होता, त्यापैकी २७.१५ कोटी मंजूर झाले आहेत. यासाठी प्रकल्पाच्या नावाने स्वतंत्र खाते उघडणे आवश्यक आहे. प्रकल्पसाठी एकूण २८ पदे अभियंत्यांची मंजूर आहेत परंतु फक्त आठच अभियंत्यांवर कामाचा ताण वाढला आहे. पावसाळा संपला असला तरी तापी नदीत अजूनही पाणी वाहत असल्याने नदीपात्रातील कामाला नवीन वर्षाच्या पहिल्या महिन्याच्या अखेरीस सुरुवात होणार आहे. नदीपात्रातील २३ प्रस्तंभांपैकी १८ प्रस्तंभांचे काम पूर्ण झाले आहे. त्यातील ६, १२ व १८ क्रमांकाच्या प्रस्तंभांवर रिव्हर्स स्लुईस बसवण्यात येणार आहेत.



### गेट बसणार...

नदीपात्रातील साचलेला गाळ वाहून जाण्यासाठी क्रेस लेव्हलखाली गेट बसवले जाणार असून त्याची डिझाइन मंजुरीसाठी पाठवण्यात आली आहे. ८ व १७ क्रमांकाचे प्रस्तंभ विशेष असून त्यांची लांबी अधिक असणार आहे. जानेवारी अखेरीस टाय फ्लॅटचे काम सुरू होणार असून त्यानंतर ट्रुनीयन गर्डरचे काम हाती घेतले जाईल.

### सात्रीतील नागरी सुविधांची कामे सुमारे ५० टक्के पूर्ण ; बाधित गावांचे पुनर्वसन

उपसा सिंचन योजनांअंतर्गत कलाली व बोहरा येथील पंप हाऊसचे काम सुरू झाले असून पाईपलाईन टाकण्याचे कामही मोठ्या प्रमाणावर पूर्ण झाले आहे. टप्पा-१ मधील लाभक्षेत्राच्या सर्वेक्षणाला मंजुरी मिळाली असून सर्व बाधित गावांचे पुनर्वसन एकाच वेळी करण्यास परवानगी देण्यात आली आहे. सात्री गावातील नागरी सुविधांची कामे सुमारे ५० टक्के पूर्ण झाली आहेत.

### ३२ हजार ३२८ हेक्टर क्षेत्रावर सिंचन होणार

- एकूण २४७१.९० हेक्टर जमीन संपादनापैकी ८१७.५९ हेक्टर जमीन संपादित झाली असून उर्वरित प्रक्रियेत आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात २५,६५७ हेक्टर लाभक्षेत्र असून एकूण ३२,३२८ हेक्टर क्षेत्रावर सिंचन होणार आहे.
- सध्या १६२० हेक्टर क्षेत्रावर अप्रत्यक्ष सिंचन सुरू आहे. प्रकल्पाचे ४२ टक्के काम पूर्ण झाले आहे.
- जुलैअखेरपर्यंत प्रकल्पासाठी १२४६.५७ कोटी रुपये प्रत्यक्ष कामावर व ८०.९७ कोटी रुपये आस्थापना खर्चावर खर्च झाले आहेत.
- मार्च २०२५-२६ मध्ये १०० कोटी रुपये मंजूर होऊन खर्च झाले असून पुरवणी यादीत आणखी १०६ कोटी रुपये मंजूर झाले आहेत.
- प्रकल्पाला केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील, मंत्री गिरीश महाजन, खासदार स्मिता वाघ यांचा पाठबळ मिळाल्याने कामाला वेग आला असला तरी अभियंत्यांची मोठी कमतरता जाणवत आहे.

# जिल्ह्यात ५५६ कोटी वीज थकबाकी; कारवाई होणार

## महावितरण कंपनी ॲक्शन मोडवर; राजकीय वरदहस्त असलेल्यांचेही वीज कनेक्शन कापले जाणार

प्रतिनिधी | जळगाव

जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील शहर आणि ग्रामीण भागात महावितरणने वीज बिल थकबाकीदारांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला आहे. जळगाव जिल्ह्यात ५५६ कोटी रुपयांची वीज थकबाकी आहे. वारंवार आवाहन करूनही बिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या सहा हजार ग्राहकांचा वीजपुरवठा डिसेंबर महिन्यात खंडित करण्यात आला आहे. आता राजकीय वरदहस्त असलेल्या आणि आर्थिक संपन्न असूनही देयके न भरणाऱ्या बड्या थकबाकीदारांची नावे आता सार्वजनिक केली जाणार आहेत.

जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यात कृषी वर्गवारी वगळता सुमारे साडेसहा लाख लघुदाब ग्राहकांकडे महावितरणची ११०३ कोटी २३ लाख रुपयांची थकबाकी आहे. यात जळगाव जिल्ह्यात ५५६ कोटी ५३ लाख, धुळे जिल्ह्यात ३२२ कोटी १० लाख व नंदुरबार जिल्ह्यात २२४ कोटी ६० लाख रुपयांची थकबाकी आहे. विशेष म्हणजे अनेक ग्राहकांनी वर्षभरापासून एक रुपयाचाही भरणा केलेला नाही. यामुळे महावितरणच्या थकबाकीचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे. मुजोर ग्राहकांविरोधात थेट पोलिस बंदोबस्तात कारवाईच्या सूचना महावितरणच्या जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी यांनी परिमंडलातील अभियंत्यांना दिल्या आहेत.

### पोलिस बंदोबस्तात कारवाई करणार

थकबाकी वसुलीसाठी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली आहेत. काही संवेदनशील भागांत कर्मचाऱ्यांना विरोध होण्याची शक्यता लक्षात घेता, ही कारवाई आता पोलिस बंदोबस्तात केली जाणार आहे.

**कामाची गोष्टी**

### ग्राहकांनी ऑनलाइन भरावे वीजबिल

महावितरणने ऑनलाइन बिल भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. यूपीआय नेट बँकिंग, वॉलेट्स, फोन पे, गुगल पे, महावितरणच्या वेबसाइटद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

**दै.तरुण भारत** **दि.१ जानेवारी,२०२६**

तरुण भारत
01 Jan 2026 - Page 2
epaper.tarunbharatlive.com

# जिल्ह्यात केवळ ४७ हजार शेतकऱ्यांची कपास ॲपवर नोंदणी

## १६ जानेवारीपर्यंत नोंदणी सुरू ठेवण्याचे नागपूर खंडपीठाचे आदेश; आतापर्यंत १० हजार ८५३ शेतकऱ्यांचा २ लाख क्विंटलवर कापूस खरेदी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ३१ डिसेंबर**

जिल्ह्यात दरवर्षी कापूस हंगाम अंतर्गत ऑक्टोबर दरम्यान सीसीआय अंतर्गत कापसाची खरेदी केली जाते. सीसीआयअंतर्गत सप्टेंबरपासून नोंदणी केल्यानुसार ऑक्टोबर दसरा दरम्यान खरेदी होते. परंतु यंदा नोव्हेंबर अखेर उशीराने खरेदी सुरूवात झाली आहे. असून यंदा कपास ॲपवर नोंदणी करण्यात आली आहे. त्यानुसार आतापर्यंत ४७ हजार १३२ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. तसेच जिल्ह्यातील १५ केंद्रांवरून १० हजार ८५३ शेतकऱ्यांकडील २ लाख ९ हजार ३५७.६० क्विंटल कापसाची खरेदी झाली असल्याचे जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे.



भारतीय कापूस पणन महामंडळाने (सीसीआय) कापूस विक्रीसाठी शेतकऱ्यांतर्फे होणारी नोंदणी प्रक्रिया ३१ डिसेंबर २०२५ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु बऱ्याच शेतकऱ्यांना कपास ॲपवर नोंदणी दरम्यान अनेक अडथळे येत असल्याने अजूनही बऱ्याच शेतकऱ्यांकडे कापूस नोंदणी व स्लॉट न मिळाल्याने खरेदीवाचून पडून आहे. त्यामुळे ३१ डिसेंबर पासून नोंदणी बंद करण्याच्या सीसीआयच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली असून १६ जानेवारीपर्यंत ही नोंदणी सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

कापूस खरेदी केंद्राच्या नोंदणी व खरेदी कमतरते संदर्भात ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा सचिव श्रीराम महादेवराव सातपुते यांनी जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्यासमक्ष सुनावणी झाली. १६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्याची तोंडी ग्वाही सीसीआयने उच्च न्यायालयाला दिली आहे. असे असले तरी सीसीआय कापूस खरेदी नोंदणीसाठी अद्याप मुदत वाढीचे आदेश काढले नसल्याची माहिती बुधवारी स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली. मात्र शेतकरी संघटनांच्या मते नोंदणीला मुदतवाढ मिळणार असल्याची माहिती संबंधीतांनी दिली असल्याने तांत्रिक अडचणींना सामोरे जाणाऱ्या कापूस उत्पादकांना किमान १५/१६ दिवसांचा दिलासा मिळणार आहे.

### केवळ ४७ हजार शेतकऱ्यांची नोंदणी

दरम्यान, जिल्ह्यात सुमारे साडेचार लाख हेक्टर क्षेत्रावर कपाशी वाणाची लागवड झाल्याचा आढावा कृषी विभागाने दिला आहे. त्यानुसार सुमारे दीड लाखांहून अधिक कापूस उत्पादक शेतकऱ्यांची नोंदणी प्रक्रियेत असून मात्र कापूस नोंदणीच्या प्रक्रियेत तांत्रिक अडचणींसह अन्य समस्या निर्माण होत असल्याने जिल्ह्यातील सीसीआयच्या १५ कापूस खरेदी केंद्रांवर ४७ हजार १३२ उत्पादकांच्या कापसाची नोंदणी झाली आहे. नोंदणी झालेल्या कापूस उत्पादकांपैकी १० हजार ८५३ शेतकऱ्यांच्या २ लाख ९ हजार ३५७ क्विंटल कापसाची खरेदी करीत मोजणी पूर्ण झाली आहे. तर अजूनही नोंदणी केलेल्यांपैकी ३६ हजार २७९ शेतकऱ्यांच्या नोंदणी केलेल्या कापसाची मोजणी शिल्लक आहे.

| तालुका | शेतकरी नोंदणी | कापूस खरेदी क्विं. | शेतकरी संख्या |
|---|---|---|---|
| जळगाव | १७९८ | १६९४१ | ७२८ |
| जामनेर | ३३६६ | २३१७९ | ९९६ |
| भुसावळ | १४०८ | ४९४ | २२० |
| मुक्ताईनगर | २९२० | १४२०० | ८०० |
| एरंडोल | ५२१६ | १००७२ | ६२९ |
| धरणगाव | ३१२६ | ९०८० | ५६७ |
| अमळनेर | ६४३६ | १३४०६ | ६४५ |
| पारोळा | ३२५८ | ३९९७ | १४९ |
| चाळीसगाव | २६६६ | ४१७२ | १९४ |
| पाचोरा | ८१९० | २३२७२ | १२१२ |
| चोपडा | ३७७६ | १९८३१ | १०६८ |
| यावल | २३६ | ५२२५ | २०० |
| रावेर | १०८ | ०० | ०० |
| बोदवड | ३५७८ | ४९५३६ | २५०० |
| शेंदुर्णी | ११३० | १५९५० | ९४५ |
| एकूण | ४७१३२ | २०९३५७ | १०८५३ |

साईमत

# गिरणा नदीतून वाळू चोरी रोखताना महसूल, पोलिसांवर हल्ला

## भडगावमध्ये वाळू माफियांचा उन्माद ; एक जेसीबी, दोन डंपर, एक ट्रॅक्टरसह ३७ लाखांचा मुद्देमाल जप्त

भडगाव । प्रतिनिधी

**तालुक्यातील गिरड परिसरातील गिरणा नदीच्या पात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर कारवाई करताना वाळू माफियांनी थेट महसूल व पोलिस प्रशासनालाच लक्ष्य केले. मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या कारवाईदरम्यान महसूल अधिकारी व पोलिसांना शिवीगाळ व धमक्या दिल्या गेल्या. याप्रकरणी भडगाव पोलीस ठाण्यात रितेश पाटील उर्फ आबा (रा.पाचोरा) यांच्यासह २० ते २५ अज्ञात वाळू माफियांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**








भडगाव तहसीलदार यांच्या आदेशानुसार गिरणा नदीपात्रात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी महसूल पथक तैनात करण्यात आले होते. दि.३० डिसेंबर रोजी रात्री १०.४२ वाजेच्या सुमारास गिरड-मांडकी रस्त्यावर गस्त सुरू असताना नदीपात्रातून वाळू भरून येणारी वाहने पथकाच्या निदर्शनास आली. तत्काळ कारवाई करत पथकाने एक जेसीबी, सोनालिका कंपनीचा डीआय-७४५ ट्रॅक्टर व त्याला किन्ही यंत्र लावलेले तसेच टाटा कंपनीचे दोन डंपर क्र. (एम.एच.१८ बी.झेड.७४७५ व (एम.एच.१९ सी.वाय.७०९५) ताब्यात घेण्यात आले.

कारवाई सुरू असतानाच अचानक २० ते २५ जणांचा जमाव घटनास्थळी दाखल झाला. त्यांनी वाहन जप्त करण्यास तीव्र विरोध करत महसूल व पोलिस कर्मचाऱ्यांना अश्लील शिवीगाळ केली. ज्यामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ अतिरिक्त पोलिस बंदोबस्त मागवण्यात आला. त्यानंतर पुढील कारवाई करण्यात आली. या कारवाईत जप्त केलेल्या वाहनांचा व वाळूचा एकूण अंदाजे ३७ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल सरकारी ताब्यात घेण्यात आला.

या घटनेप्रकरणी महसूल सहायक प्रशांत किसन सावरकर यांच्या फिर्यादीवरून भडगाव पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा, धमकी, व अवैध वाळू उत्खनन-वाहतूक यासंबंधी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. गिरणा नदीपात्रातील नैसर्गिक संपत्तीची लूट कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. वाळू माफियांविरोधात कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई केली जाईल, असा इशारा महसूल व पोलिस प्रशासनाने दिला आहे.

Jalgaon Edition
Jan 01, 2026 Page No. 3
Powered by: erelego.com

# जिल्हा नंदुरबार

लोकमत

# लागलीच घ्या जन्म दाखला

## फिरफिर थांबणार; जिल्हा रुग्णालयात उपक्रम सुरू झाल्याने समाधान

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** जिल्ह्यात माता व नवजात बालकांसाठी अभिनव उपक्रम राबविण्यात येत असून, यात जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयांमध्ये आता प्रसूतीनंतर रुग्णालयातून डिस्चार्ज मिळण्याच्या दिवशी जन्म नोंदणी प्रमाणपत्र देण्याची सुविधा सुरू करण्यात आली आहे.

आतापर्यंत जन्म नोंदणीसाठी पालकांना रुग्णालय, ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेचे अनेक फेरे मारावे लागत होते. यामुळे वेळेचा अपव्यय, कागदपत्रांची अडचण आणि विलंब होत असे. ही अडचण लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने आरोग्य विभाग व जन्म-मृत्यू नोंदणी यंत्रणेमध्ये समन्वय साधत ही नवी व्यवस्था कार्यान्वित केली आहे.



### जिल्हाभर राबविणार...

जन्म नोंदणी प्रमाणपत्र मिळत नसल्याने अनेकवेळा अनेक शासकीय योजनांपासून वंचीत राहावे लागते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने हा निर्णय घेऊन नागरिकांच्या सोयीसाठी उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे.

### सेवा सुलभ करण्यावर भर

१ यामुळे नवजात बालकाचे जन्म प्रमाणपत्र त्वरित उपलब्ध होणार आहे. पालकांना वेगळी प्रक्रिया किंवा कार्यालयीन फेऱ्यांची गरज नाही. शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळण्यास मदत होईल.

२ जन्म नोंदणीचे प्रमाण १०० टक्के करण्यावर भर आहे. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जि.प.सीईओ नमन गोयल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली आहे.

३ नवजात बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि माता-बाल सेवांमध्ये सुधारणा करण्याच्या दिशेने जिल्ह्याचा हा उपक्रम सोयीचे होईल.

लोकमत

# नव्या वर्षात पर्यटक अनुभवणार झिप लाइनचा थरार!

Happy 'New's Year

रमाकांत पाटील
लोकमत न्यूज नेटवर्क


तोरणमाळ येथे साकारण्यात आलेला झिप लाइन प्रकल्प.

**नंदुरबार** : राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण असलेले तोरणमाळ आता नव्या वर्षात पर्यटकांच्या स्वागतासाठी नवे रूप घेऊन सज्ज झाले आहे. या वर्षात सीताखाईवर पर्यटकांना झिप लाइनचा थरार अनुभवता येणार आहे. याशिवाय थीम पार्कसह इतर अनेक उपक्रमही पर्यटकांचे मनोरंजन करणार आहेत.

तोरणमाळचा पर्यटनस्थळ म्हणून विकास व्हावा, यासाठी आजवर अनेक प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. कालबद्ध कार्यक्रम राबवून विकास करण्याचा दृष्टीने स्वतंत्र तोरणमाळ प्राधिकरण स्थापण्याचाही प्रस्ताव असून, ५०० कोटींचा आराखडाही तयार आहे. तथापि, शासनाने अद्यापही त्याला मंजुरी दिली नसल्याने तोरणमाळचा विकास संथ गतीने पुढे सरकत आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच असल्याने जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या पुढाकाराने जिल्हा वार्षिक योजनेतून काही उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यातीलच झिप लाइनचा स्पोर्ट अॅडव्हेंचर प्रकल्प आहे. सीताखाईवर ही झिप लाइन टाकण्यात आली असून, हा प्रकल्प पूर्ण झाला आहे. मुंबईच्या कंपनीमार्फत उभारण्यात आला आहे. साधारणत: दोन कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प असून, त्याचे प्रात्यक्षिक झाले आहे. स्वत: वनक्षेत्रपाल महेश चव्हाण यांनी झिप लाईनचा थरार अनुभवला. सीताखाईच्या दोन्ही टोकाचे अंतर पार करण्यासाठी ४० सेकंदांचा कालावधी लागतो.

या प्रकल्पाची अंतिम तपासणी नुकतीच करण्यात आली आहे. साधारणत: नव्या वर्षात प्रजासत्ताक दिनापूर्वी पर्यटकांसाठी तो खुला होणार आहे. त्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांनी काही उपाययोजना सुचवल्या असून, त्या अंतिम टप्प्यात आहेत.

झिप लाइनबरोबरच स्कायवॉकचाही प्रकल्प प्रस्तावित आहे. याशिवाय थीम पार्क उद्यानही कार्यान्वित झाले आहे.

लोकमत

# सावऱ्या दिगर पुलाची प्रतीक्षा!

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** सातपुड्याच्या अती दुर्गम भागात २०१२ पासून प्रलंबित सावऱ्या दिगर त बिलगाव ता. धडगाव येथील पुलाला २०२४ या वर्षात ४५ कोटींचा निधी मिळाला होता. या निधीनंतर पुलाचे काम गतीमान होणे आवश्यक होते. परंतू २०२५ मध्ये पुलाच्या कामाला गती मिळालेली नाही. २०२६ मध्ये हे काम पूर्ण होईल अशी अपेक्षा दुर्गम भागातील नागरिकांची आहे.

सातपुड्यातील अतीदुर्गम भागात उदय नदीवर बांधण्यात येणाऱ्या सावऱ्या दिगर ते बिलगाव येथील पुलाचे बांधकाम २०१२ मध्ये सुरु झाले होते.

## आठ गावांचा प्रश्न मिटेल!

अती दुर्गम भागातील आठ गावे आणि त्यांची ३० पेक्षा अधिक पाड्यांचा या पुलामुळे दळणवळणाचा प्रश्न मिटणार आहे. परंतू १३ वर्षापासून हे बांधकाम अपूर्ण आहे. याठिकाणी खांब उभे असले तरी गर्डर मात्र टाकलेले नाहीत. सातपुड्यातील उडद्या, भादल, भमाणे आदी गावपाड्यांवरील नागरिकांसाठी हा पुल आधार ठरणार आहे. पावसाळ्यातील चार महिने बाह्य जगासोबत संपर्क तुटत असल्याने उदय नदीवरचा हा पुल उभारण्याची सातत्यापूर्ण मागणी आहे. बारा वर्षापासून रखडलेल्या पुलाचे बांधकाम यंदा पूर्ण करण्याची मागणी आहे.

Hello Nandurbar
Page No. 3 Jan 01, 2026
Powered by: erelego.com

लोकमत



प्रकाशा ते शहादा दरम्यान डामरखेड्या जवळील गोमाई नदीपात्रात अपूर्णावस्थेतील खांब. छाया: नरेंद्र गुरव

# गोमाई नदीपुलाचे बांधकाम नवीन वर्षात पूर्णत्त्वास येणार!

लोकमत न्यूज नेटवर्क

**प्रकाशा :** शहादा तालुक्यातील प्रकाशा ते डामरखेडा दरम्यान विसरवाडी ते सेंधवा राष्ट्रीय महामार्गावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून गोमाई नदीवर नवीन पुल निर्मितीचे काम सुरु आहे. हे काम २०२६ मध्ये पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

मार्च २०२३ पासून गोमाई नदीवरील जुना पूल कमकुवत असल्याने त्यावरुन वाहतूक करण्यास बंदी करण्यात आली आहे. यामुळे गुजरात आणि मध्यप्रदेशाकडे येणारी व जाणारी तसेच नंदुरबार ते शहादा दरम्यान धावणारी अवजड वाहने, एसटी बसगाड्या लोणखेडा मार्गाने म्हसावद गावाकडून प्रकाशा व तेथून पुढे जात आहेत. यातून प्रवाशांची गैरसोय होत असल्याने गोमाई नदीवरचा नवीन पूल २०२६ मध्ये पूर्णपणे उभारण्याची अपेक्षा आहे.

**गोमाई नदी पुलावरुन सध्या छोट्या वाहनांना परवानगी आहे. पुलाच्या निर्मितीमुळे तीन राज्यांची वाहतूक सुरळीत होईल.**

लोकमत

# नंदुरबारची 'महाबळेश्वर'कडे वाटचाल : सरकारी अनास्थेमुळे उत्पादकांचे हाल

## स्ट्रॉबेरी उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळेना!

लोकमत न्यूज नेटवर्क

**ब्राह्मणपुरी** : सातपुड्याच्या दुर्गम डोंगररांगांमध्ये आदिवासी शेतकऱ्यांनी कष्टाने शेतीमध्ये नवी क्रांती घडवून आणली आहे. तोरणमाळ, डाब आणि वालंबा यासारख्या अतिदुर्गम भागात सुमारे १०० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर स्ट्रॉबेरीचा मळा फुलला आहे. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊनही हक्काची बाजारपेठ आणि योग्य दर मिळत नसल्याने, येथील शेतकरी सध्या आर्थिक संकटात सापडला आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील वातावरण स्ट्रॉबेरीसाठी पोषक असल्याने येथील नैसर्गिकरीत्या पिकवलेल्या फळांना विशेष चव आणि दर्जा आहे; परंतु स्थानिक पातळीवर या फळाला उठाव नाही. उत्पादित माल मुंबई, सुरत किंवा पुण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये न्यायचा झाल्यास वाहतुकीचा खर्च आवाक्याबाहेर जात आहे. त्यातच



बाहेरच्या बाजारपेठेतही अपेक्षित भाव मिळत नसल्याने स्ट्रॉबेरीचा लागवड खर्च तरी निघेल का? अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

स्ट्रॉबेरी हे अत्यंत नाशवंत फळ असल्याने ते दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी सातपुड्यात कोणतीही शीतगृह किंवा प्रक्रिया उद्योगाची यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे कवडीमोल भावात माल विकण्याशिवाय शेतकऱ्यांसमोर पर्याय उरलेला नाही. 'आम्ही रात्रंदिवस मेहनत करून स्ट्रॉबेरी पिकवली; पण आता वाहतूक खर्च आणि दराअभावी आमचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे,' अशी व्यथा येथील शेतकऱ्यांनी मांडली आहे. त्यामुळे शासनाने सातपुड्यातील उत्पादकांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी होत आहे.

**१००** हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर स्ट्रॉबेरीचा मळा फुलला आहे.



डाब, ता.अक्ककुवा येथे स्ट्रॉबेरीचा मळा फुलला असून, स्ट्रॉबेरी काढताना महिला. छाया : राधेश्याम कुलथे

### बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी

शासनाने या दुर्गम भागातील स्ट्रॉबेरी उत्पादकांसाठी तातडीने स्थानिक स्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी किंवा मोठ्या शहरांपर्यंत माल पोहोचवण्यासाठी वाहतूक अनुदान आणि शीतगृहांची सोय करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. निसर्गाची साथ मिळाली असली तरी प्रशासकीय उदासीनतेमुळे सातपुड्याचा हा 'लाल गोडवा' शेतकऱ्यांसाठी कडू ठरू पाहात आहे. त्यामुळे शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देवून ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

लोकमत

# रस्ता दुरुस्ती न केल्यास आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**शहादा** : तालुक्यातील असलोद-कहाटुळ-सारंगखेडा या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे. या रस्त्यावरून मार्गक्रमण करताना वाहनचालकांसह गावकऱ्यांना मोठ्या प्रमाणात समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, असलोद-कहाटुळ-सारंगखेडा या रस्त्याची निर्मिती पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत करण्यात आली. मात्र; याची प्रचंड प्रमाणात दुरवस्था झाली असून, मुख्य धावपट्टी उखडली आहे तर साइड पट्ट्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने त्या धोकादायक ठरत आहेत. सध्या शहादा ते कहाटुळ या रस्त्याच्या निर्मितीचे काम सुरू आहे. यामुळे परिसरातील कहाटुळ, लोंढरे, कौठळ, निंभोरा, धांद्रे या गावातील ग्रामस्थांना शहादा-शिरपूर मार्गावरील कहाटुळ फाटा ते कहाटुळ गावापर्यंत गावकऱ्यांना येताना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. खड्ड्यांच्या साम्राज्यामुळे वाहन चालवताना अत्यंत जिकिरीचे ठरले आहे. परिणामी लहान मोठ्या अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**१५ दिवसात या रस्त्याची दुरुस्ती झाली नाही तर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.**

रस्त्यावर प्रचंड प्रमाणात खड्डे असल्याने शहादा आगाराने या मार्गावरील बस बंद करण्याचा निर्णय घेतला असून, याचे सर्वाधिक नुकसान परिसरातील विद्यार्थ्यांना होणार आहे. तसेच शेती उत्पादन विक्रीसाठी शहाद्याला आणताना शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. शेतमालासाठी वाहने उपलब्ध होत नाही यामुळे हा रस्ता तातडीने दुरुस्त करणे गरजेचे आहे. निवेदनावर राजाराम पाटील, रवींद्र पाटील, जंगा पाटील, गोपाळ पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

लोकमत



भालेर ता. नंदुरबार येथील एमआयडीसीसाठी लागणारे पाणी संकलीत करण्यासाठी तयार झालेले जलशुद्धीकरण केंद्र. छाया: **सूर्यकांत खैरनार**

# भालेर एमआयडीसी 'धडधडण्या'ची अपेक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** देशभरात आकांक्षित जिल्हा अशी ओळख असलेल्या नंदुरबार जिल्ह्यात औद्योगिक विकास व्हावा, या उद्देशाने औद्योगिक वसाहतींना मंजुरी देण्यात आली आहे. यातील भालेर ही नवीन वसाहत सध्या उद्योगांच्या प्रतीक्षेत आहे. एकूण ४०५ प्लॉटपैकी वसाहतीतील निम्मे प्लॉट वितरीत झाले आहेत. याठिकाणी २ हजार २०० कोटी रुपये गुंतवणूक असलेला औषधनिर्मितीचा कारखानाही प्रस्तावित आहे.

या वसाहतीत प्रामुख्याने गुजरात राज्यातील टेक्सटाईल उद्योजक येऊ इच्छित आहेत. उद्योगांच्या पार्श्वभूमीवर एमआयडीमध्ये पाण्याची व्यवस्था करण्यासाठी मोठा जलकुंभ आणि जलशुद्धीकरण केंद्राची निर्मिती २०२४ मध्ये पूर्ण करण्यात आली आहे. तापी नदीपात्रातून पाणी उचलून ते पाणी भालेरपर्यंत आणण्याचा प्रयत्न होणार आहे. नवीन वर्षात याठिकाणी जिनिंग, मिरची पावडर उद्योग, हिरे घासण्याचा उद्योग, औषधनिर्माण आणि कपड्यांसाठी लागणारे धागे निर्मितीचे उद्योग सुरु होण्याची शक्यता आहे.

**५३**
प्लॉट हे टेक्सटाईल उद्योगांसाठी येथे राखीव आहेत.

भालेर एमआयडीसीमध्ये उद्योगांना सुरुवात झाल्यानंतर येत्या वर्षात किमान पाच हजार कुशल आणि अकुशल युवकांना रोजगार मिळणार आहे. यामुळे परप्रांतात होणारे स्थलांतर थांबणार आहे. जिल्ह्यातील युवकांना याठिकाणी प्रगतीची संधी मिळणार आहे. कोरोनामुळे वसाहतीचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले होते, परंतु गेल्या चार वर्षात प्लॉट वितरण पूर्ववत सुरू झाले होते. २०२६ मध्ये वितरीत केलेल्या बहुतांश प्लॉटवर उद्योग सुरु होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## ग्रामीण भागातील युवकांना रोजगार

नंदुरबार शहराच्या पूर्वेला १५ किलोमीटरवर भालेर शिवारात औद्योगिक विकास क्षेत्राला २०१३ साली मंजुरी देण्यात आली होती. याठिकाणी रस्ते, पाणीपुरवठा यंत्रणा तसेच इतर साधने औद्योगिक विकास महामंडळाने पूर्ण केल्यानंतर प्लॉट वाटपाला सुरुवात झाली. नवीन वर्षात याठिकाणी टेक्सटाईल मिल, फूड पॅकेजिंग, फॅब्रिकेशन, जिनिंग, मिरची प्रक्रिया आदी उद्योगधंद्यांची सुरुवात होणार आहे. भालेर एमआयडीसीठी एकूण २२५ हेक्टर जमीन अधिग्रहित करण्यात आली आहे. यातील ४०५ प्लॉटपैकी ५३ प्लॉट हे टेक्सटाईल पार्कसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

# विकासाची गंगा येईल दारी, नंदुरबार जिल्हा घेईल भरारी

२०२५ या वर्षात नंदुरबार जिल्ह्यात शासकीय योजनांतर्गत पायाभूत सुविधांच्या कामांचा शुभारंभ झाला आहे. काही कामे २०२६ या वर्षात पूर्ण होऊन नागरिकांसाठी सुविधा निर्माण होणार आहेत. २०२५ मध्ये सुरू असलेली काही कामे प्रगतिपथावर असून बरीच पुढे सरकली आहेत. २०२६ या नवीन वर्षात यातील प्रमुख कामे पूर्ण झालेली असतील, अशी नंदुरबार जिल्हावासीयांना अपेक्षा आहे. यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करायचा असेल तर तळोदा ते नंदुरबार दरम्यान शेवाळी नेत्रंग महामार्गाचे विस्तारीकरण कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. यातून नंदुरबार शहरातील तीन उड्डाणपुलांचे बांधकाम सुरू होणार आहे. प्रामुख्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत पूर्ण होऊन कामकाज सुरू होणार आहे. दुसरीकडे २०२५ मध्ये मंजुरी मिळालेले बिलाडी धरण आकारास येण्यास सुरुवात होणार आहे. नंदुरबार तालुक्यासाठीची तापी बुराई योजना, गोमाई नदी पूल आणि सातपुड्याच्या दुर्गम भागासाठी सावऱ्या दिगर पुलाच्या बांधकामाची प्रतीक्षा लागून राहणार आहे. औद्योगिक वसाहतींमध्ये भालेर येथील एमआयडीसीत प्रत्यक्ष मोठ्या उद्योगांना सुरुवात होणार आहे. नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार, नवापूर या दोन उद्योग क्षेत्रांचे विस्तारीकरण होण्याची शक्यता आहे. तर शहादा येथे नवीन वर्षात औद्योगिक क्षेत्राची निर्मिती होणार आहे.

## तापी-बुराई प्रकल्पाचे बांधकाम मार्गी लागणार

भूषण रामराजे
लोकमत न्यूज नेटवर्क

नंदुरबार : तापी-बुराई उपसा सिंचन योजनेमुळे नंदुरबार तालुक्यातील ४३५१ हेक्टर क्षेत्र सिंचित होणार आहे. मार्च २०२४ मध्ये या प्रकल्पाच्या खर्चासाठी राज्य शासनाने ७३८ कोटी ४३ लाख रुपयांच्या प्रथम प्रकल्प अहवालास मान्यता दिली होती. हा प्रकल्प २०२६ मध्ये गतीमान होण्याची शक्यता आहे.



गेल्या वर्षात नंदुरबार तालुक्याच्या पूर्व भागातील अवर्षणग्रस्त शेती क्षेत्रासाठी हा सर्वाधिक दिलासादायक असा निर्णय होता. या निर्णयामुळे नंदुरबार तालुक्यातील निंभेल, कंढे, होळ तर्फे रनाळे, हाटमोहिदा, कोपर्ली, आसाणे, खोक्राळे, घोटाणे, न्याहली, बलवंड, भादवड, मोजरे, वढ्याणे, शनिमांडळ, तिलाली आणि तलवाडे या गावांमधील शेतकऱ्यांच्या शेतीला थेट लाभ मिळणार आहे. उपसा सिंचन योजनेसाठी मान्यता दिलेल्या ७३८ कोटी रुपयांच्या निधीची पूर्तता होण्याकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

**३०**
गावांमधील शेतकरी हा प्रकल्पाच्या प्रतीक्षेत आहेत.

### प्रकल्पामुळे शेती अन् पिण्याचे पाणी मिळणार

सप्टेंबर २०२३ मध्ये नंदुरबार तालुक्यातील ३० गावांमधील शेतकरी तसेच तापी-बुराई जलसंघर्ष समितीने रास्ता रोको करून योजनेबाबत गांभीर्याने घेण्याची मागणी केली होती. त्यापूर्वीच्या काळात जिल्ह्यातील तत्कालीन मंत्री, आजी-माजी आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी यांनीही महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाकडे निधीची मागणी केली होती. २०२६ मध्ये ७३८ कोटींच्या निधीतून हा प्रकल्प पूर्ण होण्याची शक्यता आहे.

## बिलाडी प्रकल्पामुळे मिळणार संजीवनी

लोकमत न्यूज नेटवर्क

नंदुरबार : तब्बल दीड दशकांपासून रखडलेल्या शिवण नदीवरील बिलाडी प्रकल्पाच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे. धरणामुळे जवळपास ८३० हेक्टर शेती सिंचनाखाली येणार आहे. २०२६ या वर्षात धरणाच्या कामाला सर्वाधिक गती येणार असून यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीला संजीवनी मिळणार आहे.

नंदुरबार तालुक्यातील बिलाडी गावानजीक शिवण नदीवर माती धरणाचे काम २००८ मध्ये मंजुर करण्यात आले होते. कालांतराने हे काम रखडले होते परंतु आता हा प्रकल्प पूर्ण होणार आहे. या प्रकल्पासाठी ११३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. धरणाची पाणी साठवण क्षमता ३.७२ दशलक्ष घनमीटर इतकी आहे. त्यातून ८३० हेक्टरपेक्षा अधिक शेती सिंचनाखाली येणार आहे. धरणाला चार वक्राकार गेट राहणार असून संपूर्ण भिंत ही कॉंक्रिटीकरणाची राहणार आहे. भिंतीची लांबी ही २०७ मीटर इतकी राहणार आहे.

२०७ मीटर धरणाच्या भिंतीची लांबी राहणार असून त्याला चार वक्री दरवाजे बसविण्यात येणार आहेत. बिलाडी धरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. बुडितात येणाऱ्या ५० हेक्टर क्षेत्रापैकी १४ हेक्टर क्षेत्राचा मोबदला देण्यात आला आहे.



बिलाडी ता. नंदुरबार येथील मातीच्या धरणाचे बांधकाम सुरु झाले आहे. हे धरण नंदुरबार तालुक्यासाठी वरदान ठरणार आहे. यामुळे परिसरात शेतीसिंचन होणार आहे. दोन डोंगराच्या मध्ये सुरु असलेले धरणाचे बांधकाम. छाया: सुनील कुलकर्णी

लोकमत
जळगाव, गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६

# प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्यासाठी पैसे कोण देणार?

## दहावी - बारावी परीक्षेसाठी शाळांना सीसीटीव्हीचे बंधन; संस्थाचालकांपुढे खर्चाचा मोठा डोंगर

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी शासनाने आता प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे आदेश दिले आहेत.

शिक्षण निरीक्षकांनी यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व शाळांना तसे निर्देशही धाडले आहेत. मात्र, हा खर्च कोणी करायचा ? असा प्रश्न खासगी अनुदानित शाळांच्या संस्थाचालकांनी उपस्थित केला आहे. आधी अनुदान द्या, मगच सीसीटीव्ही ला अशी भूमिका खासगी शाळाचालकांनी घेतली आहे. केवळ दीड महिन्याच्या कालावधीत सीसीटीव्ही लावणार तरी कसे असा सवालही उपस्थित होत आहे.

**१०**

**ते १५ वर्ग खोल्या असल्यास सीसीटीव्ही संचासाठीचा हा खर्च शाळांनी करावा की शासनाने निधी द्यावा यावर पेच निर्माण झाला आहे.**



### प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरा अनिवार्य

शासनाच्या नवीन नियमानुसार, ज्या शाळा परीक्षा केंद्र आहेत, त्यांच्या प्रत्येक वर्गामध्ये सीसीटीव्ही कॅमेरा अनिवार्य आहे. परीक्षेदरम्यानचे संपूर्ण चित्रीकरण जतन करून ठेवावे लागणार असून, आवश्यकतेनुसार त्याची पडताळणी केली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. शिक्षण विभागाच्या आगामी कामकाजाकडे शाळांचे लक्ष लागून आहे.

### दहावी - बारावी परीक्षेसाठी मंडळाचे कडक नियोजन

राज्य शैक्षणिक मंडळाने यंदाची परीक्षा कॉपीमुक्त आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी कडक पावले उचलली आहेत. भरारी पथकांसोबतच आता तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### शासकीय निधी, अनुदान देण्याची मागणी

जोपर्यंत शासन सीसीटीव्ही बसवण्यासाठी विशेष अनुदान किंवा निधी उपलब्ध करून देत नाही, तोपर्यंत हे आदेश राबवणे अशक्य आहे. त्यामुळे शासनाने तातडीने निधी वर्ग करावा, अशी मागणी जिल्हा शाळा संस्थाचालक संघटनेने केली आहे. अनेक वर्षांचे शिक्षकेतर अनुदानसुध्दा शाळांना मिळाले नाही.

### परीक्षा केंद्रांवर याही सुविधा बंधनकारक

केवळ सीसीटीव्ही नव्हे, तर परीक्षा केंद्रांवर पिण्याचे शुद्ध पाणी, सुसज्ज बैठक व्यवस्था, प्रकाश व्यवस्था, स्वच्छतागृह आणि केंद्राबाहेर कडेकोट बंदोबस्त यांसारख्या सुविधा पुरवण्याचे कडक निर्देश शिक्षण विभागाने दिले आहेत. सुविधा निर्माण करण्यासाठी पैसे कुठून आणावे, असा प्रश्न संस्थाचालकांना पडत आहे.

### सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा खर्च नेमका कुणी करायचा ?

१. हा कळीचा मुद्दा ठरत आहे. शासनाने आदेश तर दिले, पण त्यासाठी लागणाऱ्या निधीची कोणतीही तरतूद केलेली नाही.

२. एका शाळेत किमान १० ते १५ वर्गखोल्या असल्यास सीसीटीव्ही संचासाठी लाखांच्या घरात खर्च अपेक्षित आहे. हा खर्च शाळांनी स्वतःच्या खिशातून करावा की शासनाने निधी द्यावा, यावरून पेच निर्माण झाला आहे.

३. विनानुदानित तत्त्वावर इतका मोठा खर्च शाळा करू शकत नाहीत. शासनाने आदेशासोबत निधीही द्यावा, अन्यथा ग्रामीण भागातील केंद्रे चालवणे कठीण होईल, अशी मागणी संस्थाचालकांकडून करण्यात आली आहे.

### खासगी, अनुदानित शाळांवर वाढणार बोजा

जिल्ह्यातील बहुतांश परीक्षा केंद्रे ही खासगी अनुदानित शाळांमध्ये आहेत. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या या शाळांवर सीसीटीव्हीच्या सक्तीमुळे मोठा आर्थिक बोजा पडणार आहे. ग्रामीण भागातील शाळांकडे इतका मोठा निधी उपलब्ध नसल्याचे चित्र आहे.

लोकमत

# चिंचपाडा औद्योगिक क्षेत्रात स्वतंत्र फीडर

लोकमत न्यूज नेटवर्क

**विसरवाडी :** नवापूर तालुक्यातील विसरवाडी येथील ३३/११ के. व्ही. वीज उपकेंद्राअंतर्गत चिंचपाडा गावासाठी मंजूर करण्यात आलेल्या स्वतंत्र औद्योगिक (एक्सप्रेस) वीज फीडरच्या कामाचे प्राथमिक भूमिपूजन नवापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बकाराम गावित यांच्या हस्ते पार पडले.

नवापूर तालुक्यातील चिंचपाडा हे गाव धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्गावर वसलेले असून, हे गाव तालुक्यातील एक महत्त्वाचे व्यापारी व औद्योगिक केंद्र म्हणून ओळखले जाते. येथे ऑइल मिल, पेट्रोल पंप, सीएनजी पंप, पिठाच्या गिरण्या, खडी क्रेशर व्यवसाय, विविध कारखाने तसेच तालुक्याला वरदान ठरलेले मिशन हॉस्पिटल यासारख्या अनेक औद्योगिक व सेवा आस्थापना कार्यरत आहेत. त्यामुळे या परिसरात वीज मागणी सातत्याने वाढत असून, अखंडित व दर्जेदार वीजपुरवठ्याची मागणी सतत होत होती. यासाठी नवापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बकाराम गावित यांनी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. आमदार रघुवंशी यांनीही या मागणीची दखल घेत जिल्हा नियोजन समितीचे नियोजन अधिकारी शशांक काळे, अधीक्षक अभियंता दराडे, उपकार्यकारी अभियंता मुनीफ शेख, कार्यकारी अभियंता गायधनी व सहायक अभियंता दिनेश तुपे यांच्या माध्यमातून वरिष्ठ पातळीवर प्रभावी पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश येत चिंचपाडा गावासाठी स्वतंत्र औद्योगिक



## औद्योगिक क्षेत्रासाठी हा फीडर वरदान ठरणार

चिंचपाडा एक्सप्रेस फीडर सुरू झाल्यानंतर या अंतर्गत येणाऱ्या सर्व औद्योगिक व व्यापारी आस्थापनांना अखंडित वीजपुरवठा मिळणार असून, वीज खंडित होण्याच्या समस्येवर मोठ्या प्रमाणात मात होणार आहे. त्यामुळे उद्योगधंद्यांची कार्यक्षमता वाढून परिसराच्या आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. औद्योगिक क्षेत्रासाठी हा फीडर वरदान ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त केली. या फीडरच्या प्राथमिक शुभारंभप्रसंगी बकाराम गावित यांनी सांगितले की, लवकरच या फीडरचे अधिकृत उद्घाटन आमदार चंद्रकांत रघुवंशी व आमदार आमश्या पाडवी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

एक्सप्रेस फीडर मंजूर करण्यात आला. यावेळी नवापूर पंचायत समितीचे माजी सदस्य सुरेश गावित, उद्योजक मयूर अग्रवाल, जयेश अग्रवाल, देवली माडी पेट्रोल पंप संचालक के. टी. गावित, महादू गावित आदी उपस्थित होते.

लोकमत

# शहादा एमआयडीसीचे स्वप्न नवीन वर्षात पूर्ण होणार!

**हिरालाल रोकडे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**शहादा :** तालुक्याच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी शहादा एमआयडीसीची घोषणा झाली आहे. अद्याप कागदावरच असल्याचे चित्र जून २०२५ पासून या प्रकल्पाचा पाठपुरावा सुरु आहे. आदिवासी पट्ट्यातील हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प २०२६ मध्ये सुरु होणार आहे.

शहादा येथील व्यापारी शिष्टमंडळाने एमआयडीसीसाठी सतत पाठपुरावा केला होता. आमदार राजेश पाडवी यांनी या प्रश्नी थेट मंत्रालय स्तरावर उद्योगमंत्री उदय सामंत यांना यासाठी प्रस्ताव दिला होता. २० मार्च २०२५ रोजी मंत्रालयातील उच्चस्तरीय बैठकीत या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्याचे आश्वासनही मिळाले.

एमआयडीसीसाठी मोहिदा शिवारातील १६० हेक्टर शासकीय जागेची निवड करण्यात आली आहे. शासकीय जागा असल्याने भूसंपादनाचा मोठा खर्च वाचणार आहे. तापी नदीवरील प्रकाशा आणि सारंगखेडा बॅरेजमुळे पाण्यासाठीही कोणतीही अडचण नाही. कृषीदृष्ट्या समृद्ध असलेल्या या भागात उद्योग आल्यास शेतीवर आधारित उद्योगांना मोठी चालना मिळणार आहे.

> **“शहाद्यात एमआयडीसी कार्यान्वित करण्यासाठी उद्योगमंत्र्यांनी हिरवा कंदील दिला आहे. निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर तातडीने याचा पाठपुरावा केला जाईल. सर्व पायाभूत सुविधांचा प्रस्ताव सादर झाला असून लवकरच मुख्यमंत्री यास मान्यता देतील. यामुळे परिसराचा चेहरामोहरा बदलेल.**
>
> **राजेश पाडवी,** आमदार, शहादा-तळोदा.

## सहा महिन्यात उद्योग क्षेत्र निर्मितीसाठी बैठका...

जानेवारी ते जून २०२५ या काळात जिल्हाधिकारी कार्यालय आणि विविध विभागांच्या बैठकांचा धडाका सुरू होता आराखडा तयार करून शासनाला सादर करण्यात आला, मात्र जून ते डिसेंबर या सात महिन्यांच्या कालावधीत शासनाने यावर कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. यामुळे शहादेकरांना आता २०२६ या नवीन वर्षाची प्रतिक्षा आहे. या वर्षात शहादा एमआयडीचीला गती मिळून प्लॉट वाटपासह पाणी आणि विजेच्या प्रश्नांना चालना मिळणार आहे.

दै.दिव्य मराठी

दि.१ जानेवारी २०२६

दिव्य मराठी

धुळे सिटी 01-01-2026

**मनरेगा योजना** • सात हजार २९७ मजुरांच्या हातांना मिळाले काम

# शहादा तालुक्यात १५१ ग्रामपंचायतींतर्गत घरकुल, सिंचन विहिरींची २३३१ कामे सुरू

हर्षल सोनवणे | शहादा

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना अर्थात मनरेगा अंतर्गत शहादा तालुक्यात विविध तऱ्हेची २ हजार ३३१ कामे सुरू आहेत. या कामामुळे ग्रामीण भागातील तब्बल ७ हजार २९७ मजुरांच्या हाताला काम मिळाले आहे. त्यामुळे ही योजना ग्रामीण भागातील मजुरांसाठी लाभदायी ठरत आहे. जॉब कार्ड असलेल्या मजुरांना संबंधित ग्रामपंचायतीतर्फे गावात अथवा गावानजीक काम उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे त्यांना सद्यःस्थितीत कामाच्या शोधासाठी गाव सोडून जाण्याची वेळ आलेली नाही. या कामावरील मजुरांना ३१२ रुपये प्रतिदिन मजुरी देण्यात येत आहे.

२००८ पासून केंद्र व राज्य सरकारांतर्फे मनरेगा योजना सर्व देशभरात लागू करण्यात आली आहे. या योजनेचा जिल्ह्यातील जॉब कार्ड धारक असलेले हजारो मजूर लाभ घेत आहे.



शहादा तालुक्यातील बंधाऱ्याच्या कामावर कार्यरत महिला व पुरुष मजूर.

### मस्टरची जबाबदारी ग्रामसेवकावर

मनरेगावरील मजुरांची दररोज हजेरी घेऊन ७ दिवसांच्या कामावरील त्यांच्या उपस्थितीचे मस्टर तयार करणे आणि ते संबंधित ग्रामपंचायतीमध्ये जमा करण्याची जबाबदारी संबंधित गावाच्या ग्रामरोजगार सेवकाची आहे. त्याला शासनाकडून या कामाचा मोबदला देण्यात येतो. स्थानिक ठिकाणीच काम उपलब्ध होत असल्याने मजुरांत उत्साह दिसून येत आहे.

### तालुक्यात मनरेगा अंतर्गत कामे

सध्याच्या घडीला शहादा तालुक्यात मनरेगा योजनेतर्गत घरकुल बांधकाम, फळबाग लागवड, सिंचन विहिरी खोदकाम, जनावरांचे गोठे बांधकाम, तुतारी लागवड, शोषखड्डे ही कामे प्रामुख्याने सुरू आहेत. गावातल्या गावात काम असल्यामुळे मजुरांना दिलासा मिळाला आहे.

### १०० दिवसांच्या रोजगाराची हमी

*तालुक्यामध्ये मनरेगाची कामे सुरू आहेत. घरकुल, गटारे, फळबाग या सारख्या ग्रामीण विकासाच्या कामांचा त्यात समावेश आहे. योजनेचा मुख्य उद्देश असून ग्रामीण कुटुंबांना वर्षातील १०० दिवसांचा रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे, ज्यामुळे मजुरांच्या हाताला काम मिळते आणि त्यांचे उत्पन्न वाढते.*

– हेमंत चौधरी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, शहादा.

# रुग्णांचा झोळीतून प्रवास नित्याचाच, चित्र पालटणार कधी?

## कुवलीडाबरवासियांचा सवाल; वृध्द आजारी महिलेला बांबूलॅन्समधून नेले रुग्णालयात

**मोड :** देशाच्या स्वातंत्र्याला ७८ तर जिल्हा निर्मितीला २७ वर्षांचा कालावधी लोटला आहे.असे असतांना नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम-अतिदुर्गम भागांमध्ये आजही मुलभूत सुविधा न पोहचल्याने येथील रहिवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तळोदा तालुक्यातील रापापूर गृप ग्रामपंचायत अंतर्गत येणारे कुवलीडाबर गाव हे याचे ज्वलंत उदाहरण ठरत आहे. या गावात आजही पक्क्या रस्त्याची सुविधा नसल्याने नागरिकांना आरोग्य, शिक्षण व जीवनावश्यक वस्तूंसाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे.नुकतेच एका महिलेची प्रकृती खालावल्याने रस्त्याअभावी वाहन जावू न शकल्याने बांबूलॅन्समधून न्यावे लागल्याचे विदारक चित्र आहे.

कुवलीडाबर येथील उतरीबाई गोवल्या वसावे यांची प्रकृती अचानक खालावल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्याची गरज निर्माण झाली. मात्र, गावाला जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे ग्रामस्थ व नातेवाईकांना अत्यंत बिकट परिस्थितीचा सामना करावा लागला. अखेर आजारी महिलेला बांबूलन्समधून (पान ४ वर)



### आम्हालाही होतात जखमा

उतरीबाई पाडवी या आजी माझ्या नातेवाईक आहेत. त्यांची अचानक प्रकृती खालावल्याने दवाखान्यात जायचे होते. परंतु, रस्ता नसल्याने साडीची झोळी करुन बांबूचा आधार घेऊन डोंगर उतरून दवाखान्यात नेले. आता त्यांची प्रकृती ठीक आहे. हा पहिला प्रसंग नसून असे अनेकवेळा झाले आहे. अनेकांचा जीवदेखील गेला आहे. एखाद्या वेळी रुग्णाला घेऊन जातांना पाय निसटल्यावर आम्हाला देखील त्रास व जखमा होतात.

**गणेश पाडवी, पालाबार**

### रस्ता प्रस्तावित; वन विभागाच्या लालफितीत

केलापाणी, पालाबार ते कुवलीडाबर हा आठ किमी रस्ता प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत प्रस्तावित करण्यात आला आहे. वनविभागाच्या हद्दीतून जात असल्याने तांत्रिक अडचणी दूर झाल्यावर लवकरच मंजुरी मिळवून रस्त्याचे काम होणार आहे.

-भूषण भामरे (कनिष्ठ अभियंता,तळोदा)

पान १ वरुन

# रुग्णांचा झोळीतून प्रवास...

मुख्य रस्त्यापर्यंत नेण्यात आले. त्यानंतर रुग्णवाहिकेद्वारे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही घटना एकदाच घडलेली नसून कुवलीडाबर गावासाठी ही नेहमीचीच परिस्थिती असल्याचे ग्रामस्थ सांगतात. आजारपण, गर्भवती महिलांची प्रसूती, शालेय विद्यार्थ्यांचे शिक्षण तसेच जीवनावश्यक वस्तूंची ने-आण यासाठी नागरिकांना पाच ते सहा किलोमीटर अंतर पायी पार करावे लागते. पावसाळ्यात तर परिस्थिती आणखी गंभीर होते. रापापूर ते कुवलीडाबर हे अंतर अवघे पाच ते सहा किलोमीटर इतके असतानाही अद्याप रस्त्याचे काम झालेले नाही. प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून वारंवार आश्वासने मिळूनही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या घटनेनंतर कुवलीडाबर व परिसरातील नागरिकांनी प्रशासनाने या गंभीर समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने रस्ता मंजूर करून काम सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. दुर्गम भागातील नागरिकांनाही सन्मानाने जगण्याचा हक्क असून रस्ता ही मूलभूत गरज असल्याची भावना आता जोर धरू लागली आहे.